दै.पुण्यनगरी

दि.29 जानेवारी,2026

पुण्य नगरी

# कुंभमेळ्याशी निगडित कामे मोहीम स्तरावर पूर्ण करावीत

## जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांचे आढावा बैठकीत निर्देश



**नाशिक :** सिंहस्थ कुंभमेळा ध्वजारोहणाचा कार्यक्रम याचवर्षात होणार आहे. त्यामुळे कुंभमेळ्याशी निगडित विविध विकास कामे मोहिमस्तरावर पूर्ण करावीत, असे निर्देश जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात मंगळवारी (दि.२७) दुपारी नाशिक शहरातील द्वारका सर्कल अंडर पास, नदी घाटांचे बांधकाम, विमानतळ विस्तारीकरण यासह विविध विकास कामांचा मंत्री महाजन यांनी आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री महाजन म्हणाले की, आगामी कुंभमेळा स्वच्छ, सुंदर, पर्यावरणपूरक आणि सुरक्षित करावयाचा आहे. त्यासोबतच देश- विदेशातून येणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखत घाटांचे बांधकाम, रस्ते, विमानतळ विस्तारीकरणाची कामे वेळेत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. द्वारका सर्कलचे काम वेळेत पूर्ण होईल, असे नियोजन करावे. तसेच वाहतूक विस्कळीत होणार नाही याचीही दक्षता घ्यावी. विकास कामांमधील भूसंपादन हा महत्वाचा विषय आहे. भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती द्यावी. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ वाढवावे. तसेच वृक्षारोपण मोहीम राबवीत रोपांचे संवर्धन करावे, असेही मंत्री महाजन यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी सांगितले की, सर्व कामे वेळेत पूर्ण होतील याची सर्व विभागांनी दक्षता घ्यावी. प्रशासकीय विभागांनी कुंभमेळ्याशी निगडित कामांना प्राधान्य द्यावे. कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त सिंह यांनीही विविध सूचना केल्या. जिल्हाधिकारी प्रसाद यांनी भूसंपादन प्रक्रिया, विकास कामांची सद्यःस्थिती याविषयी माहिती दिली. तसेच भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती देऊन विकास कामे वेळेत पूर्ण होतील, असे सांगितले.

Nashik Edition
Jan 28, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# शहरातील फुटपाथ होणार अतिक्रमणमुक्त!

## रिंगरोडसह प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्याची व्यापक मोहीम सुरू

**नाशिक :** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील अंतर्गत तसेच रिंगरोड आणि प्रमुख रस्त्यांचा विकास करण्यात येणार असून, ही कामे करण्यापूर्वी संबंधित रस्त्यांलगत असलेली अनधिकृत कामे तसेच अतिक्रमण हटविण्याची मोहीम मनपाने हाती घेतली आहे. या अतिक्रमण मोहीमेच्या अनुषंगाने शहरातील फुटपाथ अतिक्रमण मुक्त करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.

सिंहस्थासाठी महापालिकेच्या माध्यमातून जवळपास १२०० कोटींचे २९ प्रमुख रस्त्यांची कामे केली जाणार आहेत. ही कामे करण्यापूर्वी संबंधित रस्त्यांवरचे सीमांकन पूर्ण करून तेथील अतिक्रमण हटविण्याचे काम सध्या मनपाच्या अतिक्रमण निर्मुलन विभागाच्या माध्यमातून सुरू आहे.

विविध सेवा पुरविण्यासाठी मनपाला वारंवार रस्त्यांची तोडफोड करावी लागते. यामुळे आर्थिक नुकसान तर होतेच शिवाय शहरवासियांना देखील खड्ड्यांचा सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी सर्वच २९ रस्त्यांलगत ऑप्टीकल फायबर केबल, टेलिफोन केबल, गॅस पाईपलाईन यासह विविध प्रकारच्या सेवा पुरविणाऱ्या केबल्स टाकण्याचे काम हाती घेतले आहे. जेणेकरून वारंवार रस्त्यांची तोडफोड करण्याची वेळ मनपावर येणार नाही. शहराचा वाढता विकास व विस्तार पाहता अनेक ठिकाणी नाशिककरांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. वाहनांना पार्किंगसाठी देखील जागा मिळत नाही. यामुळे अतिक्रमणे काढून रस्त्यांचे रूंदीकरण करण्यात येणार आहे. त्याचबरोबर रस्त्यांवरील फुटपाथ देखील अडथळे मुक्त करून नाशिककरांना दिलासा देण्याचे काम मनपाकडून केले जाणार आहे. मात्र ही बाब कितपत यशस्वी होते, याकडे लक्ष लागून आहे. मनपाकडून आजवर अनेकदा असे प्रयत्न झाले मात्र अशा मोहीमा नव्याचे नऊ दिवस ठरत असल्याचे अनुभव नाशिककरांना काही नवीन नाही.



### या रस्त्यांवरील अतिक्रमण हटविणार

गंगापूररोड, दिंडोरी रोड, पेठरोड, व्दारका सर्कलला येऊन मिळणारे सर्व रस्ते, पुणे रोड, जेलरोड, वडनेर व विहितगाव रोड अशा महत्वाच्या रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम टप्प्या टप्प्याने हाती घेतली जाणार आहे. सध्या दिंडोरी रोडवरील कार्यवाही सुरू आहे.

### पुलासाठी २७ झोपड्या काढणार

आर. डी. सर्कलवरून मिलिंदनगरकडे येणाऱ्या रस्त्याची कनेक्टिव्हीटी वाढावी व याठिकाणची वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मिलींदनगर भागात नासर्डी (नंदिनी) नदीवर पुलाची उभारणी करण्यात येणार आहे. या पुलाचे बांधकाम व तेथून पुढे रस्त्याच्या कामासाठी २७ झोपड्या हटविण्यात येणार आहे. अतिक्रमण विभागाकडून तसे नियोजन सुरू आहे.

पुण्य नगरी

# कुंभमेळ्यातील सामाजिक कार्याबद्दल विद्यार्थ्यांना मिळणार दोन गुण

## पुणे विद्यापीठाच्या अकॅडमिक कौन्सिलची मान्यता

**नाशिक :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या दिशादर्शक तत्त्वांनुसार, सिंहस्थ कुंभमेळ्यात स्वयंसेवक, शैक्षणिक अभ्यासक्रमाचा भाग म्हणून मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यासाठीचे दोन अकॅडमिक क्रेडिट (गुण) देण्यात येणार आहे. यासंदर्भातील प्रस्तावास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अकॅडमिक कौन्सिलच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. अशाप्रकारे कुंभमेळा अकॅडमिक क्रेडिट बँकशी जोडणारे पुणे विद्यापीठ देशात पहिले विद्यापीठ ठरण्याची शक्यता आहे.

नाशिक येथे २०२६-२७ दरम्यान सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. हा दर बारा वर्षांनी होणारा राष्ट्रीय स्तरावरील धार्मिक आणि सांस्कृतिक महाउत्सव आहे. या सोहळ्यास देश-विदेशातून लाखो भाविक येतात. या महाउत्सवात वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन,

> कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी या संकल्पनेला पाठिंबा दिला. नाशिकचे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनीही यासाठी पुढाकार घेतला. विद्यापीठाकडे पाठपुरावा केला. शैक्षणिक समन्वय समितीही याकामी स्थापन केली आहे. आगामी कुंभमेळा कार्यकाळात नाशिक जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. कुंभमेळा कालावधीसाठी हा निर्णय लागू असेल.
>
> **– सागर वैद्य,** व्यवस्थापन परिषद सदस्य, पुणे विद्यापीठ.

आरोग्य सेवा, सीसीटीव्ही नियंत्रण, माहिती तंत्रज्ञान, एनएसएस, एनसीसी, संशोधन, सुरक्षा, पर्यावरण आणि नदी संवर्धन अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांची मदत घेता येऊ शकते. यापूर्वीच्या कुंभमेळ्यातही विद्यार्थी व शिक्षकांनी स्वयंस्फूर्तीने योगदान दिले होते. यापार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य यांनी मे २०२५ मध्ये विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यासाठीचे दोन अकॅडमिक क्रेडिट (गुण) देण्याची मागणी विद्यापीठाकडे करीत त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यानुसार विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर, सर्व मॅनेजमेंट कौन्सिल मेंबर, अधिकार मंडळे आदींनी त्या अनुषंगाने वेळोवेळी विविध मान्यता दिल्या आहेत.

नाशिक कुंभमेळ्यात सामाजिक कार्यात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार अकॅडमिक क्रेडिट्स प्रदान केल्यास राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा उद्देश साध्य होईल. विद्यार्थ्यांचा सहभाग केवळ धार्मिक न राहता शैक्षणिक उपक्रम ठरेल. भारतीय ज्ञान परंपरेचीही त्यांना ओळख होईल. शिक्षक, शैक्षणिक संस्था यांनाही याचा मूल्यांकन वाढीसाठी उपयोग होईल, अशी विद्यापीठाची भूमिका आहे.

Nashik Edition
Jan 28, 2026 Page No. 03
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

असल तर नाशिक मनपाने काटोरा प्रकल्प रद्द केल्याबाबतचे पुरावे सादर करावे किंवा लेखी हमी देण्याची मागणीही अ‍ॅड. पंडित यांनी केली आहे.

# आता सोसायटी, हॉटेल्समध्येच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया!

पुण्य नगरी विशेष

## घनकचरा व्यवस्थापन विभागाचा उपक्रम ; प्रभाग क्र. ७ मध्ये राबविणार पायलट प्रोजेक्ट

**ज्ञानेश्वर वाघ**

**नाशिक :** शंभर किलो व त्यापेक्षा जास्त ओला कचरा निर्माण होत असलेल्या संस्था, सोसायट्या, तसेच हॉटेल्समध्ये आता, आहे त्याच ठिकाणी प्रक्रिया करून ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत शहरातील संबंधित अपार्टमेंट्स, सोसायट्या, तसेच हॉटेल्सचे सर्वेक्षण करून त्यांची नोंदणी केली जाणार आहे. सुरुवातीला प्रभाग क्रमांक ७ मध्ये अशा प्रकारचा पायलट प्रोजेक्ट राबविण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी सेंटर फॉर सायन्स ॲण्ड एन्व्हायरन्मेंट ही संस्था महापालिकेला सहकार्य करत आहे.

आजमितीस दररोज सुमारे ७९० मेट्रिक टन इतका कचरा संकलन केले जाते. त्यात ओल्या कचऱ्याचे प्रमाण ४७० ते ४८० मेट्रिक टन आहे. ओला आणि सुका कचऱ्याचे विलगीकरण करून मिळावे, यासाठी उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. कचरा संकलनात ओल्या कचऱ्याचे प्रमाण अधिक असल्याने त्याचे विलगीकरण करताना महापालिकेला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. यामुळे आहे त्याच ठिकाणी ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया झाल्यास मनपाला देखील मोठा दिलासा मिळू शकतो. त्या अनुषंगाने घनकचरा व्यवस्थापन विभागाने आता शहरातील १०० किलो व त्यापेक्षा अधिक कचरा निर्माण होत असलेल्या संस्था, सोसायटी, अपार्टमेंट, तसेच हॉटेलांची नोंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रभाग क्रमांक ७ मध्ये अशा प्रकारचा पायलट प्रोजेक्ट राबविण्यात येणार असल्याची माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे संचालक अजित निकत यांनी दिली.

ओल्या कचऱ्यासंदर्भातील प्रोजेक्ट राबविण्यासाठी संबंधित संस्थेबरोबर करारनामा करण्यात आला आहे. या करारनाम्यानुसार संस्था महापालिकेला सिंहस्थ काळात मदत होणार आहे. १०० किलोपेक्षा अधिक प्रमाणात ओला कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांना ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा उभारावी लागणार आहे. या प्रक्रियेतून निर्माण होणारे खतावी विक्रीदेखील करता येईल.

**– अजित निकत**, संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग

### सिंहस्थासाठी प्रोजेक्ट महत्त्वाचा

1. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने संबंधित पायलट प्रोजेक्ट महत्त्वाचा ठरणार आहे.
2. या काळात कचऱ्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे या कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून नियोजन हाती घेण्यात आले आहे.
3. यासाठी सेंटर फॉर सायन्स ॲण्ड एन्व्हायरन्मेंट या संस्थेच्या माध्यमातून कचरा विलगीकरण, जनजागृती तसेच कर्मचारी क्षमता बांधणी करणे या कामांसाठी मदत केली जाणार आहे.

ुण्य नगर



# विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजवंदन

**नाशिक :** देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवारी सकाळी विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी पोलिस दलाच्या तुकडीने मानवंदना दिली.

यावेळी अपर आयुक्त सुभाष बोरकर, अजय मोरे, जितेंद्र वाघ, अरविंद लोखंडे, उपायुक्त उज्ज्वला बावके, सहायक आयुक्त विठ्ठल सोनवणे, तहसीलदार पल्लवी जगताप यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ध्वजवंदनानंतर मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्ताने विभागीय आयुक्त कार्यालय आणि महाराष्ट्र साहित्य परिषद नाशिकरोड शाखा यांच्या वतीने आयोजित शुद्धलेखन व सुंदर हस्ताक्षर स्पर्धा आणि मराठी भाषा ज्ञान स्पधेर्तील विजेत्यांना विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

मराठी भाषा ज्ञान स्पर्धेत आराध्या वडनेरे (प्रथम क्रमांक), आर्य गलांडे (द्वितीय), श्रद्धा गगनबिडे (तृतीय) आणि पूर्व तेलंगी, आर्या बोराडे, आविष्का टावरे, श्रुतिका सोनार, तन्मय आगळे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. तर, शुद्धलेखन व सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत श्रद्धा पगार (प्रथम), ईश्वरी ताजनपुरे (द्वितीय), आर्य गलांडे (तृतीय) आणि पूर्वा ढेरिंगे, दिव्या खैरनार, कल्याणी गोसावी, रेणुका कासार आणि पीयूष माळवे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ. गेडाम यांच्या हस्ते मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्ताने विभागीय आयुक्त कार्यालय आणि महाराष्ट्र साहित्य परिषद नाशिकरोड शाखा यांच्या वतीने आयोजित ग्रंथप्रदर्शन आणि मराठी खाद्यपदार्थ मेळाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानिमित्त उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉइंटलाही मान्यवरांनी भेट देत छायाचित्र काढून घेतले.

Nashik Edition
Jan 28, 2026 Page No. 05
Powered by: erelego.com







नाशिक : हिमाचल प्रदेशात फतेहपूर धरणातून पाणी सोडल्याने पाण्याखाली आलेल्या गावातील रुग्ण, गर्भवती माता, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग अशा ४६८ लोकांचे प्राण वाचवले, त्याबद्दल जलसंपदा तथा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते बारा लाखांचा धनादेश स्वीकारताना कमांडर आनंद किरायक आगाशे. शेजारी राष्ट्रपती पदक स्वीकारताना नाशिक पोलीस आयुक्तालयातील उपनिरीक्षक मुकेश साहेबराव सोनवणे सपत्नीक, सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र मल्हारराव राऊत, उपनिरीक्षक विजय प्रभाकर देवरे (नाशिक ग्रामीण), गुन्हेगारी नियंत्रणात आणणाऱ्या विशेष कामगिरीबद्दल पोलीस निरीक्षक डॉ. अंचल मुदगल, तुम्बेदरसिंग राजपूत, जितेंद्र सपकाळे, नक्षल भागात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल विशेष सेवा पदक घेताना नाशिक ग्रामीणचे मोहन पाटील, लासलगाव व अमोल सूर्यवंशी, सटाणा.





नाशिक : विभागात उत्कृष्ट शेतीशाळा व पीक प्रात्यक्षिक स्पर्धा एआयअंतर्गत बक्षीस स्वीकारताना एस. आर. गोसावी, संभू वाडे, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा घरकुल गृहप्रवेशाची प्रतीकात्मक चावी व प्रशस्तीपत्र स्वीकारताना गणेश वडते ग्रामपंचायत लाखलगाव, भाऊसाहेब वायकंडे ग्रामपंचायत पिंपरी सय्यद, महाराष्ट्र गोसेवा आयोग सन्मान स्वीकारताना गोकुळधाम सेवा प्रतिष्ठान, नांदगाव (ता. इगतपुरी) व नाशिक फेस्टिवलअंतर्गत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत एक कोटी, ५६ लाख ६५ हजार ६६४ रुपयांचा धनादेश सैनिक कल्याण निधीसाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना सुपूर्द करताना मान्यवर.

(छायाचित्र : शैलेंद्र साळी)

दै.पुढारी दि.29 जानेवारी,2026

पुढारी


# साधुग्रामसाठी रोखीने मोबदला

- भूसंपादनासाठी १२ ते १५ हजार रुपये प्रती चौ.मी. दर निश्चित

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भूसंपादन प्रक्रियेला वेग आला असून, साधुग्रामसाठी रोख मोबदल्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने राज्य शासनाच्या मंजुरीसाठी सादर केला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावावर निर्णय घेतला जाईल. दरम्यान साधुग्रामसाठी नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गासन्मुख १५ हजार रुपये प्रती चौरस मीटर, तर महामार्गापासून लांब असलेल्या भूसंपादनाकरीता बारा ते साडेबारा हजार रुपये प्रती चौ.मी. दर निश्चित करण्यात आला आहे.

येत्या २०२७ मध्ये नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. सिंहस्थात येणाऱ्या साधू-महंत तसेच भाविकांच्या सोयी-सुविधांसाठी तब्बल ३० हजार कोटींची कामे महापालिकेसह विविध शासकीय यंत्रणांमार्फत सुरू आहेत. सिंहस्थांत येणाऱ्या साधू-महंतांसाठी तपोवनात तब्बल १,१५० एकर क्षेत्रावर साधुग्रामची उभारणी केली जाणार आहे. तपोवनातील ३७७ एकर




जागेवर साधुग्रामचे आरक्षण आहे. त्यापैकी ९४ एकर जागा संपादित करण्यात आली आहे. उर्वरित २८३ एकर जागा संपादन करण्यासाठी प्रक्रिया सुरू आहे. १,१५० एकर पैकी ७०० एकर जागा तात्पुरत्या स्वरूपात अधिग्रहित करण्याचे नियोजन आहे. २८३ एकर जागा संपादीत करण्यासाठी महापालिकेने २८० शेतकऱ्यांना नोटीस पाठवून सुनावणी घेतली. त्यापुर्वी ५० टक्के टीडीआर व ५० टक्के रोख स्वरूपात मोबदला देण्याची तयारी दर्शविली होती; परंतु शेतकऱ्यांनी प्रस्तावाला विरोध करत रोखीने मोबदल्याची मागणी केली. त्यामुळे महापालिकेने आता रोखीने मोबदला अदा करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. भूसंपादनाचा मोबदला बाजारमूल्य तक्त्यानुसार अदा केला जाणार आहे. मालकांनी मात्र, प्रती चौरस २६ हजार रुपये दराची मागणी केली आहे. महापालिकेने मात्र, त्यातून मध्यम मार्ग काढत १२ ते १५ हजार रुपये प्रती चौ.मी. दर देण्याची भूमिका घेतली आहे.

### मंत्रिमंडळ घेणार अंतिम निर्णय

महापालिकेने सादर केलेल्या प्रस्तावावर राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतला जाणार आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत महापालिकेच्या दरनिश्चितीवर शिक्कामोर्तब केले जाते की, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार दर वाढवून दिला जातो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शहरात धुळवड

शहरात गॅसवाहिनीसाठी अनेक ठिकाणी खोदकाम सुरू आहे. परंतु या खोदकामाची माती रस्त्यावर पसरल्याने रस्तांवर धूळ उडत आहे. त्यामुळे नाशिककरांना श्वसनाच्या विकारांचा सामना करावा लागत आहे.

Nashik Edition
Jan 28, 2026 Page No. 05
Powered by: erelego.com

पुढारी


# परिक्रमा मार्ग भूसंपादनास विरोध

## गोवर्धनवासीयांचा मोजणी रोखण्याचा ग्रामसभेत इशारा

नाशिक : पुढारी वृत्तसेवा

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर उभारल्या जाणाऱ्या नाशिक परिक्रमा मार्गासाठी होणाऱ्या भूसंपादनास गोवर्धन ग्रामपंचायतीच्या पेसा ग्रामसभेत बाधित शेतकरी व ग्रामस्थांनी विरोध नोंदविला आहे. प्रशासनातर्फे नियोजित मोजणी बेकायदेशीर असल्याची तक्रार करत कोणत्याही परिस्थितीत मोजणी प्रक्रिया करू दिली जाणार नाही, असा इशारादेखील ग्रामस्थांनी दिला आहे.

यापूर्वी १६ जानेवारीच्या ग्रामसभेत भूसंपादन प्रस्ताव आधीच एकमताने फेटाळण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा मंगळवारी (दि.२७) सरपंच गोविंद डंबाळे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा पार पडली. यावेळी उपसरपंच बाळासाहेब लांबे, प्रल्हाद जाधव, नाना गाडे, ग्रामसेवक दिनेश पाटील तसेच महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ मर्यादितचे अभियंता दास, तलाठी व मंडळ अधिकारी उपस्थित होते.




प्रस्तावित नाशिक परिक्रमा मार्गाच्या भूसंपादनाबाबत प्रशासनाकडून माहिती देण्यात आली. विरोधानंतरही प्रशासनाकडून भूसंपादनाची कारवाई सुरु असल्याने ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. भूसंपादनासाठी मोजणी कोणत्याही परिस्थितीत होऊ दिली जाणार नाही, असा ठाम इशारा ग्रामसभेत देण्यात आला. पूर्वी नाशिक शहरातून जाणारा परिक्रमा मार्ग बदलून केवळ खर्च वाचविण्याच्या हेतूने गोवर्धन व परिसरातील गावांमधून नेण्यात येत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. यामुळे सुपीक व बागायती जमिनी, फळबागा व घरे बाधित होत असून, आम्ही कोणत्याही परिस्थितीत आमच्या बागायती जमिनी रस्त्यासाठी देणार नाही, ग्रामस्थ भूमिहिन होत आहेत, असे ग्रामस्थांनी ठामपणे जाहीर केले. ग्रामसभेत पर्यायी मार्गाने नव्याने सर्वे करून रस्ता नेण्याची मागणी करण्यात आली. ग्रामसभेतील उपस्थित ग्रामस्थांनी हात उंचावून सर्वानुमते ठराव मंजूर करून प्रस्तावित नाशिक परिक्रमा मार्गाचा भूसंपादन प्रस्ताव फेटाळला असून, सदर ठराव संबंधित प्राधिकरणाकडे पाठवून कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र देऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार उपसरपंच बाळासाहेब लांबे यांनी कोणत्याही स्वरूपात ग्रामसभेचा ना हरकत दाखला दिला जाणार नाही हे जाहीर केले. सदर ग्रामसभेस मुरलीधर पाटील, संदीप पाटील, पोपट जोंधळे, बाळासाहेब जोंधळे, रतन जोंधळे, प्रदीप वासन, शिवांश बटाविया, सुरेश जाधव, रंगनाथ बिसे, चंद्रकांत लांबे, ज्ञानदेव बिसे, अशोक बिसे, सुरेश बिसे, रवींद्र नाकील, विवेक पाटील, अक्षय लड्डा, नानासाहेब सोनवणे, मयूर लांबे, अरुण लांबे, नितीन पाटील आदी उपस्थित होते.

### असा आहे ग्रामस्थांचा दावा

भूसंपादन कायदा २०१३ अंतर्गत अधिसूचना, सोशल इम्पेक्ट असेसमेंट झाल्याशिवाय व ग्रामसभेच्या संमतीशिवाय कोणत्याही परिस्थितीत जमिनीची मोजणी, सर्वेक्षण किंवा मातीचे नमुने घेता येत नाहीत. असे असताना शासनाकडून दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी मोजणीचे नियोजन करण्यात आले असून, ही कारवाई पूर्णतः बेकायदेशीर असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

पुढारी



नाशिकरोड : शिंदे येथील विकासकामांच्या लोकार्पणप्रसंगी मंत्री महाजन यांचा सत्कार करताना पदाधिकारी.

# शिंदे येथे डॉ. बाबासाहेबांचे स्मारक उभारणार : महाजन

**नाशिकरोड : पुढारी वृत्तसेवा**

शिंदे गावात सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेली विकासकामे आदर्शवत आहेत. शिंदे गावात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिल्ह्याला हेवा वाटेल, असे स्मारक उभारण्यासाठी महिनाभरात कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचे प्रतिपादन जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी केले. शिंदे गावातील विकासकामांच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते.

सरपंच बाजीराव जाधव यांनी विकासकामांचा आढावा घेत शिंदे गावात क्रीडा संकुल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्यासाठी निधीची मागणी केली. मंत्री महाजन म्हणाले की, आज गावात अनेक विकासकामे झाली, ती सर्वांना अभिमान वाटावी अशी आहेत. येत्या काही दिवसांत जी कामे होतील, त्याला भरघोस निधी देणार आहोत. बाबासाहेबांचे भव्य स्मारक येथे उभारू. जिल्हा परिषद, पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकवून आपल्या गटातून भाजपला विजयी करा.

यावेळी भाजपचे लक्ष्मण सावजी, सुनील बागूल, सुधाकर बडगुजर, सुनील आडके, उदय सांगळे, सचिन ठाकरे, सचिन आहेर, संजय सानप, नितीन जाधव, वंदना जाधव, अश्विनी साळवे, बाळासाहेब जाधव, उज्ज्वला जाधव, धनाजी मते, शरद कासार, सोमनाथ बोराडे, दिनकर नवसे, संजय धात्रक, रमेश कटाळे, राहुल धात्रक आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Nashik Edition
Jan 29, 2026 Page No. 09
Powered by: erelego.com

# जिल्हा अहिल्यानगर

लोकमत



नंदुरबार शहरातील जिल्हा क्रीडा संकुलात ७७ प्रजासत्ताक दिनी पोलिस दलाच्या महिला पोलिस अधिकाऱ्यांच्या तुकडीकडून मानवंदना स्वीकारताना गृहराज्यमंत्री योगेश कदम. मंचावर जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, सनदी अधिकारी शिवेंद्र सिंह, पोलिस अधिक्षक श्रवण दत्त एस. छाया: सुनील कुलकर्णी

लोकमत

मस्ट READ

# प्रजासत्ताक दिनी शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान

## राज्यमंत्री योगेश कदम यांच्याहस्ते ध्वजारोहण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** शहरातील पोलिस कवायत मैदानावर ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचा मुख्य ध्वजवंदन सोहळा पार पडला. यावेळी गृह राज्यमंत्री योगेश ज्योती रामदास कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमात उत्कृष्ट शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

**४५** अधिकारी व कर्मचारी यांचा योगेश कदम यांनी सन्मान केला.

कार्यक्रमास खासदार ॲड. गोवाल पाडवी, आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार राजेश पाडवी, आमशा पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, सहायक जिल्हाधिकारी अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, उपजिल्हाधिकारी प्रमोद भामरे, श्याम वाडकर, ज्ञानेश्वर पाटील, कल्पना ठुबे, अपर जिल्हा पोलिस अधीक्षक आशित कांबळे, जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क स्नेहा सराफ, कार्यकारी अभियंता, अंकुश पालवे, विभागीय वन अधिकारी डॉ. प्रकाश गुजर व विविध यंत्रणांचे विभागप्रमुख, कर्मचारी उपस्थित होते. पोलिस मुख्यालय येथे राज्यमंत्री कदम यांच्या हस्ते व्यायाम शाळा, बैठक कक्ष बांधकाम व जिल्हा नियोजन समिती अंतर्गत अपारंपरिक सौरऊर्जा प्रकल्प उभारणीचे भूमिपूजन करण्यात आले.



> जिल्ह्यात अनेक योजना यशस्वी राबविल्या जात आहेत. सिकलसेल, माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याचे काम झाले आहे. जिल्ह्यात तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असेल.

**योगेश कदम,** राज्यमंत्री, गृह, महसूल, पंचायतराज, महाराष्ट्र राज्य.

## जिल्ह्यातील महसूल व इतर विभागांचा केला गेला सन्मान

प्रसंगी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन वेळेत पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांचा राज्यमंत्री कदम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महसूल विषयक उल्लेखनीय कामकाज केल्याने अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, नायब तहसीलदार बन्सीलाल वाडिले, महसूल सहायक माया मराठे, प्रीतम नागदेवते, दीपक निळे, संगीता राठोड, ग्राम महसूल अधिकारी झेड. के. गायकवाड, महसूल अधिकारी अमित गावित, तलाठी राजेश पवार, अरुण कोकणी, मंडळ अधिकारी मिथुन राठोड, ग्राम महसूल अधिकारी राजश्री पाडवी, जे. डी. पाटील, जयेंद्र अहिरे, कपिल परदेशी व ग्राम महसूल अधिकारी सुभाष पाडवी, अर्जुन पावरा, द्वितीय स्वाती गावित, प्रवीण पगारे, सुरेश गावित, शीतल सोनवणे, के. के. चौधरी, जे. जी. चौधरी व एम. बी. कायत यांचा सन्मान करण्यात आला.

जिल्हा पोलिस दलातील अधिकारी, अंमलदार इतर संबंधित अधिकारी तसेच विशेष कामगिरी करणारे जिल्हा सरकारी वकील विनोद गोसावी, पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, नीलेश देसले, हेमंतकुमार प्रभाकर पाटील, प्रभारी कार्यालय अधीक्षक संदीप सोनवणे, सहायक पोलिस निरीक्षक जयेश खलाणे, धर्मराज पटले, पोलिस उपनिरीक्षक मुकेश पवार, महिला पोलिस उपनिरीक्षक प्रिया वसावे, पोलिस हवालदार रतन रामोळे, नितीनकुमार सावळे, पोलिस शिपाई शशिकांत राजपूत, जब्बार शेख, विलास पांढारकर, भिका गवळे, हेमंत बारी व महिला पोलिस नाईक कांती वसावे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सर्व उपस्थितांनी बाल विवाह प्रतिबंध शपथ घेतली. कार्यक्रमात एस. ए. मिशन प्राथमिक शाळा, डॉ. काणे गर्ल्स हायस्कुल यांच्यासह विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम व पथसंचलन सादर केले.

लोकमत

# बाजारात वाढला मिरचीचा ठसका; व्यापाऱ्यांना वातावरणाचा धसका!

## नंदुरबार बाजारात पुन्हा वाढले दर; आणखी महिनाभर सुरू राहणार खरेदी हंगाम

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** मिरची आगार असलेल्या नंदुरबारात घसरलेली मिरची आवक पूर्ववत होत आहे. एकीकडे ही मिरची आवक वाढत असताना दुचाकी व्यापारी व शेतकऱ्यांनी बदलत्या वातावरणाचा धसका घेतला आहे. व्यापारी वर्गाला आधीच आवक घसरणीचा फटका बसून पावडर तयार करण्याच्या प्रक्रियेत अडचणी येत होत्या. त्यात गत आठ दिवसात आवक वाढून पुढे एक महिना मिरची बाजार तेजीत येण्याची शक्यता असतानाच ढगाळ वातावरणामुळे पथारींवरचा माल गोदामात रवाना करण्याची धडपड सुरु झाली आहे.

ऑक्टोबरपासून होणारा नंदुरबार जिल्ह्यातील मिरची हंगाम वेट मार्च-एप्रिलपर्यंत सुरु राहत असल्याने मिरची खरेदी करणारे, पथारीवर सुकविणे आणि त्यापासून पावडर तयार करणे या उद्योगांना चालना मिळून रोजगाराची निर्मिती होते. यंदाही जिल्ह्यात साडेसहा हजारपेक्षा अधिक हेक्टर क्षेत्रात लाली, व्हीएनआर व तेजा या वाणांची लागवड झाल्याने शेतकरी आणि व्यापारी यांच्याकडून बाजारात तेजीचे आडाखे बांधले गेले होते. परंतु, ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात अतिवृष्टी आणि खराब हवामान यामुळे मिरची पिकाला फटका बसून शेतकऱ्यांचे उत्पादन निम्म्यावर आले. यामुळे बाजारात २० जानेवारी अखेरपर्यंत केवळ १ लाख ४० हजार क्विंटल मिरची आवक झाली आहे. यामुळे बाजार थंडावला असे चित्र असतानाच २१ जानेवारीपासून बाजार तेजीत आला होता. दर दिवशी अडीच हजार क्विंटल आवक सुरु असतानाच ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने चिंता वाढल्या आहेत.



नंदुरबार कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या सुरु असलेली मिरची आवक.

### मिरची पावडर तयार करणाऱ्या उद्योजकांची धावपळ

नंदुरबारमधील लाली, व्हीएनआर आणि तेजा या मिरची वाणांपासून पावडर तयार करुन त्याची निर्यात करण्यात येते. नंदुरबारात पावडर तयार करणारे ४० कारखाने आहेत. या कारखानादारांकडे डिसेंबरअखेरपर्यंत पावडर तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल उपलब्ध नसल्याने समस्या वाढत होत्या. परंतू जानेवारी महिन्यातील मध्य दिलासादायक ठरुन खरेदी सुरु होती. परंतू यात आता ढगाळ वातावरणामुळे ग्रामीण भागातील मिरचीवर कीडरोग येण्याची शक्यता निर्माण झाल्याने चिंता वाढल्या आहेत.

### दोन लाख क्विंटलवर हंगाम आटोपण्याची शक्यता

नंदुरबार शहरातून दरवर्षी १० हजार टन मिरची पावडर निर्यात केली जाते. यासाठी अडीच लाख क्विंटल मिरचीची खरेदी आवश्यक आहे. व्यापाऱ्यांनी अद्याप १ लाख ४० हजार क्विंटल मिरची खरेदी केली आहे. आगामी काळात ६० हजार क्विंटल मिरची खरेदी होवू शकते. यामुळे सरासरी सात हजार टन मिरची पावडर नंदुरबारात तयार होणार आहे.

**६ हजार**

रुपये प्रतिक्विंटल सरासरी ओल्या लाल मिरचीला भाव मिळत आहे. हे दर पारंपरिक जरेला, फाफडा या वाणांना मिळतात. उर्वरित हायब्रीड वाण २ हजार ६०० पर्यंत खरेदी होत आहेत.

**नंदुरबारच्या पारंपरिक वाणांना आजही भाव**

### नंदुरबार बाजारात १ लाख ४० हजार क्विंटल आवक

१ नंदुरबार बाजारात आजअखेरीस ओल्या लाल मिरचीला २ हजार ६०० ते ६ हजार रुपये प्रतिक्विंटल दर दिला जात आहे. सुक्या लाल मिरचीला व्यापारी सर्वाधिक ९ हजार प्रतिक्विंटल दर देण्यात येत आहेत. हे दर समाधानकारक असल्याने आवकमध्ये वाढ सुरु झाली होती. २० ते २४जानेवारी दरम्यान बाजारात दरदिवशी अडीच हजार क्विंटल मिरची आवक झाली आहे.

२ नंदुरबार बाजार समितीत यंदा आवक झालेली मिरची स्थानिक व्यापारी खरेदी करुन पथारींवर (मैदाने) टाकत आहेत. याठिकाणी मिरची वाळवून कारखान्यात पाठविली जात आहे. दरदिवशी ही प्रक्रिया सुरु आहे. डिसेंबर महिन्यात आवक कमी झाल्याने अनेकांनी पथारी बंद केल्या होत्या. परंतू जानेवारीपासून पुन्हा आवक सुरु झाल्याने पथारींवर मिरची दिसून येत आहे.

३ नंदुरबार बाजारात गतवर्षी १ लाख ९५ हजार क्विंटल मिरची आवक झाली होती. यंदाही पाच हजार क्विंटल वाढीव आवक होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. फेब्रुवारीअखेरीपर्यंत बाजारात मिरची येण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तविली आहे. अंतिम टप्प्यातील मिरचीचे दरही वाढीची शक्यता आहे.

४ ढगाळ वातावरणामुळे झाडावरच्या मिरचीला सूर्यप्रकाश न मिळाल्यास कीड रोगांची भिती असते. पथारींवर वाळवलेल्या मिरचीला ढगाळ वातावरण व तुरळक पावसाचा सामना करावा लागल्यास काळपट डाग पडून माल खराब होतो.

दै.सकाळ दि.29 जानेवारी,2026

सकाळ





**नंदुरबार :** सशस्त्र सेना ध्वज दिन निधी संकलनाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करताना गृहराज्यमंत्री योगेश कदम. दुसऱ्या छायाचित्रात जिल्हा सरकारी वकील विनोद गोसावी यांचा गौरव करताना योगेश कदम.

# उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार

## पोलिस कवायत मैदानावर कार्यक्रम; विनोद गोसावी यांचाही गौरव

**सकाळ वृत्तसेवा**

नंदुरबार, ता. २७ : जिल्ह्यातील विविध विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रजासत्ताक दिनी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. येथील पोलिस कवायत मैदानावर झालेल्या कार्यक्रमात सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनचे इंष्टांक वेळे पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांचा राज्यमंत्री श्री. कदम यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

महसूलविषयक उल्लेखनिय कामकाज केल्याबद्दल अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, नायब तहसीलदार बन्सीलाल वाडीले, महसूल सहायक माया मराठे, प्रितम नागदेवते, दीपक निळे, संगीता राठोड, ग्राममहसूल अधिकारी झेड. के. गायकवाड, महसूल अधिकारी अमित गावित, तलाठी राजेश पवार, अरुण कोकणी, मंडल अधिकारी मिथून राठोड, ग्राममहसूल अधिकारी राजश्री पाडवी, जे. डी. पाटील, जयेंद्र अहिरे, कपिल परदेशी, ग्राममहसूल अधिकारी सुभाष पाडवी यांचा गौरव करण्यात आला.

'खरीप हंगाम २०२५' अंतर्गत 'उत्कृष्ट शेतीशाळा' आयोजित स्पर्धेतील विजेते जिल्हास्तरीय प्रथम अर्जुन पावरा, द्वितीय श्रीमती स्वाती गावित, तृतीत प्रवीण पगारे, चतुर्थ सुरेश गावित व पाचवा श्रीमती शितल सोनवणे, के. के. चौधरी, जे. जी. चौधरी व एम. बी. कायत, जिल्हा पोलिस दलातील अधिकारी, अंमलदार इतर संबंधित अधिकारी व विशेष कामगिरी करणाऱ्या अधिकारी व अंमलदारांचा सन्मान करण्यात आला.

उपस्थितांनी बालविवाह प्रतिबंधाची शपथ घेतली. कार्यक्रमात एस. ए. मिशन प्राथमिक शाळा, डॉ. काणे गर्ल्स हायस्कूल, गुजराती प्राथमिक शाळा नवापूर व अँग्लो उर्दू हायस्कूल नंदुरबार या विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी देशभक्तीपर गीत, नृत्य व परेड मार्च सादर केले. या वेळी खासदार अॅड. गोवाल पाडवी, विधान परिषदेचे आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार राजेश पाडवी, आमशा पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, जिल्हा पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुश पालवे, अपर जिल्हा पोलिस अधीक्षक आशित कांबळे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

### यांचा झाला सन्मान

**जिल्हा सरकारी वकील विनोद गोसावी, पोलिस निरिक्षक हेमंत पाटील, निलेश देसले, हेमंतकुमार पाटील, प्रभारी कार्यालय अधीक्षक संदीप सोनवणे, सहायक पोलिस निरिक्षक जयेश खलाणे, धर्मराज पटले, पोलिस उपनिरिक्षक मुकेश पवार, महिला पोलिस उपनिरिक्षक प्रिया वसावे, पोलिस हवालदार रतन रामोळे, नितीनकुमार साबळे, पोलिस शिपाई शशिकांत राजपूत, जब्बार शेख, विलास पांढारकर, भिका गवळे, हेमंत बारी व महिला पोलिस नाईक कांती वसावे आदींचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.**

# पोस्ट कार्यालयात कर्मचाऱ्यांची वानवा

## ग्राहकांमध्ये नाराजीचर सूर; जागेचाही प्रश्न

■ सकाळ वृत्तसेवा

तळोदा, ता. २७ : येथील पोस्ट कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी असून, जागा देखील मर्यादित असल्याने याठिकाणी आपल्या कामानिमित्त येणाऱ्या ग्राहकांना तासन्तास ताटकळत उभे रहावे लागत आहे. त्यामुळे ग्राहकांमधून नाराजीचा सूर उमटत असून, परिस्थितीमध्ये सुधारणा करावी, अशी अपेक्षा ग्राहकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

शहरातील पोस्ट कार्यालय लहानशा जागेवर असून, दिवसेंदिवस ग्राहकांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे आता पोस्ट कार्यालयाची जागा कमी पडत आहे. कमी जागेत कॅश काउंटरची जागा, कर्मचाऱ्यांचे काउंटर, कर्मचाऱ्यांसाठी बसण्याची जागा, टेबलसाठी जागा यातच सर्व जागा व्यापली जात आहे. याठिकाणी कामानिमित्त येणारे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग महिला व ग्राहकांना ना उभे राहण्यासाठी जागा असते, ना बसण्यासाठी. त्यातच कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने ग्राहकांना जलद सुविधा मिळत नाही. तळोदा शहर व तालुक्यातील प्रतिनिधी दरमहा भरणा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर असल्याने त्यात बराच वेळ जातो. त्यामुळे इतर ग्राहकांना ताटकळत कार्यालयामध्ये उभे रहावे लागते.



**तळोदा :** पोस्ट ऑफिसमध्ये झालेली ग्राहकांची गर्दी.

### लाडक्या बहिणींची मोठी गर्दी

लाडक्या बहिणींचे खाते पोस्टमध्ये असल्याने लाडक्या रोख रक्कम काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. त्यात लहानशा जागेवर यात्रेचे स्वरुप प्राप्त झालेले असते. त्यामुळे ग्राहकांच्या कामांना नेहमीच विलंब होतो. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला व ग्राहकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, ही अडचण दूर करण्यासाठी रोख रकमेचा भरणा करणे व काढण्यासाठी वेगवेगळे दोन कर्मचारी व दोन टेबलची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी ग्राहकांकडून केली आहे.

Dhule, Nandurbar-Today
28/01/2026 Page No. 1

# एकत्र काम केल्यास नंदुरबारची प्रगती

## राज्यमंत्री योगेश कदम यांचे प्रतिपादन; मुख्य ध्वजवंदन उत्साहात

■ सकाळ वृत्तसेवा

**नंदुरबार, ता. २७ : शासन आणि प्रशासन हे दोन्ही घटक एकत्र येऊन काम केल्यास नंदुरबारसारख्या आदिवासीबहुल जिल्ह्याची प्रगती निश्चित होईल, असा विश्वास राज्याचे गृहराज्यमंत्री (शहरे), महसूल ग्रामविकास व पंचायत राज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी व्यक्त केला.**

येथील पोलिस कवायत मैदानावर ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य ध्वजवंदन समारंभात जिल्हावासीयांना संबोधित करताना ते बोलत होते. या वेळी खासदार ॲड. गोवाल पाडवी, आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार राजेश पाडवी, आमशा पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, जिल्हा पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, सहायक जिल्हाधिकारी अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती आशा संधवी, उपजिल्हाधिकारी प्रमोद भामरे, श्याम वाडकर, ज्ञानेश्वर पाटील, कल्पना ठुबे, अपर जिल्हा पोलिस अधीक्षक आशित कांबळे, जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक स्नेहा सराफ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता, अंकुश पालवे, विभागीय वन अधिकारी डॉ. प्रकाश गुजर व विविध यंत्रणांचे विभागप्रमुख, कर्मचारी उपस्थित होते.

राज्यमंत्री श्री. कदम यांनी जिल्ह्याच्या विकाससाठी शासनाने केलेले प्रयत्न यशस्वीरीत्या पार पाडल्याबद्दल जिल्ह्यातील अधिकाऱ्यांचे केले. जिल्ह्यात घरकुलसारख्या अनेक योजना दुर्गम भागामध्ये यशस्वीरीत्या राबवल्या जात आहेत. महिला बचतगटांनी तयार केलेल्या वस्तू विक्री करण्यासाठी 'उमेद मॉल' ही योजना १२ जिल्ह्यांत सुरू झाली असून, लवकरच नंदुरबार जिल्ह्यामध्येही १०० टक्के निधीसह ती लागू करण्यात येईल, यासाठी राज्याचे मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यात सिकलसेल असलेल्या रुग्णांसाठी अनेक योजना असून, त्याचे निर्मूलन करण्यासाठी आरोग्य विभागाने जवळपास आठ लाख नागरिकांची तपासणीचे नियोजन केले आहे. आतापर्यंत साडेतीन लाख नागरिकांची तपासणी पूर्ण केली असून, एक हजारापेक्षा जास्त दिव्यांगांना प्रमाणपत्र देण्यात आले आहेत.



**नंदुरबार :** पोलिस कवायत मैदानाजवळ अद्ययावत ओपन जिमचे भूमिपूजन करताना गृहराज्यमंत्री योगेश कदम. शेजारी उपस्थित मान्यवर.

राज्यमंत्री कदम म्हणाले, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या 'हेल्थ ॲक्शन सेंटर'द्वारे उच्च जोखीम असलेल्या जवळपास साडेतीन हजार गर्भवती मातांना आणि साडेसातशे बालकांना ट्रॅकिंग करून बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याचे काम केले गेले, याचे विशेष कौतुक आहे.

### स्थानिक रोजगारासाठी शासन प्रयत्नशील

नंदुरबार जिल्हा हा महाराष्ट्र-गुजरात सीमेवर असल्यामुळे रोजगाराच्या संधी राज्याबाहेर उपलब्ध होतात. यावर उपाय म्हणून जिल्ह्यात जास्तीत जास्त उद्योग उभे करून तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असेल. भारतीय संविधानाच्या बळावरच भारत देश जगात सर्वात मजबुतीने उभा असल्याचे सांगून, सर्वांनी एकोप्याने राहण्याचे आवाहन राज्यमंत्री श्री. कदम यांनी केले.

### विविध विकासकामांचे भूमिपूजन

■ गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी नंदुरबार जिल्हा पोलिस मुख्यालयाला सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांच्या हस्ते पोलिस दलातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण उत्साहात पार पडले. पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी पोलिस कवायत मैदानाजवळ अद्ययावत 'ओपन जिम' उभारण्यात येणार असून, त्याचे भूमिपूजन गृहराज्यमंत्री कदम यांच्या हस्ते झाले. यासोबतच पोलिस मुख्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या सोलर प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. तसेच, अन्य मूलभूत सुविधांच्या कामांचाही प्रारंभ करण्यात आला. 'पोलिस दलाचे सक्षमीकरण करणे आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हे शासनाचे कर्तव्य आहे. या नव्या सुविधांमुळे कर्तव्य बजावणाऱ्या जवानांना शारीरिक तंदुरुस्ती राखण्यास निश्चितच मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

Dhule, Nandurbar-Today
28/01/2026 Page No. 1

**दै.दिव्यमराठी** **दि.29 जानेवारी,2026**

दिव्य मराठी धुळे सिटी 28-01-2026

**सन्मान •** पोलिस दलातील अधिकाऱ्यांसह अंमलदारांनाही प्रमाणपत्रांचे करण्यात आले वितरण

# प्रजासत्ताकदिनी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा राज्यमंत्री योगेश कदमांच्या हस्ते केला गौरव

प्रतिनिधी | नंदुरबार

जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना आरोग्य राज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यात सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन २०२४ चे इष्टांक वेळेत पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांचा राज्यमंत्री कदम यांच्या हस्ते स्मृति चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच महसूल विषयक उल्लेखनिय कामकाज केल्याकामी अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, नायब तहसिलदार बनशिलाल वाडीले, महसूल सहाय्यक माया मराठे, प्रितम नागदेवते, दिपक निळे, संगिता राठोड, ग्राम महसूल अधिकारी झेड.के. गायकवाड, महसूल अधिकारी अमित गावीत, तलाठी राजेश पवार, अरुण कोकणी, मंडळ अधिकारी मिथुन राठोड, ग्राम महसूल अधिकारी राजश्री पाडवी, जे.डी. पाटील, जयेंद्र अहिरे, कपील परदेशी व ग्राम महसूल अधिकारी सुभाष पाडवी तर खरीप हंगाम २०२५ अंतर्गत 'उत्कृष्ट शेतीशाळा' आयोजित स्पर्धा विजेते जिल्हास्तरीय प्रथम अर्जुन पावरा, द्वितीय स्वाती गावीत,



अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करताना राज्यमंत्री योगेश कदम.

तृतीय प्रवीण पगारे, चतुर्थ सुरेश गावीत यांच्यासह शीतल सोनवणे, के.के. चौधरी, जे.जी. चौधरी व एम.बी. कायत यांचाही गौरव करण्यात आला.

## पोलिस अधिकारी, अंमलदारांना प्रमाणपत्र

जिल्हा सरकारी वकील विनोद गोसावी, पो.नि. हेमंत पाटील, नीलेश देसले, हेमंतकुमार पाटील, प्रभारी कार्यालय अधीक्षक संदीप सोनवणे, स.पो.नि जयेश खलाणे, धर्मराज पटले, पोलिस उपनिरिक्षक मुकेश पवार, महिला पो.उ. प्रिया वसावे, पोलीस हवालदार रतन रामोळे, नितीनकुमार साबळे, पोलीस शिपाई अभय राजपूत, जब्बार शेख, विलास पाढारकर, भिका मवळे, हेमंत बारी व महिला पोलीस नाईक कांती वसावे यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले.

दिव्य मराठी धुळे सिटी 28-01-2026

# पोलिस स्टेशनचे विभाजन करा, शिवसेनेचे निवेदन

**प्रतिनिधी** | शहादा

येथील पोलिस स्टेशन विभाजित करण्यासह पुरेसा अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देण्याची मागणी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे शिवसेना शिंदे गटातर्फे करण्यात आली असून यासंदर्भात निवेदनही त्यांना देण्यात आले. शहादा शहरातील पोलिस स्टेशनला लोकसंख्येनुसार तात्काळ पुरेसा कर्मचारी व अधिकारी वर्ग उपलब्ध करून देण्यासह पोलीस स्टेशन विभाजित करून शहादा शहर व शहादा ग्रामीण भागासाठी स्वतंत्र पोलिस ठाणे निर्मिती करण्याची राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना शिवसेना तालुका प्रमुख मनलेश जायसवाल यांच्यातर्फे निवेदन देण्यात आले. याबाबतचा अहवाल मिळाल्यावर तात्काळ कार्यवाही करून शहादा पोलिस स्टेशन विभाजित करण्यास मान्यता देण्यात येईल असे आश्वासन मंत्री योगेस कदम यांनी दिले. यावेळी आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार आमश्या पाडवी, शिवसेना जिल्हा प्रमुख राम रघुवंशी, जिल्हा प्रमुख गणेश पराडके आदी उपस्थित होते.

निवेदनावर शहादा शिवसेना तालुका प्रमुख मनलेश जायसवाल, नगरसेवक जितेंद्र जमदाडे, युवासेना जिल्हा उपप्रमुख राजरत्न बिरारे यांच्या सह्या आहेत.



राज्यमंत्री योगेश कदम यांना निवेदन देताना शिवसेनेचे पदाधिकारी.

दिव्य मराठी धुळे सिटी 28-01-2026

# कायम सेवेत घेण्याच्या मागणीसाठी 'रोहयो' कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद

**प्रतिनिधी** | नंदुरबार

महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्यात यावे, या प्रमुख मागणीसह विविध मागण्या करण्यात करत, मनरेगा कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्मरणपत्र देत २३ जानेवारीपासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात शुक्रवारी काळ्या फीत लावून शासनाचा निषेध करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, तहसील कार्यालय, पंचायत समिती अशा विविध कार्यालयामध्ये मनरेगाचे कंत्राटी अधिकारी, कर्मचारी विविध पदांवर कार्यरत आहेत. इतर समकक्ष योजनांतील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्याबाबत अथवा आवश्यक संरक्षण प्रदान करण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेतले. मात्र, मनरेगा योजनेच्या कर्मचाऱ्यांबाबत अद्याप ठोस निर्णय झाला नाही. शासनाकडून याची दखल घेण्यात न आल्याने स्मरणपत्र देऊन शुक्रवारपासून आंदोलन झाले. दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे. बीडीओ यांच्यामार्फत मागण्यांचे निवेदन संघटनेचे शिष्टमंडळाद्वारे शासनाला देण्यात आले. संबंधित कर्मचाऱ्यांनी काळ्याफित्त लावून शासनाचा निषेध केला. यावेळी तहसील कार्यालय व पं.स. समोर घोषणाही देत निषेध करण्यात आला. यावेळी डीपीओ गजानन मराठे, दर्पण शहा, विजय बागुल, श्रेया पवार, प्रतिक पगारे, राहुल बोरसे, संदीप वाडीले, मिलिंद पाडवी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.



काळ्या फिती लावून बेमुदत काम बंद आंदोलन करताना रोहयो कर्मचारी

## विविध मागण्या करण्यात आल्या

रोहयोच्या सर्व कंत्राटी अधिकारी, कर्मचाऱ्यांना इतर योजनेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे शासन सेवेत नियमित समायोजन करावे, एस २ इन्फोटेक कंपनीमार्फत भरती रद्द करुन त्याऐवजी सर्व कर्मचाऱ्यांना राज्य निधी असोसिएशन मार्फत नियुक्ती देवुन समान काम, समान वेतन धोरण लागु करण्यात यावे, इतर विभागाप्रमाणेच मनरेगा विभागाची स्वतंत्र यंत्रणा तयार करुन पदनिहाय आकृतीबंध तयार करण्यात यावा.

दिव्य मराठी
धुळे सिटी 28-01-2026

चिंता • धडगाव, अक्कलकुव्यात हलका पाऊस; रब्बीसह आंबा बागांचे नुकसानीची भीती

# शहाद्यात १५ मिनिटे पाऊस ; संपूर्ण जिल्ह्यावर 31 जानेवारीपर्यंत अवकाळीचे संकट कायम

प्रतिनिधी | नंदुरबार

जिल्ह्यात मागील आठवड्यापासून हवामानात लक्षणीय बदल जाणवत असून ३१ जानेवारीपर्यंत ढगाळ वातावरण कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. सोमवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास शहादा तालुक्यातील मोहिदा व काही भागात सुमारे १५ मिनिटे पाऊस झाला. यामुळे या भागातील रब्बी पिकांसह आंबा बागांचे किरकोळ स्वरूपात नुकसान झाल्याची माहिती आहे.

लागवी नंतर पहिल्यांदाच आंब्याला मोहर आला असून या पावसाने पाने व मोहर गळून पडला आहे. तसेच धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील पर्वतीय भागात हलका पाऊस झाला आहे. जिल्ह्यात वातावरण बदलल्याने किमान तापमान घसरत १२ अंश सेल्सिअसपर्यंत आले आहे. विशेष म्हणजे दिवसा देखील वातावरणात गारवा जाणवत आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार शनिवारपर्यंत जिल्ह्यावर अवकाळीचे ढग कायम राहणार आहेत. सध्या रब्बी हंगामातील गहू अनेक शेतांमध्ये काढणीवर आला आहे. हरभरा देखील पक्व होत असून येणाऱ्या काळात पाऊस झाल्यास या पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. महिनाभरापासून अधून-मधून ढगाळ वातावरण कायम असल्याने गहू, हरभरा, ज्वारी, मका, तूर या पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव होत आहे.



आंब्याच्या झाडांचे झालेले नुकसान.

**दिव्य मराठी एक्सपर्ट** नीलेश गोरे, हवामान अभ्यासक.

### १ फेब्रुवारी पर्यंत वातावरण ढगाळ राहील

*पश्चिमेकडून येणारी प्रणाली सक्रिय झाल्याने जिल्ह्यात वातावरणात बदल होत आहे. जिल्ह्यात पुढील काही दिवस हवामान अस्थिर राहण्याची शक्यता आहे. एक दोन दिवस तापमानात घट होईल तर लगेच दुसऱ्या दिवशी त्यात वाढ ही होईल. किमान तापमान १३ ते १५ डिग्री सेल्सिअस राहील. १ फेब्रुवारी पर्यंत वातावरण ढगाळ राहील.*

- नीलेश गोरे, हवामान अभ्यासक.

**पुढे काय?**

### गहू व भाजीपाला पिकांवर होऊ शकतो प्रतिकूल परिणाम

हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, उत्तर भारतातून येणाऱ्या थंड व कोरड्या हवेचा प्रवाह तसेच अरबी समुद्रावर निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा अप्रत्यक्ष प्रभाव नंदुरबार जिल्ह्यावर पडत आहे. या दोन प्रणालींच्या संयोगामुळे वातावरणात आर्द्रता वाढून ढगाळ स्थिती निर्माण झाली आहे. सकाळी धुके, दिवसा ढगाळपणा आणि संध्याकाळी गार वारे अशी स्थिती आहे. उशिराने पेरणी झालेल्या भागात हलका पाऊस झाला तर पिकांना लाभ होण्याची शक्यता आहे. गहू, हरभरा, ज्वारी यांसारख्या रब्बी पिकांसाठी हा पाऊस काही अंशी फायदेशीर आहे. जमिनीत ओलावा टिकून राहण्यास मदत होईल. मात्र काढणीच्या टप्प्यात असलेल्या गहू व भाजीपाला पिकांवर मात्र प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

# जिल्हा धुळे

**दै.लोकमत** **दि.29 जानेवारी,2026**

लोकमत

मस्ट READ

# धांदरणे परिसरात अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान



दत्ताने परिसरातील शेतात झालेल्या गव्हाच्या पिकाचे नुकसान

लोकमत न्यूज नेटवर्क

**धांदरणे :** शिंदखेडा तालुक्यातील डाबली, धांदरणे, होळ, गोराणे आणि विटाई परिसरात २७ रोजी आलेल्या वादळी वाऱ्यामुळे व अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील गहू, हरबरा, ज्वारी आणि मका या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

राज्यातील हवामानात सातत्याने बदल होत असून, कधी गारठा तर कधी पावसाचे प्रमाण वाढले आहे. त्या पार्श्वभूमीवर अवकाळी आलेल्या पावसामुळे आणि वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांची पिके जमीनदोस्त झाली आहेत. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून, बँक आणि सावकारांची कर्जे फेडण्याबाबत शंका निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाच्या आणि उत्पादनातील खर्चाच्या पार्श्वभूमीवर, हिजे पिकांची नुकसान होत असताना कर्ज फेडता येईल का, असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे. शेतकरी वर्गाने प्रशासनाने तातडीने पंचनामे करून, नुकसानभरपाई मिळवून दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

**धांदरणे - डाबली परिसरात झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी होत आहे.**

## दत्ताने परिसरात गहू व ज्वारीचे नुकसान

दत्ताने व अजंदे येथील काही शेतकऱ्यांचे गहू व ज्वारी अशा उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सहाय्यक कृषी अधिकारी कुमुदिनी पाटील व तलाठी कपिल आले यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन तात्काळ पंचनामे केले आहे.

# केवायसी चुकलेल्या बहिणींना दिलासा; अंगणवाडीताई करणार प्रत्यक्ष पडताळणी

## जिल्ह्यात तब्बल ५१ हजार ४८४ महिलांच्या अर्जांमध्ये अनेक तांत्रिक आढळल्या त्रुटी; आता त्यांची पडताळणी होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे :** 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांसाठी एक मोठी अपडेट समोर आली आहे. जिल्ह्यातील तब्बल ५० हजार ४८४ महिलांच्या अर्जांमध्ये तांत्रिक चुका आणि केवायसी प्रक्रियेत त्रुटी आढळल्या आहेत. या महिलांची पात्रता निश्चित करण्यासाठी आता अंगणवाडी सेविका त्यांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी करणार आहेत. योजनेसाठी ऑनलाइन अर्ज भरताना अनेक महिलांनी तांत्रिक माहिती भरताना चुका केल्या आहेत.

केवायसी करताना काही महिलांनी चुकीचे पर्याय निवडल्याने त्यांचे अर्ज संशयास्पद किंवा त्रुटीयुक्त दिसत आहेत. ही बाब शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर, पात्र महिलांना योजनेपासून वंचित राहू नये आणि अपात्र व्यक्तींना लाभ मिळू नये, म्हणून हा निर्णय घेतला.

### केवायसी चुकलेल्या बहिणींना दिलासा

ज्या महिलांनी केवायसी करताना नजरचुकीने चुकीचे पर्याय निवडले होते, त्यांचे अर्ज 'पेंडिंग' किंवा 'रिजेक्ट' श्रेणीत गेले होते. आता अंगणवाडी सेविका स्वतः माहिती दुरुस्त करून घेणार आहे.




### अंगणवाडी सेविका प्रत्यक्ष पडताळणी करणार

१ आता महिलांना महा-ई-सेवा केंद्र किंवा सेतू कार्यालयात चकरा मारण्याची गरज नाही. अंगणवाडी सेविका त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थी महिलांच्या घरी जाऊन अर्जातील माहिती आणि प्रत्यक्ष स्थितीची खातरजमा करतील. पडताळणी दरम्यान प्रामुख्याने अर्जातील उत्पन्न गट आणि प्रत्यक्ष उत्पन्नाचा दाखला, वैवाहिक स्थिती (विवाहित, विधवा, परित्यक्ता आदी) आधार कार्डशी लिंक असलेला मोबाइल क्रमांक, रहिवासी पुरावा आणि बँकेचे खाते सक्रिय आहे का? याची तपासणी केली जाणार आहे.

### नोव्हेंबर-डिसेंबरचे हप्ते अडकले

२ ज्या महिलांच्या अर्जात केवायसीच्या त्रुटी आहेत, अशा अनेक लाभार्थींचे नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्याचे हप्ते अद्याप जमा झालेले नाहीत. या पडताळणीनंतर पात्र ठरणाऱ्या महिलांचे हे प्रलंबित हप्ते एकत्रितपणे खात्यात जमा होण्याची शक्यता आहे. आता जिल्ह्यातील सर्वच गावांमध्ये अंगणवाडी सेविका प्रत्यक्ष घरोघरी जाऊन पडताळणी करणार असल्याने यातून ज्यांना पैसे मिळाले नाही त्यांना या पडताळणीनंतर हप्ते मिळण्यास सुरुवात होणार आहे.

### जिल्ह्यातील महिलांनी केले निर्णयाचे स्वागत

३ शासनाच्या निर्णयामुळे कोणावरही अन्याय होणार नाही आणि महा ई- सेवा केंद्र किंवा सेतू कार्यालयाच्या चकरा माराव्या लागणार नाही. त्यामुळे महिलांनी शासन निर्णयाचे स्वागत केले आहे.

### जिल्ह्यात ५० हजार महिलांना फटका

जिल्ह्यात ५१ हजार ४८४ महिलांच्या अर्जांमध्ये तांत्रिक त्रुटी आढळल्या आहेत. यात चार टप्प्यांत वर्गीकरण करण्यात आले आहे. ६५ पेक्षा अधिक वय असल्याचे ५ हजार ५२४, २१ वयापेक्षा कमी असलेले २ हजार ४२२, तर चुकीचा पर्याय निवडणारे तब्बल ४१ हजार ८२७ इतकी आहे. शिवाय, लिंग चुकीचे निवड केल्याने ७११ महिलांचा समावेश आहे. इतक्या मोठ्या संख्येने महिलांचे हप्ते रखडल्याने ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण होते. आता ही पडताळणी मोहीम या सर्व महिलांसाठी आशेचा किरण ठरली आहे. या निर्णयाचा जिल्ह्यातील महिलांनी स्वागत केले आहे.

### या प्रश्नांमुळे झाला होता गोंधळ

केवायसी करताना विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या उत्तरात गोंधळ झाला होता. उदा. 'तुम्ही सरकारी नोकरीत आहात का?' किंवा 'उत्पन्न २.५ लाखांपेक्षा जास्त आहे का?' या प्रश्नांना 'हो' किंवा 'नाही' म्हणताना अनेक महिलांनी चुकीचे बटण दाबले होते, ज्यामुळे त्या अपात्र ठरल्या होत्या. आता पडताळणी त्या गोष्टी स्पष्ट होऊन कोणावरही अन्याय होणार नाही.



### पात्र महिलांना जि. प. मतदानापूर्वी मिळणार हप्ता?

जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचे वारे वाहत असल्याने, मतदानापूर्वी या सर्व पात्र महिलांच्या खात्यात रखडलेले पैसे जमा करण्याचा सरकारचा मानस आहे. पडताळणी प्रक्रिया युद्धपातळीवर पूर्ण झाल्यास फेब्रुवारी महिन्यात हे पैसे खात्यात पडू शकतात.

> जिल्ह्यातील ज्या ५०,४८४ अर्जांमध्ये त्रुटी आहेत, त्यांची पडताळणी अंगणवाडी सेविकांमार्फत सुरू केली आहे. पात्र महिलांनी सेविकांना सहकार्य करावे. कोणाचेही हप्ते विनाकारण थांबवले जाणार नाहीत, तांत्रिक चुका दुरुस्त करणे हाच या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.

\- राजेंद्र भामरे, महिला व बालकल्याण अधिकारी, धुळे

दै.सकाळ  दि.29 जानेवारी,2026

सकाळ

# तीनशेवर ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक?

## धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील निवडणुका लांबणीवरचा परिणाम

■ सकाळ वृत्तसेवा

**धुळे, ता. २८: राज्यातील एकूण १४ हजार २४० ग्रामपंचायतींचा कार्यकाळ फेब्रुवारीपासून संपत आहे. मात्र, निवडणुकीसाठी आवश्यक पूर्वतयारी पूर्ण न झाल्यामुळे या सर्व ठिकाणी निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ शकतात. त्या पार्श्वभूमीवर ग्रामविकास विभागाचे अपर सचिव म. आसोले यांनी २३ जानेवारीला आदेश काढले. त्यानुसार, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांतील सुमारे तीनशे ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया सुरू होणार आहे.**

### सरपंचांकडून मागण्या

विद्यमान सरपंचांकडून प्रशासक म्हणून त्याच्याच नियुक्तीची मागणी करण्यात येत असली तरी, या वेळी प्रशासक पदावर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी कार्यभार सांभाळणार आहेत. या निर्णयामुळे सरपंच संघटना काही प्रमाणात असंतुष्ट आहे.




### पूर्वतयारी नाही

कार्यकाळ संपणाऱ्या ग्रामपंचायतींत प्रभागरचना, आरक्षण आणि मतदार यादी अद्याप तयार नाही. या प्रक्रियेला किमान तीन ते चार महिन्यांचा कालावधी आवश्यक असतो. त्यामुळे निवडणुका किमान सहा महिन्यांनी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### प्रशासकांची शक्यता

अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार धुळे जिल्ह्यात २१८, नंदुरबार ८७, जळगाव ७८३, नाशिक ६२१ व अहिल्यानगर जिल्ह्यात ७६७ ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती होऊ शकते. पूर्वतयारी न झाल्यामुळे ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रशासकांची नियुक्ती ही तातडीची गरज बनली आहे. यामुळे प्रशासनाला नागरिकांच्या सेवेसाठी मार्गदर्शन सुनिश्चित करण्याची जबाबदारी पुढे येत आहे.

### इतिहासाची आठवण

■ प्रभागरचना २०२० मध्ये जुलैपासून सुरू झाली होती. डिसेंबरमध्ये प्रारूप यादी तयार झाली आणि १५ डिसेंबरपासून निवडणूक प्रक्रिया सुरू झाली होती. १५ जानेवारी २०२१ ला मतदान झाले. यंदा मुदत संपत असतानाही प्राथमिक तयारीसाठी आदेश जारी नाहीत. यापूर्वी मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये २६ सप्टेंबर १९९४ ते ७ मे १९९५ दरम्यान ग्रामविस्तार अधिकाऱ्यांऐवजी विद्यमान सरपंच यांनाच प्रशासक म्हणून नियुक्त केले गेले होते.

Dhule, Dhule-Today
29/01/2026 Page No. 2

**दै.दिव्यमराठी** **दि.29 जानेवारी,2026**



**अस्मानी फटका** • भाटपुरा, थाळनेर परिसरात गारपीट; सावेरमध्ये घरांचीझाली पडझड

# शिरपुरात २३५३ हेक्टरवरील पिके आडवी; १८३० शेतकऱ्यांचे नुकसान

प्रतिनिधी | शिरपूर

शिरपूर तालुक्यातील भाटपुरा, थाळनेर आणि होळनांथे परिसरात मंगळवारी झालेल्या भीषण गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. निसर्गाच्या या कोपामुळे हाताशी आलेली पिके भूईसपाट झाली असून, सावेर गावातील अनेक घरांची छपरे उडाल्याने अनेक कुटुंबे उघड्यावर आली आहेत.

वादळामुळे अनेक गावांमधील वीज खांब कोसळल्याने सावेर व परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. महावितरणकडून वीज पुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू आहे. तालुक्यात मंगळवारी झालेले वादळ इतके प्रचंड होते की शेतातील मोठी झाडे उन्मळून पडली असून रखवालदारांच्या झोपड्यांचे पत्रे उडून गेले आहेत. प्रामुख्याने केळी, पपई, मका आणि गहू या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. नुकसानीचा प्राथमिक आकडा सुमारे २,३५२ हेक्टर पर्यंत पोहोचला असून यात १,८३० हून अधिक शेतकऱ्यांना फटका बसला आहे.



वादळी पावसामुळे सावेर गावात घराचे झालेले नुकसान.

### आमदार अमरीश पटेल व काशिराम पावरा थेट बांधावर

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार अमरीशभाई पटेल आणि आमदार काशिराम पावरा यांनी स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांना धीर देत त्यांनी तातडीने मदतीचे आश्वासन दिले. तसेच शिवसेना (शिंदे गट) नेते हेमंत पाटील आणि राजेंद्र गिरासे यांनीही बाधित क्षेत्राचा दौरा केला.

### पडझडीचे पंचनामे करुन अहवाल शासनास देणार

प्रांताधिकारी शरद मंडलिक, तहसीलदार महेंद्र माळी आणि तालुका कृषी अधिकारी संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी व कृषी सहायकांनी युद्धपातळीवर पंचनामे सुरू केले आहेत. सावेर गावातील सरदार धुडकू सैदाने, शानाभाऊ भील, कमलबाई निकम, राम अमृत गुजर यांच्यासह अनेकांच्या घरांचे नुकसान झाले असून त्याचा अहवाल शासनाकडे पाठवण्यात येणार आहे.

### नुकसान झालेली पिके आणि क्षेत्र

केळी ७५० हेक्टर, पपई ३१२ हेक्टर, टमाटे ५५ हेक्टर, टरबूज २५ हेक्टर, मका ६३० हेक्टर, रब्बी ज्वारी १९२ हेक्टर, हरभरा ३२० हेक्टर, गहू १३२ हेक्टर, उन्हाळी बाजरी १७ हेक्टर असे अंदाजित २ हजार ३५३ हेक्टर क्षेत्रावरील नुकसान झाले आहे. यात १ हजार ८३० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यात नुकसान क्षेत्र व शेतकरी संख्या अंतिम पंचनामे नंतर वाढू शकते.

### शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केले जातयेत पंचनामे

*नुकसानीचे पंचनामे सुरू केलेले आहेत. संपूर्ण नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे होतील. आजची आकडेवारी पूर्ण नाही. पूर्ण पंचनामे झाल्यानंतरच अंतिम आकडेवारी जाहीर करण्यात येईल. नुकसानग्रस्त सर्वच शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण होतील. यासाठी प्रशासकीय यंत्रणा बांधावर जाऊन पंचनामा करीत आहे.*

**-संजय पवार,** तालुका कृषी अधिकारी

# मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांना 'समान काम-समान वेतन' देण्याची मागणी

## साक्री येथे प्रलंबित मागण्यांसाठी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

**प्रतिनिधी | साक्री**

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी शासनाविरोधात आवाज बुलंद केला आहे. राज्यभरात आमदार व खासदारांना निवेदन सादर करत कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधले आहे. मनरेगा योजना ग्रामीण भागाचा कणा मानली जाते. मात्र हीच योजना प्रभावीपणे राबवणारे कंत्राटी अधिकारी व कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून सेवा-सुरक्षा, नियमित वेतन व मूलभूत हक्कांपासून वंचित असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. शासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये मनरेगा अंतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित किंवा समायोजित करणे, एस- २ इन्फोटेक कंपनीमार्फत सुरू असलेली अनधिकृत व अवैध भरती प्रक्रिया तात्काळ बंद करणे, तसेच सदर कंपनीचा करार रद्द करून राज्य निधी असोसिएशनमार्फत नियुक्ती देत 'समान काम, समान वेतन' हे धोरण लागू करण्याचा समावेश आहे. तसेच इतर विभागांप्रमाणे मनरेगा विभागासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून पदनिहाय आकृतीबंध तयार करण्याची मागणी आहे. यामुळे विभागातील गैरप्रकारांना आळा बसेल, असा विश्वास व्यक्त केला.



गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देताना कंत्राटी कर्मचारी.

### अन्यथा तीव्र आंदोलनाचा दिला इशारा

या आंदोलनाचा भाग म्हणून गटविकास अधिकारी शशिकांत सोनवणे यांना निवेदन देण्यात आले. शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# टीईटीमुळे शिक्षकांच्या पदोन्नती रोखल्या; निर्णय रद्दबाबत मागणी

## भाजप शिक्षक आघाडीचे मागण्यांबाबत शालेय शिक्षण मंत्र्यांना निवेदन

**प्रतिनिधी** | धुळे

राज्यातील हजारो शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रियेत टीईटीची अट घालण्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयामुळे मोठा पेच निर्माण झाला आहे. हा निर्णय आरटीई कायद्याच्या विरोधात असल्याचा आरोप करत भाजप शिक्षक आघाडीने राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांना निवेदन देऊन संताप व्यक्त केला आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या अवर सचिवांनी १९ जानेवारी २०२५ रोजी एक पत्र निर्गमित केले. या पत्राद्वारे पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी अशा विविध पदांवरील पदोन्नतीसाठी 'टीईटी' अनिवार्य आहे. या एका प्रशासकीय पत्रामुळे संपूर्ण राज्यातील सुरू असलेली पदोन्नती प्रक्रिया 'जैसे थे' स्थितीत आली असून शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी आहे. भाजप शिक्षक आघाडीचे नाशिक विभागाध्यक्ष महेश मुळे यांनी या निर्णयावर कायदेशीर बोट ठेवले आहे. त्यांच्या मते केंद्र सरकारचा आरटीई अधिनियम २००९ आणि राज्य सरकारचा २०१० चा नियम, या दोन्हीमध्ये पदोन्नतीसाठी टीईटीची अट कुठेही नमूद केलेली नाही. १ सप्टेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाबाबत राज्य सरकारने अद्याप स्पष्ट धोरण ठरवलेले नाही. अशा स्थितीत केवळ पत्राच्या आधारे सेवाशर्ती बदलणे बेकायदेशीर आहे.

### शिक्षकांचे मनोबल खच्चीकरण

पदोन्नती प्रक्रिया थांबल्यामुळे हजारो पात्र शिक्षकांमध्ये नैराश्याचे वातावरण आहे. प्रशासनाच्या या मनमानी कारभारामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जर हा निर्णय मागे घेऊन पदोन्नती पूर्ववत सुरू न केल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

# टीईटीचा अडसर घालून शिक्षकांच्या पदोन्नती रोखल्या; शिक्षण विभागाचा निर्णय कायद्याला हरताळ..?

धुळे – राज्यातील हजारो शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रिया टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) या वादग्रस्त अटीमुळे थांबविण्यात आल्याने शालेय शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर तीव्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा निर्णय थेट बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम (आरटीई) २००९ च्या विरोधात असल्याचा गंभीर आरोप भाजप शिक्षक आघाडीने केला असून, या मनमानी निर्णयाविरोधात संघटनेच्या वतीने राज्याचे राज्यमंत्री (शालेय शिक्षण) पंकज भोयर यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभागाच्या अवर सचिवांनी १९ जानेवारी २०२५ रोजी काढलेल्या एका पत्राच्या आधारे पदवीधर शिक्षक, उच्च प्राथमिक शिक्षक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी तसेच प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापक पदांवरील पदोन्नतीसाठी टीईटी अनिवार्य करण्यात आली आहे. या एका प्रशासकीय पत्रामुळे सुरु असलेल्या पदोन्नती प्रक्रिया थेट गोठविण्यात आल्याने राज्यभरातील शिक्षकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

भाजप शिक्षक आघाडीचे नाशिक विभागाध्यक्ष महेश मुळे यांनी या निर्णयावर कडाडून टीका केली. केंद्र सरकारचा आरटीई अधिनियम २००९ आणि महाराष्ट्र शासनाचा आरटीई अंमलबजावणी अधिनियम २०१० या दोन्ही कायद्यांमध्ये पदोन्नतीसाठी टीईटीची कोणतीही तरतूद नाही. असे असताना केवळ एका अवर सचिवाच्या पत्रावरुन शिक्षकांच्या सेवाशर्ती बदलणे हा कायद्याचा आणि संविधानिक मूल्यांचा थेट अपमान आहे, असा आरोप त्यांनी केला. विशेष म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत राज्य सरकारने अद्याप कोणतेही स्पष्ट धोरण जाहीर केलेले नसताना, अधिकाराच्या मर्यादा ओलांडून हे पत्र निर्गमित करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. संसदेकडून मंजूर कायद्याच्या विरोधात जाऊन प्रशासकीय आदेश काढणे ही गंभीर बाब असून, यामुळे शासनाची जबाबदारी आणि कायदेशीर वैधता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

या निर्णयामुळे राज्यातील हजारो पात्र शिक्षकांच्या पदोन्नती रखडल्या असून, शिक्षकांमध्ये असंतोष, संभ्रम आणि तीव्र नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षण विभागाच्या अशा मनमानी कारभारामुळे शिक्षकांचे मनोबल खच्ची होत असून, याचा थेट परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

शासनाने हा निर्णय तात्काळ मागे घेऊन पदोन्नती प्रक्रिया पूर्ववत सुरु करावी, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा भाजप शिक्षक आघाडीने दिला आहे.

**दै.देशोन्नती** **दि.29 जानेवारी,2026**

देशोन्नती

# रेल्वे मार्ग बाधीत शेतकऱ्यांचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

देशोन्नती वृत्तसंकलन

**धुळे :** मनमाड-इंदौर रेल्वे मार्गावर बाळापू ते पुरमेपाडा परिसरातील रेल्वेमार्ग बाधीत शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने प्रांताधिकारी रोहण कुवर यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

शेतकऱ्यांच्या सर्व मागणी पूर्ण होत नाही शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जात नाही तोपर्यंत शासनाच्या कुठल्या च कर्मचाऱ्याला प्रतिनिधीला तसेच भूसंपादन प्रक्रियेला शेतकरी सहकार्य करणार नाही तसेच कुठलाही प्रकारे संयुक्त मोजणी करण्यासाठी शासनाच्या कुठल्याच कर्मचाऱ्यास शेतात येऊ देणार नाही.



शेतकऱ्यांना विश्वासात न घेता संयुक्त मोजणी करण्याचा प्रयत्न केला व कायदा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याला सर्वस्वी जिल्हा प्रशासन व भूसंपादन विभाग जबाबदारी राहील. यावेळी मनमाड-इंदोर( बाळापुर ते पुरमेपाडा) रेल्वेमार्गबाधित शेतकरी संघर्ष समितीचे जयेश चौधरी, डॉक्टर प्रशांत साळुंखे, डॉक्टर योगेश गवळी, सुधाकर पाटील, भुषण पाटील, विशाल तिवारी, अनिलबारस्कर, महेश बडगुजर, विक्रम साळवे, युनूस खाटीक, भावेश दहीहंडे, सुधीर बडगुजर, विठोबा शिंगाडे, अमृत सोनवणे, बाबुलाल चौधरी, अनिल पाटील, विनायक पाटील, जिभाऊ शेंनगे, अशोक वायसे, बाबूलाल चौधरी, कृष्णा शिंदे, बापू नारायण राठोड, प्रभाकर जाधव, आनंद छाजेड, महेश कुमार छाजेड, दिलीप साळवे, जयवंत पाटील, तुषार देवरे, मच्छिंद्र पाटील, भीमराव जाधव, नवल छाजेड व व अन्य शेतकरी उपस्थित होते.

**शेतकऱ्यांचा भूसंपादनासाठी विरोध का?**

शेतकऱ्यांना मिळणारा प्रस्तावित मोबदला हा सध्याच्या बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत अपुरा आहे. शासनाचा कुठलाच कायदा शेतकऱ्याच्या शेतजमिनीचे योग्य मुल्यांकन करू शकत नाही., जमीन अधिग्रहणामुळे शेतकऱ्यांची शेती, उत्पन्नाचे साधन व कुटुंबाचा उदरनिर्वाह धोक्यात येणार आहे, बागायती/सिंचन सुविधा असलेल्या सुपीक जमिनीचा नाश होणार आहे.

Dhule Edition
Jan 29, 2026 Page No. 2
Powered by: erelego.com

जिल्हा जळगाव

लोकमत

# ४५५ गावांत हाहाकार; २७ हजार शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी

## काळजावर 'गार' पडली, ३५ मिनिटांचा तांडव आणि पीक झाल आडवं

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** जिल्ह्यात २७ जानेवारी रोजी झालेल्या भीषण अवकाळी पाऊस आणि वादळी गारपिटीने रब्बी हंगामाला मोठा तडाखा दिला आहे. निसर्गाच्या या प्रकोपाने जिल्ह्यातील १० तालुक्यांमधील २१ हजार ८०९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, सुमारे २७ हजार ६३१ शेतकरी संकटात सापडले आहेत. पिके ऐन जोमात असताना अचानक आलेल्या अवघ्या ३५ मिनिटांच्या वादळाने शेतकऱ्यांच्या दोन महिन्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले आहे.

या नैसर्गिक आपत्तीमध्ये रब्बीतील प्रमुख पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये सर्वाधिक ८ हजार हेक्टर क्षेत्रावरील मका पिकाचे नुकसान झाले आहे.

त्यासोबतच हरभरा, गहू, केळी, कांदा, बाजरी आणि ज्वारी ही पिकेही आडवी झाली आहेत. ४५५ गावांमधील शेतकरी सध्या मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचा विचार करता, एरंडोल तालुक्यात सर्वाधिक ५ हजार ३९८ हेक्टर क्षेत्रावरील पिकांची नासाडी झाली आहे.


वादळाचा वेग इतका प्रचंड होता की, उभी पिके जमिनीला टेकली असून गारपिटीमुळे फळबागांनाही मोठी इजा झाली आहे. नुकसानीची तीव्रता पाहून कृषी विभागाकडून जिल्हाभरात बाधित क्षेत्राचे पंचनामे करण्याचे काम प्रशासनाकडून सुरू करण्यात आले आहे.

### तालुकानिहाय झालेले नुकसान

| तालुका | बाधित गावं | बाधित शेतकरी | झालेले नुकसान (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|---|
| जळगाव | २१ | ९८९ | ८३७ |
| भुसावळ | ४२ | १,३९० | ७३५ |
| यावल | २९ | ७४६ | ५९१ |
| रावेर | ५७ | १ ,७३७ | १,६७७ |
| मुक्ताईनगर | ५४ | ६,२४३ | ४,६५८ |
| चोपडा | ५७ | ३,३५९ | ३,७२८ |
| एरंडोल | ६५ | ६,०२६ | ५,३९८ |
| धरणगाव | ५४ | २,१०० | १,२०७ |
| पारोळा | ६७ | ४,९५९ | २,९४५ |
| चाळीसगाव | ०९ | ८२ | ३१ |

### पिकांचे झालेले नुकसान (हेक्टरमध्ये)

झालेले नुकसान



लोकमत

# न्यायासाठी तीन दिवस गाव बंद

## ग्रामस्थांची एकजूट, आज विशेष ग्रामसभा

लोकमत न्यूज नेटवर्क

**भुसावळ :** भुसावळ तालुक्यातील एका गावात मंगळवारी घडलेल्या अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणाऱ्या घटनेमुळे जणू काळोख पसरला आहे. दोन अल्पवयीन मुलींच्या अकाली मृत्यूने संपूर्ण गाव हादरून गेले आहे. दरम्यान, गावाची दुःखाची जाणीव प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी संपूर्ण गाव तीन दिवस कडकडीत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

गावातील प्रत्येक घरात शोककळा पसरली आहे. या निष्पाप जिवांच्या आठवणींना उजाळा देत आणि या अमानवी घटनेचा तीव्र निषेध नोंदवण्यासाठी ग्रामस्थांनी एक भावनिक निर्णय घेतला आहे. यात गुरुवारी विशेष ग्रामसभा घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

## ग्रामस्थांची दक्षता समिती

भविष्यात अशा दुर्दैवी घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेत 'दक्षता समिती' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. ही समिती गावातील सुरक्षिततेवर लक्ष ठेवणार असून, संशयास्पद हालचालींवर वेळीच पाऊल उचलण्यासाठी सज्ज राहणार आहे. मुलींच्या सुरक्षेसाठी सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी बुधवारी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच, पोलिस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत दि.२९ रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, मृत मुलींना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी संपूर्ण गाव तीन दिवस बंद ठेवण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

दि. २७ जानेवारी रोजी सकाळी या दोन्ही मुलींची हत्या झाली होती.

## अंगणवाडी, शाळा आणि ग्रामपंचायत कार्यालयही तीन दिवस बंद

या निर्णयानुसार गावातील सर्व शाळा, अंगणवाड्या, ग्रामपंचायत कार्यालय तसेच इतर शासकीय कार्यालये तीन दिवस बंद राहणार आहेत. कोणताही उत्सव, कार्यक्रम किंवा आनंदोत्सव न साजरा करता गाव या काळात शोक पाळणार आहे. 'ही केवळ बंदची घोषणा नाही, तर दोन मुलींवरील अन्यायाविरोधात उठलेला गावाचा आक्रोश आहे,' अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## आरोपींची रवानगी सुधारगृहात

भुसावळ तालुक्यातील अल्पवयीन मुलींच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी दोन अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेतले. या दोघा अल्पवयीन संशयितांना जळगाव येथील विधीसंघर्ष बाल न्यायालयात हजर करण्यात आले. त्यानंतर त्यांची रवानगी सुधारगृहात करण्यात आली आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस उपाधीक्षक केदार बारबोले करीत आहेत.

# रावेर तालुक्यात ५७ गावांत १७३७ शेतकऱ्यांचे नुकसान

## वादळी वाऱ्यांसह गारपीट आणि अवकाळीचे थैमान,१२८ घरांची झाली पडझड

किरण चौधरी
लोकमत न्यूज नेटवर्क



रावेर तालुक्यातील जुनोने शिवारातील कापणीवरील केळीबागा जमीनदोस्त झाल्याचे भीषण नुकसान झाले आहे.

**रावेर :** तालुक्याच्या उत्तरेकडील सातपुडा पर्वतरांगालगतच्या अतिदुर्गम भागासह पायथ्यावरील व पूर्व भागातील ५७ गावांमध्ये मंगळवारी (दि. २७) सायंकाळी वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीने थैमान घातले. ऐन कापणीवर असलेल्या केळीबागा, मका, गहू आणि हरभऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या नैसर्गिक आपत्तीत १,७३७ शेतकऱ्यांच्या १,६७७ हेक्टर क्षेत्रातील पिके जमीनदोस्त झाली असून ८० कोटी ४६ लाख रुपयांच्या नुकसानीचा प्राथमिक अंदाज प्रशासनाने व्यक्त केला आहे. त्यासोबतच तालुक्यात १२८ घरांची पडझड झाली आहे.

मंगळवारी दिवसभर ढगाळ वातावरण होते. सायंकाळी सुमारे सहाच्या सुमारास सातपुड्याकडून वेगवान वादळी वारे सुटले. धुळीचे लोळ उठवत वारे तालुक्याच्या दक्षिण भागाकडे झेपावले. यामुळे शेतीशिवारातील केळीबागा आडव्या पडल्या.

गारपिटीच्या तडाख्यात केळीच्या पानांच्या चिंधड्या उडाल्या, खोडांवर व घडांवर खोल जखमा झाल्या. अवघ्या दोन-तीन महिन्यांत अपेक्षित असलेले उत्पन्न निसर्गाने हिरावून घेतले.

### मका आणि गव्हाचे नुकसान

रब्बी हंगामातील मक्याचे व गव्हाचे पीक पूर्णतः जमीनदोस्त झाले. हरभरा पिकाचा फुलोरा झडून घाटे तुटल्याने मोठे नुकसान झाले. बुधवारी पहाटे शेतात झालेल्या भीषण हानीचे दृश्य पाहून शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू होते. तालुका कृषी अधिकारी भाऊसाहेब वाळके यांनी जिन्सी, पिंप्री, मोरव्हाल, पाल, निमड्या, गारखेडा, लालमाती, कुसुंबा, आभोडा बु. व खुर्द, मोहगण, केऱ्हाळे बु. व खुर्द, अहिरवाडी तसेच पाडळे, निरूळ, खानापूर, मुंजलवाडी, खिरोदा प्र. रावेर, रसलपूर, रावेर आदी गावांतील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली.

### ५०८ हेक्टरवरील केळी जमीनदोस्त

प्राथमिक पाहणीनुसार ५०८.४० हेक्टरवरील केळी पिकांचे ५८ कोटी ७२ लाख २ हजार रुपये, ५३८.३५ हेक्टरवरील मक्याचे ८ कोटी ७ लाख ५२ हजार ५०० रुपये, ४३९ हेक्टरवरील गव्हाचे ४ कोटी ३८ लाख ४० हजार रुपये आणि १९२ हेक्टरवरील हरभऱ्याचे २ कोटी ८७ लाख ९२ हजार ५०० रुपयांचे नुकसान झाले आहे.

दरम्यान, जिन्सी व निमड्या येथील ७७ तसेच अन्य १० गावांतील १५१ घरांची छपरे उडून व भिंती कोसळून ६.४० लाख रुपयांचे नुकसान झाले. एकूण नुकसानीचा आकडा ८० कोटी ४६ लाखांवर पोहोचल्याची माहिती तहसीलदार संजय तायडे व तालुका कृषी अधिकारी भाऊसाहेब वाळके यांनी दिली.

**दै.तरुणभारत** **दि.29 जानेवारी,2026**

तरुण भारत
29 Jan 2026 - Page 8
epaper.tarunbharatlive.com

# रावेर तालुक्यात पावसासह वादळाचा तडाखा; १६७७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

**रावेर, २८ जानेवारी**

तालुक्यात काल मंगळवार सायंकाळी झालेल्या वादळी पावसामुळे व गारपिटीमुळे १७३७ शेतकऱ्यांच्या १६७७ हेक्टर क्षेत्रातील केळी गहू मका व हरभरा पिकांचे नुकसान तर ११ गावातील घरांची पडझड होऊन १२८ घरांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल तयार करण्यात आलेला आहे . आमदार अमोल जावळे यांचे नुकसानग्रस्त भागात तत्काळ पंचनाम्याचे आदेश दिले आहेत.

याबाबतचे वृत्त असे की काल सायंकाळी पाच ते साडेसहाच्या सुमारास रावेर तालुक्यात सर्वत्र वादळी पावसाचा तडाखा व गारपीट झाली . यामुळे तालुक्यातील ५७ गावांना याचा तडाखा बसला . यामुळे केळी, गहू, हरभरा व मका पिकांचे मोठे नुकसान झाले.



यात जिन्सी, पिंप्री, मंगरूळ, अभोडा खुर्द, अभोडा बु., लालमाती, केऱ्हाळे बु.,केऱ्हाळे खूर्द या गाव शिवारातील पिकांचे मोठे नुकसान झाले

पिके शेतकरी संख्या बाधित क्षेत्र व एकूण शेतकरी व बाधित क्षेत्र असे .एकुण गावे ५७, गहू ४४२ शेतकरी, नुकसान क्षेत्र ४३८.४,मका ५५३ शेतकरी,५३८.३५ हे . क्षेत्र, केळी ५४२ शेतकरी ५०८.४ नुकसान क्षेत्र, हरभरा २०० शेतकरी,१९१.९५ हेक्टर क्षेत्र एकुण नुकसान ५७ गावशिवारातील १७३७ शेतकऱ्यांच्या १६७७ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज महसूल व कृषी विभागाने तयार करून तो वरिष्ठांना पाठवण्यात आला आहे . शासनाने त्वरित वस्तुनिष्ठ पंचनामे सादर करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी केली आहे.

**आमदार जावळे यांनी दिले पंचनाम्याचे आदेश**

या घटनेची गंभीर दखल घेत आमदार अमोल जावळे यांनी प्रशासनाला तात्काळ नुकसानग्रस्त भागात पंचनामे करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. शेतकऱ्यांच्या नुकसानीची त्वरित पाहणी करून शासनाकडून योग्य ती मदत मिळावी, यासाठी त्यांनी संबंधित यंत्रणांना सतर्क केले आहे.

तरुण भारत
29 Jan 2026 - Page 2
epaper.tarunbharatlive.com

# आपण दोघे भाऊ, वाळूतून तेल गाळू!

## उत्राण अहिर, उत्राण गुजर येथील दोन तलाठ्यांचा 'प्रताप; ट्रॅक्टरवर कारवाई टाळण्यासाठी तीस हजारांच्या लाचेसह एक लाख ७३ हजारांची रक्कम जप्त

**तभा वृत्तसेवा**
**जळगाव, २८ जानेवारी**

एरंडोल तालुक्यातील उत्राण अहिर येथे गिरणा नदी पात्रात अवैध वाळुचे ट्रॅक्टर पकडले असता त्यावर कारवाई करू नये यासाठी सुरूवातीला २५ हजार रूपयांची लाचेची मागणी केली, परंतु, ट्रॅक्टर सोडल्यानंतर प्रत्यक्ष ३० रूपयांची मागणी करीत लाच घेतल्याप्रकरणी उत्राण अहिर येथे नियुक्त असलेल्या नरेश भास्कर शिरूड आणि शिवाजी एकनाथ घोलप या दोन तलाठ्यांना लाच लुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. तसेच ग्रामपंचायत कार्यालयावरील खोलीत १ लाख ७३ हजार ३०० रुपये रोख, गिफ्ट रॅपरबंद २ हजार ९५० रुपये किंमतीची ७५० मि.ली व्हिस्की बॉटल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

एरंडोल तालुक्यात २७ जानेवारी रोजी उत्राण अहिर येथील तलाठी नरेश भास्कर शिरूड (वय ४१, रा. प्लॉट नं. १३, सर्व्हे नं. १७९, दत्तमंदिरासमोर, वाघनगर जळगाव) याने सकाळी उत्राण अहिर गिरणा नदी पात्रात तक्रारदाराचे अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडले होते. वाळुच्या ट्रॅक्टरवर कारवाई न करता सोडावे यासाठी तलाठी नरेश शिरूड, याने तक्रारदाराकडे २५ हजार रूपयांची मागणी करीत कारवाई न करता ट्रॅक्टर सोडले.



यासंदर्भात तक्रारदाराने लाचलुचपत विभागाकडे तक्रार दाखल केली होती. याची पडताळणी करीत लाचलुचपत विभागाच्या पथकाने सापळा लावला. यात तक्रारदाराकडे ठरल्याप्रमाणे २५ हजार रुपये घेणार नाही. इतरांकडून जास्त घेतो, तू गरीब म्हणून तुझ्याकडून ३० हजार रुपये घेतो, असे सांगत ३० हजार रुपयांची लाच मागणी केली.

**एक लाख ७३ हजारांची रक्कम जप्त**

लाच पडताळणी कारवाईनंतर उत्राण अहिर ग्रामपंचायत कार्यालयाच्या एका खोलीत एरंडोल तालुक्यातीलच उत्राण गुजर येथील दुसरा तलाठी शिवाजी घोलप (रा.रू.नं. ०९, पार्थ इलाईट, हरीओम नगर, आटीलरी सेंटर रोड, नाशिक रोड, नाशिक, मुळ रा. पहुर पेठ, ता. जामनेर) याच्या समवेत उपस्थितीत ३० हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

दरम्यान खोलीत झडती दरम्यान उत्राण अहिर येथील तलाठी नरेश शिरूड याच्या ताब्यातील १ लाख ७३ हजार ३०० रुपये रोख, गिफ्ट रॅपर पॅक २ हजार ९५० रुपये किंमतीची ७५० मि.ली. व्हिस्की बॉटल व मोबाईल फोन आदी मुद्देमाल वस्तू जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी, सुनील बोरगे,यांच्या मार्गदर्शनानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगावचे पोलीस उप अधीक्षक योगेश ठाकूर, पोलीस निरीक्षक स्मिता नवघरे, तपास अधिकारी हेमंत नागरे, पो. अंमलदार प्रदीप पोळ, अमोल सूर्यवंशी, सचिन वाटे यांनी केली.

दै.**नवराष्ट्र** **दि.29 जानेवारी,2026**

नवराष्ट्र Jalgaon | 29 January 2026 | Page 3

# बांगलादेशी संशयावरून पोलिसांची मोठी कारवाई

## महालक्ष्मी इंटरप्राइजेसवर छापा; १०० कामगार ताब्यात

▶ **नशिराबाद, (वा.)** येथील पोलिस स्टेशन अंतर्गत कडगाव शिवारात असलेल्या महालक्ष्मी इंटरप्राइजेस या कंपनीत बांगलादेशी नागरिक काम करत असल्याच्या संशयावरून पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. गुप्त माहितीच्या आधारे नशिराबादच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक योगिता नारखेडे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, २७ जानेवारी रोजी पहाटे पाच वाजता या कंपनीवर छापा टाकण्यात आला.

या कारवाईदरम्यान कंपनीत कार्यरत असलेल्या सुमारे १०० कामगारांना ताब्यात घेण्यात आले आहे. ताब्यात घेतलेल्या सर्व कामगारांची ओळखपत्रे, कागदपत्रे तसेच आधार कार्डची बायोमेट्रिक तपासणी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. नशिराबाद परिसरात झालेली ही आतापर्यंतची मोठी व महत्त्वाची चौकशी कारवाई मानली जात आहे. या प्रकरणाच्या गांभीर्याची दखल घेत जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक महेश्वर रेड्डी, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक तसेच अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नशिराबाद पोलीस स्टेशनला भेट देऊन चौकशीची माहिती घेतली.

### कामगारांची तपासणी

दरम्यान, नशिराबाद पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी रात्री उशिरापर्यंत ताब्यात घेतलेल्या कामगारांची सखोल कागदपत्र तपासणी करत होते. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संपूर्ण व्हेरिफिकेशन पूर्ण झाल्यानंतरच अंतिम निष्कर्ष काढता येणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. सध्या या प्रकरणाकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले असून पुढील चौकशीनंतरच अधिक माहिती समोर येणार आहे.

दै.साईमत

दि.29 जानेवारी,2026

साईमत

# ...अखेर गटारीच्या समस्येतून घेतला सुटकेचा श्वास

## गटार स्वच्छतेची विशेष मोहीम; अतिक्रमण हटवल्याने सांडपाणी निचरा सुरळीत

**पारोळा । प्रतिनिधी ।**

**पारोळा शहरातील मुख्य रथ गल्ली उर्फ लवण गल्ली येथील गटारींमधून गेल्या अनेक वर्षांपासून वाहणाऱ्या दूषित सांडपाण्यामुळे नागरिक हैराण झाले होते. गटारी तुंबल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत असल्याने रहिवाशांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले होते. अखेर पालिका प्रशासनाने या गंभीर समस्येची दखल घेत गटारींची सखोल स्वच्छता करून तसेच त्यावर झालेले अतिक्रमण काढून टाकल्याने ही समस्या मोठ्या प्रमाणात आटोक्यात आली असून, नागरिकांनी दिलासा व्यक्त करत अखेर निसुटकेचा श्वास घेतला आहे.**

रथ गल्ली अथवा लवण गल्ली ही शहरातील मुख्य व वर्दळीची गल्ली म्हणून ओळखली जाते. मात्र येथील गटारींमध्ये वर्षानुवर्षे मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने त्या वारंवार तुंबत होत्या. परिणामी गटारीतील दूषित सांडपाणी रस्त्यावर साचत अथवा वाहत असे. यामुळे नागरिकांना गल्ली वापरणे जिकिरीचे झाले होते. दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि सांडपाण्यामुळे आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याने रहिवासी त्रस्त झाले होते.

या गल्लीत जैन मंदिर तसेच शहराचे आराध्य दैवत श्री बालाजी मंदिर असल्याने येथे येणाऱ्या भाविकांनाही या समस्येला वारंवार सामोरे जावे लागत होते. विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर होत असून नागरिकांसह शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची चर्चा होती.



या समस्येबाबत रहिवाशांनी वेळोवेळी पालिका प्रशासनाकडे निवेदने व तक्रारी दिल्या होत्या. मात्र केवळ तात्पुरत्या स्वरूपात गाळ काढून गटारी मोकळ्या केल्या जात असल्याने समस्या कायमस्वरूपी सुटत नव्हती. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. गेल्या चार वर्षांच्या प्रशासकीय काळात परिस्थिती 'जैसे थे'च राहिल्याची भावना नागरिकांमध्ये होती.

मात्र आता नगरपरिषदेवर लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शहरात बदल घडताना दिसत आहे. पालिका प्रशासनाने गटार स्वच्छतेची विशेष मोहीम हाती घेत रथ गल्लीतील तुंबलेल्या गटारींचा तळापर्यंत साचलेला संपूर्ण गाळ काढण्यात आला. तसेच गटारींवर अतिक्रमण करून बांधलेले ओटे, पायऱ्या व ढापे काढून टाकण्यात आल्याने सांडपाण्याचा निचरा सुरळीत झाला आहे.

या कारवाईनंतर परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, अनेकांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र भविष्यात पुन्हा अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी नियमित गटार स्वच्छता व देखभाल करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच गटारींमध्ये कचरा, पिशव्या टाकू नयेत आणि कोणतेही अतिक्रमण करू नये, असे आवाहनही पालिका प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

दरम्यान, ही अनेक वर्षांपासूनची गंभीर समस्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, पालिका आरोग्य सभापती तथा नवनिर्वाचित नगरसेवक डॉ. मंगेश तांबे, नितीन सोनार व इतर नगरसेवकांच्या प्रयत्नातून मार्गी लागत असल्याचे चित्र आहे. शहरात नियमित साफसफाई व स्वच्छतेवर भर देण्यात येईल, नागरिकांचे सर्वांगीण हित जोपासले जाईल आणि यासाठी नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

**दै.देशदूत** **दि.29 जानेवारी,2026**

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
29 Jan 2026 - Page 5A

# फुलगाव ग्रामपंचायत प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश रद्द

## अपर विभागीय आयुक्तांचा दिलासा; दोन ग्रामपंचायत सदस्य पुन्हा पात्र

**वरणगाव, ता.भुसावळ । वार्ताहर**

तालुक्यातील फुलगाव ग्रामपंचायतीतील सदस्य मनोज विश्वनाथ कोलते व कृष्णा सुकलाल वाघ यांच्याविरोधात जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिलेला अनर्हतेचा आदेश अपर विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांनी रद्द केला आहे. त्यामुळे संबंधित दोन्ही ग्रामपंचायत सदस्य पुढील आदेश होईपर्यंत पात्र ठरले आहेत.

या संदर्भात जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे ग्रामपंचायत विवाद अर्ज क्रमांक १५०/२०२५ दाखल करण्यात आला होता. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १४ (ह) अंतर्गत गटविकास अधिकारी, पंचायत समिती भुसावळ, ग्रामपंचायत अधिकारी फुलगाव व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांच्या वतीने हा दावा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी संबंधित दोन्ही सदस्यांना अनर्ह ठरविण्याचा आदेश दिला होता. या आदेशाविरोधात श्री.कोलते व श्री.वाघ यांनी अपर विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांच्याकडे ग्रामपंचायत अपील क्रमांक १४३/२०२५ दाखल केले होते. अपीलाची सुनावणी व लेखी युक्तिवादानंतर अपर विभागीय आयुक्तांनी दि.१४ जानेवारी २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय देत जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिलेला आदेश रद्द केला आहे. अपर विभागीय आयुक्तांच्या या आदेशामुळे फुलगाव ग्रामपंचायतीतील राजकीय व प्रशासकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली असून, संबंधित दोन्ही सदस्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयाची नोंद संबंधित प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी अर्जदारांनी केली आहे. या निर्णयामुळे ग्रामपंचायत फुलगाव येथील सत्तासंतुलनावर काय परिणाम होतो, याकडे स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.

**दै.नवराष्ट्र** **दि.29 जानेवारी,2026**

नवराष्ट्र Jalgaon | 29 January 2026 | Page 3

## दुरुस्त करा \ नशिराबाद-भादली रेल्वेस्थानक रस्त्याची दुरवस्था

# प्रवाशी 'मृत्यूच्या' सावटाखाली

▶ नशिराबाद, (वा.) नशिराबाद ते भादली रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची सध्या अत्यंत दुरवस्था झाली असून, या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण देण्यासारखे झाले आहे. तात्काळ या रस्त्याची दुरुस्तीची मागणी प्रवाशांसह शेतकऱ्यांनी केली आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, प्रवाशांसह शेतकऱ्यांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या समस्येकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी आर्त हाक स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांनी दिली आहे.

हा रस्ता शेतीकामासाठी महत्त्वाचा असल्याने दररोज शेकडो शेतकरी बैलगाड्या आणि मोटारसायकलने या मार्गावरून ये-जा करतात. रस्त्यावरील जीवघेण्या खड्ड्यांमुळे बैलगाड्यांचे आस तुटणे, चाके निखळणे अशा घटना नित्याच्या झाल्या आहेत. तसेच, दुचाकीस्वारांना पाठीचे आणि मणक्याचे आजार जडू लागले आहेत.



## प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष....

रस्त्याच्या दुरुस्तीसाठी स्थानिक ग्रामस्थांनी वारंवार निवेदने दिली, परंतु प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळत असल्याचा आरोप होत आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने खोलीचा अंदाज येत नाही, ज्यामुळे रात्रीच्या वेळी प्रवास करणे अशक्य झाले आहे.

## ३ किमीचा प्रवास, तासाभराचा त्रास...

- नशिराबादपासून भादली रेल्वे स्थानकाचे अंतर अवघे ३ किलोमीटर आहे.
- मात्र, या रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे हे अंतर पार करण्यासाठी वाहनधारकांना अर्ध्या ते एक तासाचा वेळ लागत आहे.
- रेल्वे पकडण्यासाठी जाणाऱ्या प्रवाशांची यामुळे मोठी ओढाताण होत असून, अनेकदा खड्ड्यांमुळे गाडी घसरून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत.

" आम्हाला रोज शेतात जावे लागते तसेच रात्री पाणी सोडण्यासाठी जावे लागते, पण या रस्त्यामुळे आमची वाहने खराब होत आहेत. बैलगाडी खड्ड्यात अडकली की बैलांनाही इजा होते. प्रशासनाने आता तरी जागे व्हावे आणि हा रस्ता दुरुस्त करावा.

— एक स्थानिक शेतकरी

# जिल्हा नंदुरबार

**दै.लोकमत** **दि.29 जानेवारी,2026**

लोकमत
जळगाव, गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६

# केवळ ज्येष्ठतेमुळे नाही मिळणार बढती; आता टीईटी परीक्षा सक्तीची

## जिल्ह्यात शिक्षकांची तयारी; शालेय शिक्षण विभागाचा मोठा निर्णय; पदोन्नतीत गुणवत्ता व पात्रतेला प्राधान्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** शिक्षक संवर्गातून पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदांवर पदोन्नती मिळविण्यासाठी आता शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे अनिवार्य करण्यात आले आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भात शासन निर्णय (जीआर) जारी केल्याने केवळ ज्येष्ठतेच्या आधारे दिल्या जाणाऱ्या बढत्यांना थेट लगाम बसणार आहे. परिणामी वर्षानुवर्षे सेवा दिलेल्या, प्रमोशनच्या प्रतीक्षेत असलेल्या शिक्षकांमध्ये नाराजी पसरली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार, टीईटी परीक्षा केवळ नवीन भरतीसाठीच नव्हे, तर पदोन्नतीसाठी आणि सेवेत टिकून राहण्यासाठीही सक्तीची करण्यात आली आहे. पहिली ते आठवीपर्यंत अध्यापन करणारे सर्व शिक्षक, तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना पदोन्नती हवी असल्यास टीईटी अपरिहार्य ठरविण्यात आली आहे. यामुळे पदोन्नतीची स्वप्ने रंगविणाऱ्या शिक्षकांच्या स्वप्नांवर न्यायालयीन शिक्का बसला आहे. यामुळे पदोन्नतीसाठी प्रयत्नशील असलेल्या शिक्षकांना ही परीक्षा उत्तीर्ण करण्याची कसोटी पार करावी लागणार आहे.

### या पदांवर मिळते पदोन्नती

टीईटीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी (शिक्षण) आदी पदावर पदोन्नती मिळते.

### आता 'टीईटी'शिवाय पदोन्नती नाहीच

नवीन शासन निर्णयानुसार टीईटी उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकांना पदोन्नती देता येणार नाही. त्यामुळे पदोन्नतीसाठी पात्रता व परीक्षा अनिवार्य झाली आहे.

### ज्येष्ठतेऐवजी गुणवत्ता व पात्रतेला प्राधान्य

आतापर्यंत ज्येष्ठतेच्या आधारे बढती मिळत होती; मात्र आता गुणवत्ता, अध्यापन कौशल्य आणि टीईटी पात्रतेला प्राधान्य दिले जाणार आहे.

**२ ते ३**

टक्क्यांवरच निकाल अडकत असल्याचे दिसून येत आहे. शिक्षकांवर अतिरिक्त कामाचा ताण असल्याने दमछाक होत आहे.



### शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा जीआर जारी

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने हा निर्णय अंमलात आणत स्पष्ट केले आहे की, गुणवत्ताधारित पदोन्नती हीच पुढील धोरणात्मक दिशा असेल.

### ज्येष्ठ शिक्षकांसमोर उत्तीर्ण होण्याचे मोठे आव्हान

दीर्घ सेवाकाळ असलेल्या अनेक शिक्षकांनी आजवर टीईटी दिलेली नाही. अशा शिक्षकांसाठी आता ही परीक्षा उत्तीर्ण होणे मोठे आव्हान ठरणार आहे. त्यामुळे आता जिल्ह्यातील या ज्येष्ठ शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे. आतापासूनच काही शिक्षक तयारीला लागल्याचे दिसून येत आहे. परीक्षेची माहिती घेण्यासाठी अनेकांनी स्पर्धा परीक्षा केंद्रांनाही संपर्क केल्याची सांगण्यात येत आहे. यामुळे शिक्षकही अभ्यासाला लागणार आहे.

### टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांची मुदत

टीईटी न उत्तीर्ण शिक्षकांना पदोन्नतीसाठी दोन वर्षांची मुदत देण्यात आली आहे. या कालावधीत परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

### जिल्ह्यातील बऱ्याच शिक्षकांवर गंडांतर

या निर्णयाचा जिल्ह्यातील बऱ्याच शिक्षकांवर परिणाम होणार असून, अनेकांची पदोन्नती थांबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शिक्षक चिंतेत सापडले आहे.

### पाच वर्षे उरलेल्यांना दिलासा

सेवानिवृत्तीला पाच वर्षांपेक्षा कमी कालावधी उरलेल्या शिक्षकांना या निर्णयातून काही प्रमाणात दिलासा देण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेकडो शिक्षकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

### तीन टक्केच लागला टीईटीचा निकाल

१. वर्ष २०२५ मध्ये घेतलेल्या टीईटी परीक्षेचा निकाल १६ जानेवारी २०२६ रोजी जाहीर झाला.

२. केवळ तीनच टक्के निकाल लागला. मागील काही वर्षांपासून टीईटीच्या निकालाची टक्केवारी वाढतच नसल्याचे चित्र आहे.

३. केवळ दोन ते तीन टक्क्यांवरच निकाल अडकत असल्याचे दिसून येत आहे. शिक्षकांवर अतिरिक्त कामाचा मोठा ताण राहत असल्याने टीईटीची तयारी, शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करताना मोठी दमछाक होत असल्याचे दिसून येत आहे.

४. जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळा अनुदानित शाळा, माध्यमिक शाळा, या ठिकाणी कार्यरत शिक्षक सध्या टीईटी बाबत सातत्याने माहिती घेत पुढील तयारीला लागले.

लोकमत

मस्ट READ

# 'दादांचे पालकत्व लाभावे, हे नंदुरबारकरांचे स्वप्न राहिले अधुरे!

## अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा...

रमाकांत पाटील
लोकमत न्यूज नेटवर्क



**नंदुरबार :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली जाण्याने नंदुरबार जिल्ह्यातही शोककळा पसरली असून, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंच्या आठवणींनी दुःखाचे सावट पसरले आहे. विशेषतः नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्रिपद अजितदादा यांनी स्वीकारावे, अशी गळ जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी गेल्या काही दिवसांपासून त्यांना घातली होती. त्यावर त्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला होता. मात्र, त्यांना जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून पाहण्याचे जिल्हावासियांचे स्वप्न अधुरेच राहिले आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात गेली तीन दशके अजित पवार यांचा दबदबा राहिला आहे. या काळात अनेकवेळा ते नंदुरबार जिल्ह्यात आले. कधी विकास प्रकल्पांचे भूमिपूजन, कधी अधिकाऱ्यांची बैठक, कधी निवडणूक प्रचार तर कधी पक्षाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा अशा विविध कार्यक्रमांसाठी ते या भागात आले.

मात्र, प्रत्येकवेळी ते आपल्या व्यक्तिमत्त्वाची वेगळी छाप सोडून कार्यकर्ते व नागरिकांनाही मोहित करून जात असे. दैनंदिन व्यवहाराचा कामाबरोबरच येथील धान्य, शेती, माती, पर्यावरण, लोकसंस्कृती याबाबत बारकाईने लोकांमध्ये मिसळून जाणून घेत.

### पदाधिकारी व कार्यकर्त्यांची घातली होती गळ...

नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्रिपद हे महायुतीच्या सत्तेत राष्ट्रवादी (अजित पवार)कडे आहे. माजी पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्यानंतर हे पद रिक्त आहे. त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्रिपद स्वतः अजितदादा यांनी आपल्याकडे घ्यावे, अशी कार्यकर्त्यांची मागणी होती. राष्ट्रवादी (अजित पवार)चे जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजित मोरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी त्यासाठी त्यांना गळही घातला होता. त्यामुळे किमान वर्षभर अजितदादा यांच्याकडे नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्रिपद राहील, असे संकेत होते.

### जिल्हा विकासासंदर्भात बैठक घेणार होते...

निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे घडामोडी थांबल्या होत्या. आचारसंहिता संपताच अजितदादा नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्रिपद स्वीकारतील, अशी कार्यकर्त्यांना अपेक्षा लागून होती. त्यामुळे विकासाचे विविध स्वप्नही कार्यकर्त्यांनी रंगविले होते. आचारसंहिता संपताच जिल्ह्याच्या विकासासंदर्भात बैठक घेण्याचे त्यांनी मान्य केले होते. मात्र, दादांच्या अकाली जाण्याने नंदुरबारकरांचे हे स्वप्न अधुरेच राहिले...

### तांदूळ आवडल्याने जाणून घेतली होती माहिती...

नंदुरबार येथील शासकीय विश्रामगृहावर जेवण करीत असताना त्यांना भाताची चव आवडली. त्यांनी तत्काळ खानसामाला बोलावून तांदूळ संदर्भातील माहिती व बनविण्याची पद्धतही जाणून घेतली.

हा तांदूळ कुठे पिकतो, त्याचे वाण कसे, यासंदर्भातील सर्व माहिती त्यांनी कार्यकर्त्यांकडूनही जाणून घेतली होती. एवढेच नव्हे तर तो तांदूळ स्वतः मागवून त्यांनी सोबतही नेला होता.

### स्ट्रॉबेरीची चव चाखत केली होती स्तूती...

जिल्ह्याच्या विकासाच्या एका बैठकीत सातपुड्यातील स्ट्रॉबेरीची चव चाखून पाहिली. नव्हे तर बैठकीतच या स्ट्रॉबेरीचे कौतुक करून आमच्या महाबळेश्वर पेक्षा सातपुड्यातील स्ट्रॉबेरीची चव अधिक चांगली असल्याचे सांगून तेथेच प्रशासनाला स्ट्रॉबेरी उत्पादनाला प्रोत्साहन देण्याची सूचना केली होती.

एका पक्षाच्या पदाधिकाऱ्याच्या घरी गेल्यावर सर्व कार्यकर्त्यांसमोर त्या पदाधिकाऱ्याला 'बंगला मोठा बांधला; पण झाडे नाही लावले हा बंगला काही कामाचा नाही. आमच्याकडे आधी घराचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी झाडे लावतो नंतर बांधकाम सुरू करतो.' असा उपदेश करीत पर्यावरणाच्या जागृती संदर्भात संदेश दिला.



लोकमत

# जिल्ह्यातील पहिले मेनॉपॉज क्लिनिक सुरू

## धानोरा ग्रामीण रुग्णालयात प्रारंभ, महिलांना उपचार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** राज्य शासनाच्या संकल्पनेतून नंदुरबार जिल्ह्यातील धानोरा ग्रामीण रुग्णालयात महिलांसाठी जिल्ह्यातील पहिले मेनॉपॉज (रजोवृत्ती) क्लिनिकचा शुभारंभ करण्यात आला आहे. याठिकाणी ४५ वर्षांवरील महिलांवर उपचार आणि समुपदेशन करण्यात येणार आहे.

राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून देशातील पहिले 'मेनोपॉज क्लिनिक' महाराष्ट्र राज्यात सुरू करण्यात आले आहे. याअंतर्गत नंदुरबार जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनय सोनवणे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नरेश पाडवी यांच्या मार्गदर्शनात नंदुरबार जिल्ह्यातील पहिले क्लिनिक धानोरा ग्रामीण रुग्णालयात सुरू करण्यात आले आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रीती पटले यांच्या नेतृत्वात याठिकाणी महिलांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.



धानोरा येथील ग्रामीण रुग्णालयात मेनोपॉज क्लिनिकच्या शुभारंभप्रसंगी परिसरातील महिला. सोबत डॉ. प्रीती पटले, शुभांगी बाविस्कर, डॉ. अल्पेशा वळवी.

### दर बुधवारी महिलांवर उपचार व समुपदेशन

या क्लिनिकच्या माध्यमातून रजोनिवृत्ती काळातील महिलांना भेडसावणाऱ्या विविध शारीरिक व मानसिक समस्यांवर समुपदेशन, तपासणी, उपचार व मार्गदर्शन दर बुधवारी करण्यात येणार आहे. महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार आहे. या क्लिनिकमध्ये बुधवारी (दि. २८) रोजी अधिपरिचारिका शुभांगी बाविस्कर यांच्या संकल्पनेतून ४५ वर्षांवरील महिलांना कॅल्शियम व विटामिन डीचा गोळ्या देण्यात आल्या. यशस्वीतेसाठी डॉ. अल्पेशा वळवी, दीपक वाघ, मधुसूदन वाघमारे, शरद वळवी, सुभाष मावची, गणेश पवार यांनी परिश्रम घेतले. या क्लिनिकचा नंदुरबार तालुक्यातील महिलांनी लाभ घेण्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रीती पटले यांनी कळविले आहे.

लोकमत

# अवकाळीच्या शिडकाव्यानंतर आता जिल्ह्यात थंडीची लाट

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार** : अवकाळी पावसाच्या शिडकाव्यानंतर आता जिल्ह्यात थंडीची लाट आली आहे. बुधवारी पहाटे किमान तापमान ११ अंश नोंदले गेले आहे. यंदाच्या हिवाळ्यातील ही दुसऱ्यांदा आलेली थंडीची लाट आहे. तोरणमाळ आणि डाब हे सातपुड्यातील उंचावरील ठिकाणांवर किमान तापमान आणखी कमी असल्याचे सांगण्यात आले.

**११**
अंशापर्यंत किमान तापमान बुधवारी नोंदले गेले.

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून थंडीचे प्रमाण कमी झाले होते. वातावरणातील आद्रता वाढल्याने दुपारी काही प्रमाणात उकाडा व रात्री थंडी असे वातावरण राहत होते; मात्र २६ जानेवारी रोजी वातावरणातील बदलानंतर मंगळवारी जिल्ह्यातील काही भागात तुरळक पावसाच्या सरी कोसळल्या होत्या. शहादा, धडगाव भागात मध्यम ते हलक्या स्वरूपात पावसाच्या सरी कोसळल्या; परंतु जिल्ह्यालगत असलेल्या शिरपूर तालुक्यात पावसाचा जोर अधिक होता. त्यामुळे आता वातावरणात गारवा निर्माण होऊन थंडीची लाट देखील आली आहे.

बुधवारी पहाटे किमान तापमान हे ११ अंशापर्यंत घसरले होते. शिवाय बुधवारी दिवसभर गारठा देखील कायम होता, त्यामुळे दिवसाचे कमाल तापमान हे २९ अंशापर्यंत राहिले.

थंडीची लाट आणखी काही दिवस राहणार असली तरी पावसाचीही शक्यता काही दिवस असल्याचे कृषी हवामान केंद्रातर्फे सांगण्यात आले.

सातपुड्यात सध्या गावरान आंब्याला चांगला मोहर आला आहे. अवकाळी पावसामुळे या मोहराचे देखील नुकसान होऊ शकते. असे बोलले जात आहे.

लोकमत

# दुपारनंतर कार्यालये व शाळांमध्ये शुकशुकाट

## शासकीय दुखवटा, तिरंगा उतरविला अर्ध्यावर

लोकमत न्यूज नेटवर्क



**नंदुरबार :** सकाळी गजबजलेल्या शाळा, शासकीय कार्यालयांमध्ये मात्र दुपारी १२ वाजेनंतर शुकशुकाट दिसून आला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने राज्य शासनाने शासकीय सुटी जाहीर केल्याने दुपारी १२ वाजेनंतर शाळा सोडून देण्यात आल्या होत्या.

दरम्यान, तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केल्याने शासकीय कार्यालयावरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात आला आहे.

बुधवारी सकाळच्या आणि दुपारच्या सत्रातील शाळा नियमितपणे भरल्या. शाळा परिसरात किलबिलाट देखील सुरू झाला. परंतु दुपारी १२ वाजता राज्य शासनाने दुखवटा म्हणून शासकीय सुटी जाहीर केली. सर्व शाळा मुख्याध्यापकांना व्हॉट्सॲपवर काहींना फोन करून शाळा लागलीच सोडून देण्यास सांगण्यात आले. त्यामुळे दुपारी एक ते दीड वाजेनंतर सर्व शाळा सोडून देण्यात आल्या. त्यामुळे शाळा परिसरात शुकशुकाट दिसून आला.

अशीच स्थिती शासकीय कार्यालयांमध्ये देखील दिसून आली. सकाळी साडेनऊ वाजता नेहमीप्रमाणे कार्यालये सुरू झाली. त्यानंतर काही वेळातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाची वार्ता येऊन धडकली. शासकीय पातळीवर दुखवटा जाहीर करण्यात आला आणि शासकीय सुटी देखील जाहीर करण्यात आली. सर्व कार्यालय प्रमुखांना याबाबत कळविण्यात आल्यानंतर कार्यालये बंद झाली. गेल्या अनेक वर्षांनंतर कार्यालये सुरू होऊन दोन ते तीन तासात बंद होण्याची ही पहिलीच वेळ ठरली.

**१२** वाजता दुपारी शासकीय आदेश प्राप्त झाल होता.

दुखवटा असल्याने सर्वच शासकीय कार्यालयांवरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात आला. तीन दिवस आता कुठलाही शासकीय कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम होणार नाहीत.



नंदुरबारनजीक भोणे शिवारातील वीट भट्टींची पाहणी करून तेथील भट्टी चालकांशी चर्चा करतांना सहायक जिल्हाधिकारी अंजली शर्मा.

**दै.सकाळ** **दि.29 जानेवारी,2026**

सकाळ

# तीनशेवर ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक ?

## धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील निवडणुका लांबणीवरचा परिणाम

■ सकाळ वृत्तसेवा

**धुळे, ता. २८: राज्यातील एकूण १४ हजार २४० ग्रामपंचायतींचा कार्यकाळ फेब्रुवारीपासून संपत आहे. मात्र, निवडणुकीसाठी आवश्यक पूर्वतयारी पूर्ण न झाल्यामुळे या सर्व ठिकाणी निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ शकतात. त्या पार्श्वभूमीवर ग्रामविकास विभागाचे अपर सचिव म. आसोले यांनी २३ जानेवारीला आदेश काढले. त्यानुसार, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांतील सुमारे तीनशे ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया सुरू होणार आहे.**

### सरपंचांकडून मागण्या

विद्यमान सरपंचांकडून प्रशासक म्हणून त्याच्याच नियुक्तीची मागणी करण्यात येत असली तरी, या वेळी प्रशासक पदावर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी कार्यभार सांभाळणार आहेत. या निर्णयामुळे सरपंच संघटना काही प्रमाणात असंतुष्ट आहे.




### पूर्वतयारी नाही

कार्यकाळ संपणाऱ्या ग्रामपंचायतींत प्रभागरचना, आरक्षण आणि मतदार यादी अद्याप तयार नाही. या प्रक्रियेला किमान तीन ते चार महिन्यांचा कालावधी आवश्यक असतो. त्यामुळे निवडणुका किमान सहा महिन्यांनी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### प्रशासकांची शक्यता

अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार धुळे जिल्ह्यात २१८, नंदुरबार ८७, जळगाव ७८३, नाशिक ६२१ व अहिल्यानगर जिल्ह्यात ७६७ ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती होऊ शकते. पूर्वतयारी न झाल्यामुळे ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रशासकांची नियुक्ती ही तातडीची गरज बनली आहे. यामुळे प्रशासनाला नागरिकांच्या सेवेसाठी मार्गदर्शन सुनिश्चित करण्याची जबाबदारी पुढे येत आहे.

### इतिहासाची आठवण

**■ प्रभागरचना २०२० मध्ये जुलैपासून सुरू झाली होती. डिसेंबरमध्ये प्रारूप यादी तयार झाली आणि १५ डिसेंबरपासून निवडणूक प्रक्रिया सुरू झाली होती. १५ जानेवारी २०२१ ला मतदान झाले. यंदा मुदत संपत असतानाही प्राथमिक तयारीसाठी आदेश जारी नाहीत. यापूर्वी मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये २६ सप्टेंबर १९९४ ते ७ मे १९९५ दरम्यान ग्रामविस्तार अधिकाऱ्यांऐवजी विद्यमान सरपंच यांनाच प्रशासक म्हणून नियुक्त केले गेले होते.**

Dhule, Dhule-Today
29/01/2026 Page No. 2

सकाळ

# शहादा पोलिस ठाण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ द्या

## शिवसेनेची गृहराज्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

■ सकाळ वृत्तसेवा

**शहादा, ता. २८ : येथील पोलिस ठाण्याचे विभाजन करण्यासह पुरेसे अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देण्याची मागणी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे शिवसेनेचे तालुकाप्रमुख मनलेश जयस्वाल यांनी निवेदनाद्वारे केली.**

निवेदनात म्हटले आहे की, शहादा शहरातील पोलिस स्टेशनला लोकसंख्येनुसार तत्काळ पुरेसा कर्मचारी व अधिकारी वर्ग उपलब्ध करून देण्यासह पोलिस स्टेशन विभाजित करून शहादा शहर व शहादा ग्रामीण भागासाठी स्वतंत्र पोलिस ठाण्याची निर्मिती करावी. शहादा तालुक्यात दोन राज्यांच्या सीमा असल्याने या भागातून आंतरराज्य गुन्हेगार अवैधरित्या दारूची तस्करी, शस्त्र, रेशनचे धान्य, गौण खनिज, वनसंपत्तीची तस्करी करीत असतात. तसेच, घरफोडी, चारचाकी, दुचाकी वाहनांची चोरी केली जाते. संबंधित पोलिस ठाण्यात वेळोवेळी मोठ्या प्रमाणावर गुन्ह्यांची नोंद केली जाते. मात्र, कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे तपास कार्यात अडथळा निर्माण होत असल्याचे स्पष्ट दिसून येते. जिल्हा निर्मितीनंतर कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे.

शहर व ग्रामीण भागाचा विस्तार झपाट्याने वाढत आहे. त्या तुलनेत पोलिसांचे संख्याबळ कमी आहे. लवकर शहादा पोलिस ठाण्याचे विभाजन करून शहर व ग्रामीण भागाकरीता स्वतंत्र वेगळे पोलिस ठाणे निर्माण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. याबाबतचा अहवाल मिळाल्यावर तत्काळ कार्यवाही करून शहादा पोलिस ठाण्याचे विभाजन करण्यास मान्यता देण्यात येईल, असे आश्वासन मंत्री योगेश कदम यांनी दिले.

या वेळी आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार आमश्या पाडवी, शिवसेना जिल्हाप्रमुख राम रघुवंशी, जिल्हाप्रमुख गणेश पराडके आदी उपस्थित होते. निवेदनावर शिवसेनेचे शहादा तालुकाप्रमुख मनलेश जयस्वाल, नगरसेवक जितेंद्र जमदाडे, युवासेना जिल्हा उपप्रमुख राजरत्न बिरारे, जयसिंग ठाकरे, लक्ष्मण पवार, प्रा. विजय गायकवाड, कौस्तुभ मोरे, अंकुश लोहार यांच्या सह्या आहेत.



**नंदुरबार :** गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना निवेदन देताना शिवसेनेचे तालुकाप्रमुख मनलेश जयस्वाल व पदाधिकारी.

Dhule, Nandurbar-Today
29/01/2026 Page No. 1

सकाळ

# 'मनरेगा'तील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करा

## अधिकारी-कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून आंदोलन

■ सकाळ वृत्तसेवा

नंदुरबार, ता. २८ : महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्यात यावे, या प्रमुख मागणीसह विविध मागण्या करीत मनरेगा कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्मरणपत्र देत २३ जानेवारीपासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. आंदोलनाच्या पहिल्या टप्यात काळ्या फिती लावून शासनाचा निषेध करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, तहसील कार्यालय, पंचायत समिती अशा विविध कार्यालयांमध्ये मनरेगाचे कंत्राटी अधिकारी, कर्मचारी विविध पदांवर कार्यरत आहेत. इतर समकक्ष योजनांतील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्याबाबत अथवा आवश्यक संरक्षण प्रदान करण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेतले. मात्र, कर्मचाऱ्यांबाबत अद्याप ठोस निर्णय झाला नाही. शासनाकडून याची दखल घेण्यात न आल्याने स्मरणपत्र देऊन शुक्रवारपासून आंदोलन झाले. दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे. गटविकास अधिकाऱ्यांमार्फत मागण्यांचे निवेदन संघटनेच्या शिष्टमंडळाद्वारे शासनाला देण्यात आले.

या वेळी तहसील कार्यालय व पंचायत समितीसमोर घोषणा देत निषेध करण्यात आला. डीपीओ गजानन मराठे, दर्पण शहा, विजय बागूल, श्रेया पवार, प्रतिक पगारे, राहुल बोरसे, संदीप वाडीले, मिलिंद पाडवी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

### या आहेत मागण्या

■ 'रोहयो'च्या सर्व कंत्राटी अधिकारी, कर्मचाऱ्यांना इतर योजनेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे शासन सेवेत नियमित समायोजन करावे, एस २ इन्फोटेक कंपनी-मार्फत भरती रद्द करुन त्याऐवजी सर्व कर्मचाऱ्यांना राज्य निधी असोसिएशनमार्फत नियुक्ती देवून समान काम, समान वेतन धोरण लागू करण्यात यावे, इतर वि-भागाप्रमाणेच मनरेगा विभागाची स्वतंत्र यंत्रणा तयार करून पदनि-हाय आकृतिबंध तयार करण्यात यावा, यांसह विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.

Dhule, Nandurbar-Today
29/01/2026 Page No. 1

**दै.दिव्यमराठी** **दि.29 जानेवारी,2026**

दिव्य मराठी धुळे सिटी 29-01-2026

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ




राष्ट्रीय मतदार दिनी प्रतिज्ञा घेताना विविध मान्यवर.

**प्रतिनिधी** | नंदुरबार

२५ जानेवारी रोजी १६ वा राष्ट्रीय मतदार दिन जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये लोकशाहीवर निष्ठा ठेवून मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याची प्रतिज्ञा करण्यात आली. अशी माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी कल्पना ठुबे यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शपथ घेतली. जिल्हास्तरीय कार्यक्रम मिशन हायस्कूलमध्ये परिसंवाद, विविध चर्चासत्रे आणि स्पर्धांसह आयोजित करण्यात आला. तसेच शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृह येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा संदेश यावेळी प्रसारित करण्यात आला. मतदानाची शपथ घेण्यात आली. विद्यार्थिनींना जागृत मतदार, मतदाराचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, सहाय्यक जिल्हाधिकारी अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, उपजिल्हाधिकारी प्रमोद भामरे, शाम वाडकर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी कल्पना ठुबे आदी उपस्थित होते.

दिव्य मराठी

धुळे सिटी 29-01-2026



प्रकाशा येथे होणारी वाहतुकीची कोंडी. यावेळी मोठमोठ्या

# प्रकाशात वाहतूक कोंडीची समस्या वाढली, वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष

प्रतिनिधी | प्रकाशा

शहादा तालुक्यातील प्रकाशा येथे वाहतुकीच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. बऱ्हाणपूर-अंकलेश्वर राज्य महामार्ग असल्यामुळे दिवस-रात्र वाहतूक सुरू असते. प्रकाशा चौफुलीवर वारंवार वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्याच्या मागणीकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे.

अवजड ट्रक, ट्रेलर, कंटेनर या वाहनांच्या चालकांमध्ये शिस्तीचा अभाव आणि वाहतुकीचे नियम डावलून अहोरात्र सुरू असलेली अवजड वाहतूक हे त्या मागचे प्रमुख कारण आहे. गंभीर रुग्णांना नेणाऱ्या रुग्णवाहिका देखील या वाहतुकीच्या कोंडीत अडकून पडल्या असल्याचे चित्र समोर येत आहे. काही दिवसांपासून तर रोज वाहतूक ठप्प होत आहे. सध्या सुरू असलेल्या ऊस वाहतुकीमुळे दिवसभरात पाच ते दहा वेळा वाहनांची या ठिकाणी मोठी रांग लागत आहे. सकाळी शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना जीव मुठीत घेऊन रस्त्यावर चालावे लागते. या समस्येमुळे नागरिकांना आणि प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

दिव्य मराठी धुळे सिटी 29-01-2026

# शासन उदासीनतेचा केला मनरेगा कर्मचाऱ्यांनी निषेध

प्रतिनिधी | खापर

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने राज्यभर आंदोलनाला सुरुवात झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर अक्कलकुवा तालुक्यातील मनरेगा कर्मचाऱ्यांनी तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन देत शासनाच्या उदासीनतेचाही निषेध नोंदवला. तर विविध मागण्यांसंदर्भात अक्कलकुवा-अक्राणी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आमश्या पाडवी यांना देखील निवेदन देण्यात आले.

नियमितीकरण, सेवा-सुरक्षा व समान वेतन या मूलभूत मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, १२ जानेवारी रोजी दिलेल्या निवेदनानंतरही शासनाने या मागण्यांबाबत ठोस निर्णय न घेतल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. त्यामुळे २३ जानेवारी २०२६ पासून राज्यभर काळ्या फिती लावून काम करत ठिय्या आंदोलनही करण्यात येत आहे. तरीही मागण्या मान्य न झाल्यास पुढील टप्प्यात उपोषण व कामबंद आंदोलन करण्याचा इशाराही कर्मचाऱ्यांनी दिला.

दिव्य मराठी धुळे सिटी 29-01-2026

# कोठली येथून दीड लाख रुपयांच्या 30 मेंढ्या लंपास

प्रतिनिधी | नंदुरबार

पहाटेच्या सुमारास आलेल्या चोरट्यांनी मेंढ्यांच्या कळपातून सुमारे १ लाख ४२ हजार रुपये किमतीच्या ३० मेंढ्या चोरून नेल्याची घटना कोठली येथे घडली. या प्रकरणी नंदुरबार उपनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

नंदुरबार तालुक्यातील शनि मांडळ हंद्रीहट्टी येथील पंकज पांडुरंग चांडे या मेंढपाळाने कोठली गावाजवळील टाकली पाडा शिवारात शेतात मेंढ्यांचा पडाव टाकलेला आहे. बुधवारी पहाटे साडेपाच वाजेच्या सुमारास चारचाकी वाहन घेवून आलेल्या अज्ञात व्यक्तींनी मेंढ्यांच्या कळपातून १ लाख ४२ हजारांच्या ३० मेंढ्या चोरुन नेल्या आहेत. यात ७२ हजारांच्या १२ गाभण मेंढ्या, ३० हजारांच्या १० मेंढ्यांचे कोकरू, ४० हजारांचे आठ पिल्लांचा समावेश आहे.. याबाबत पंकज चांडे यांनी नंदुरबार तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलिस उपनिरीक्षक जगन वळवी करत आहेत.

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

**विभागीय माहिती कार्यालय, नाशिक**

**मिडिया सेंटर, बी. डी. भालेकर मैदान, महाकवी कालिदास कलामंदिर समोर, नाशिक ४२२००१**

दूरध्वनी क्र(०२५३) २५९०९५६, २५९०४१२, २५९०९६९ ई-मेल :dydirectornashik@ gmail.com

---

**ई-मेल संदेश** **दि. २९ जानेवारी,२०२६**

**प्रति,**
मा. विभागीय आयुक्त,
विभागीय आयुक्त कार्यालय,
नाशिक.

**विषय:** विभागस्तरावरील महत्त्वाची वृत्तपत्रीय कात्रणे सादर करणेबाबत

**महोदय,**

उपरोक्त विषयान्वये नाशिक विभागातील नाशिक, जळगाव, धुळे, अहमदनगर व नंदुरबार जिल्हयातील वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या महत्वाच्या बातम्यांची कात्रणे आपल्या माहितीस्तव सविनय सादर करीत आहे.

कळावे, ही विनंती.

आपला विश्वासु
स्वाक्षरीत/-
उपसंचालक (माहिती)
नाशिक

सोबत: कात्रणे

# जिल्हा नाशिक

पुण्य नगरी

# कुंभमेळ्याशी निगडित कामे मोहीम स्तरावर पूर्ण करावीत

## जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांचे आढावा बैठकीत निर्देश



**नाशिक :** सिंहस्थ कुंभमेळा ध्वजारोहणाचा कार्यक्रम याचवर्षात होणार आहे. त्यामुळे कुंभमेळ्याशी निगडित विविध विकास कामे मोहिमस्तरावर पूर्ण करावीत, असे निर्देश जलसंपदा मंत्री गिरीश महाजन यांनी दिले आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयातील मध्यवर्ती सभागृहात मंगळवारी (दि.२७) दुपारी नाशिक शहरातील द्वारका सर्कल अंडर पास, नदी घाटांचे बांधकाम, विमानतळ विस्तारीकरण यासह विविध विकास कामांचा मंत्री महाजन यांनी आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम, नाशिक त्र्यंबकेश्वर कुंभमेळा विकास प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह, पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, महानगरपालिका आयुक्त मनीषा खत्री, जिल्हाधिकारी आयुष प्रसाद, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधीक्षक अभियंता अरुंधती शर्मा, सहायक जिल्हाधिकारी अर्पिता ठुबे, उपवनसंरक्षक सिद्धेश सावर्डेकर यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

मंत्री महाजन म्हणाले की, आगामी कुंभमेळा स्वच्छ, सुंदर, पर्यावरणपूरक आणि सुरक्षित करावयाचा आहे. त्यासोबतच देश- विदेशातून येणाऱ्या भाविकांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर सर्व विभागांनी परस्पर समन्वय राखत घाटांचे बांधकाम, रस्ते, विमानतळ विस्तारीकरणाची कामे वेळेत पूर्ण होतील याची दक्षता घ्यावी. द्वारका सर्कलचे काम वेळेत पूर्ण होईल, असे नियोजन करावे. तसेच वाहतूक विस्कळीत होणार नाही याचीही दक्षता घ्यावी. विकास कामांमधील भूसंपादन हा महत्वाचा विषय आहे. भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती द्यावी. आवश्यकतेनुसार मनुष्यबळ वाढवावे. तसेच वृक्षारोपण मोहीम राबवीत रोपांचे संवर्धन करावे, असेही मंत्री महाजन यांनी सांगितले.

विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांनी सांगितले की, सर्व कामे वेळेत पूर्ण होतील याची सर्व विभागांनी दक्षता घ्यावी. प्रशासकीय विभागांनी कुंभमेळ्याशी निगडित कामांना प्राधान्य द्यावे. कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त सिंह यांनीही विविध सूचना केल्या. जिल्हाधिकारी प्रसाद यांनी भूसंपादन प्रक्रिया, विकास कामांची सद्यःस्थिती याविषयी माहिती दिली. तसेच भूसंपादनाच्या प्रक्रियेला गती देऊन विकास कामे वेळेत पूर्ण होतील, असे सांगितले.

Nashik Edition
Jan 28, 2026 Page No. 04
Powered by: erelego.com

पुण्य नगरी

# शहरातील फुटपाथ होणार अतिक्रमणमुक्त!

## रिंगरोडसह प्रमुख रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्याची व्यापक मोहीम सुरू

**नाशिक :** सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर शहरातील अंतर्गत तसेच रिंगरोड आणि प्रमुख रस्त्यांचा विकास करण्यात येणार असून, ही कामे करण्यापूर्वी संबंधित रस्त्यांलगत असलेली अनधिकृत कामे तसेच अतिक्रमण हटविण्याची मोहीम मनपाने हाती घेतली आहे. या अतिक्रमण मोहीमेच्या अनुषंगाने शहरातील फुटपाथ अतिक्रमण मुक्त करण्यास प्राधान्य देण्यात येणार आहे.

सिंहस्थासाठी महापालिकेच्या माध्यमातून जवळपास १२०० कोटींचे २९ प्रमुख रस्त्यांची कामे केली जाणार आहेत. ही कामे करण्यापूर्वी संबंधित रस्त्यांवरचे सीमांकन पूर्ण करून तेथील अतिक्रमण हटविण्याचे काम सध्या मनपाच्या अतिक्रमण निर्मुलन विभागाच्या माध्यमातून सुरू आहे.

विविध सेवा पुरविण्यासाठी मनपाला वारंवार रस्त्यांची तोडफोड करावी लागते. यामुळे आर्थिक नुकसान तर होतेच शिवाय शहरवासियांना देखील खड्ड्यांचा सामना करावा लागतो. ही बाब लक्षात घेऊन मनपा आयुक्त मनीषा खत्री यांनी सर्वच २९ रस्त्यांलगत ऑप्टीकल फायबर केबल, टेलिफोन केबल, गॅस पाईपलाईन यासह विविध प्रकारच्या सेवा पुरविणाऱ्या केबल्स टाकण्याचे काम हाती घेतले आहे. जेणेकरून वारंवार रस्त्यांची तोडफोड करण्याची वेळ मनपावर येणार नाही. शहराचा वाढता विकास व विस्तार पाहता अनेक ठिकाणी नाशिककरांना वाहतूक कोंडीला सामोरे जावे लागते. वाहनांना पार्किंगसाठी देखील जागा मिळत नाही. यामुळे अतिक्रमणे काढून रस्त्यांचे रूंदीकरण करण्यात येणार आहे. त्याचबरोबर रस्त्यांवरील फुटपाथ देखील अडथळे मुक्त करून नाशिककरांना दिलासा देण्याचे काम मनपाकडून केले जाणार आहे. मात्र ही बाब कितपत यशस्वी होते, याकडे लक्ष लागून आहे. मनपाकडून आजवर अनेकदा असे प्रयत्न झाले मात्र अशा मोहीमा नव्याचे नऊ दिवस ठरत असल्याचे अनुभव नाशिककरांना काही नवीन नाही.



### या रस्त्यांवरील अतिक्रमण हटविणार

गंगापूररोड, दिंडोरी रोड, पेठरोड, द्वारका सर्कलला येऊन मिळणारे सर्व रस्ते, पुणे रोड, जेलरोड, वडनेर व विहितगाव रोड अशा महत्वाच्या रस्त्यांवरील अतिक्रमण हटविण्याची मोहीम टप्प्या टप्प्याने हाती घेतली जाणार आहे. सध्या दिंडोरी रोडवरील कार्यवाही सुरू आहे.

### पुलासाठी २७ झोपड्या काढणार

आर. डी. सर्कलवरून मिलिंदनगरकडे येणाऱ्या रस्त्याची कनेक्टिव्हीटी वाढावी व याठिकाणची वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी मिलींदनगर भागात नासर्डी (नंदिनी) नदीवर पुलाची उभारणी करण्यात येणार आहे. या पुलाचे बांधकाम व तेथून पुढे रस्त्याच्या कामासाठी २७ झोपड्या हटविण्यात येणार आहे. अतिक्रमण विभागाकडून तसे नियोजन सुरू आहे.

पुण्य नगरी

# कुंभमेळ्यातील सामाजिक कार्याबद्दल विद्यार्थ्यांना मिळणार दोन गुण

## पुणे विद्यापीठाच्या अकॅडमिक कौन्सिलची मान्यता

**नाशिक :** राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या दिशादर्शक तत्त्वांनुसार, सिंहस्थ कुंभमेळ्यात स्वयंसेवक, शैक्षणिक अभ्यासक्रमाचा भाग म्हणून मदत करणाऱ्या विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यासाठीचे दोन अकॅडमिक क्रेडिट (गुण) देण्यात येणार आहे. यासंदर्भातील प्रस्तावास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या अकॅडमिक कौन्सिलच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. अशाप्रकारे कुंभमेळा अकॅडमिक क्रेडिट बँकशी जोडणारे पुणे विद्यापीठ देशात पहिले विद्यापीठ ठरण्याची शक्यता आहे.

नाशिक येथे २०२६-२७ दरम्यान सिंहस्थ कुंभमेळा होणार आहे. हा दर बारा वर्षांनी होणारा राष्ट्रीय स्तरावरील धार्मिक आणि सांस्कृतिक महाउत्सव आहे. या सोहळ्यास देश-विदेशातून लाखो भाविक येतात. या महाउत्सवात वाहतूक नियंत्रण, गर्दी व्यवस्थापन, आरोग्य सेवा, सीसीटीव्ही नियंत्रण, माहिती तंत्रज्ञान, एनएसएस, एनसीसी, संशोधन, सुरक्षा, पर्यावरण आणि नदी संवर्धन अशा विविध क्षेत्रांत विद्यार्थ्यांची मदत घेता येऊ शकते. यापूर्वीच्या कुंभमेळ्यातही विद्यार्थी व शिक्षकांनी स्वयंस्फूर्तीने योगदान दिले होते. यापार्श्वभूमीवर पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सदस्य सागर वैद्य यांनी मे २०२५ मध्ये विद्यार्थ्यांना सामाजिक कार्यासाठीचे दोन अकॅडमिक क्रेडिट (गुण) देण्याची मागणी विद्यापीठाकडे करीत त्यासाठी सातत्याने पाठपुरावा केला. त्यानुसार विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आणि प्र कुलगुरू डॉ. पराग काळकर, सर्व मॅनेजमेंट कौन्सिल मेंबर, अधिकार मंडळे आदींनी त्या अनुषंगाने वेळोवेळी विविध मान्यता दिल्या आहेत.

नाशिक कुंभमेळ्यात सामाजिक कार्यात सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांच्या कामाच्या स्वरूपानुसार अकॅडमिक क्रेडिट्स प्रदान केल्यास राष्ट्रीय शिक्षण धोरणाचा उद्देश साध्य होईल. विद्यार्थ्यांचा सहभाग केवळ धार्मिक न राहता शैक्षणिक उपक्रम ठरेल. भारतीय ज्ञान परंपरेचीही त्यांना ओळख होईल. शिक्षक, शैक्षणिक संस्था यांनाही याचा मूल्यांकन वाढीसाठी उपयोग होईल, अशी विद्यापीठाची भूमिका आहे.

> कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन, उच्च शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी या संकल्पनेला पाठिंबा दिला. नाशिकचे पोलिस आयुक्त संदीप कर्णिक यांनीही यासाठी पुढाकार घेतला. विद्यापीठाकडे पाठपुरावा केला. शैक्षणिक समन्वय समितीही याकामी स्थापन केली आहे. आगामी कुंभमेळा कार्यकाळात नाशिक जिल्ह्यातील हजारो विद्यार्थ्यांना या निर्णयाचा फायदा होणार आहे. कुंभमेळा कालावधीसाठी हा निर्णय लागू असेल.
>
> – **सागर वैद्य**, व्यवस्थापन परिषद सदस्य, पुणे विद्यापीठ.

पुण्यनगरी

असल तर नाशक मनपान काटात प्रकल्प रद्द कल्याबाबतच पुरावा सादर करावा किंवा लेखी हमी देण्याची मागणीही ॲड. पंडित यांनी केली आहे.

# आता सोसायटी, हॉटेल्समध्येच ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया!

पुण्यनगरी विशेष

■ घनकचरा व्यवस्थापन विभागाचा उपक्रम; प्रभाग क्र. ७ मध्ये राबविणार पायलट प्रोजेक्ट

ज्ञानेश्वर वाघ

**नाशिक :** शंभर किलो व त्यापेक्षा जास्त ओला कचरा निर्माण होत असलेल्या संस्था, सोसायट्या, तसेच हॉटेल्समध्ये आता, आहे त्याच ठिकाणी प्रक्रिया करून ओल्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागामार्फत शहरातील संबंधित अपार्टमेंट्स, सोसायट्या, तसेच हॉटेल्सचे सर्वेक्षण करून त्यांची नोंदणी केली जाणार आहे. सुरुवातीला प्रभाग क्रमांक ७ मध्ये अशा प्रकारचा पायलट प्रोजेक्ट राबविण्यात येणार आहे. या उपक्रमासाठी सेंटर फॉर सायन्स ॲण्ड एन्व्हायरन्मेंट ही संस्था महापालिकेला सहकार्य करत आहे.

आजमितीस दररोज सुमारे ७९० मेट्रिक टन इतका कचरा संकलन केले जाते. त्यात ओल्या कचऱ्याचे प्रमाण ४७० ते ४८० मेट्रिक टन आहे. ओला आणि सुका कचऱ्याचे विलगीकरण करून मिळावे, यासाठी उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. कचरा संकलनात ओल्या कचऱ्याचे प्रमाण अधिक असल्याने त्याचे विलगीकरण करताना महापालिकेला अनेक अडचणींना तोंड द्यावे लागते. यामुळे आहे त्याच ठिकाणी ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया झाल्यास मनपाला देखील मोठा दिलासा मिळू शकतो. त्या अनुषंगाने घनकचरा व्यवस्थापन विभागाने आता शहरातील १०० किलो व त्यापेक्षा अधिक कचरा निर्माण होत असलेल्या संस्था, सोसायटी, अपार्टमेंट, तसेच हॉटेलांची नोंद करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार प्रभाग क्रमांक ७ मध्ये अशा प्रकारचा पायलट प्रोजेक्ट राबविण्यात येणार असल्याची माहिती घनकचरा व्यवस्थापन विभागाचे संचालक अजित निकत यांनी दिली.

ओल्या कचऱ्यासंदर्भातील प्रोजेक्ट राबविण्यासाठी संबंधित संस्थेबरोबर करारनामा करण्यात आला आहे. या करारनाम्यानुसार संस्था महापालिकेला सिंहस्थ काळात मदत होणार आहे. १०० किलोपेक्षा अधिक प्रमाणात ओला कचरा निर्माण करणाऱ्या संस्थांना ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करणारी यंत्रणा उभारावी लागणार आहे. या प्रक्रियेतून निर्माण होणारे खताची विक्रीदेखील करता येईल.

– **अजित निकत**, संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग

## सिंहस्थासाठी प्रोजेक्ट महत्त्वाचा

1. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या अनुषंगाने संबंधित पायलट प्रोजेक्ट महत्त्वाचा ठरणार आहे.
2. या काळात कचऱ्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढणार आहे. त्यामुळे या कचऱ्याची योग्य पद्धतीने विल्हेवाट लावण्यासाठी मनपाच्या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून नियोजन हाती घेण्यात आले आहे.
3. यासाठी सेंटर फॉर सायन्स ॲण्ड एन्व्हायरन्मेंट या संस्थेच्या माध्यमातून कचरा विलगीकरण, जनजागृती तसेच कर्मचारी क्षमता बांधणी करणे या कामांसाठी मदत केली जाणार आहे.

पुण्य नगरी



# विभागीय आयुक्त कार्यालयात ध्वजवंदन

**नाशिक :** देशाच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनानिमित्त सोमवारी सकाळी विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या हस्ते ध्वजवंदन करण्यात आले. यावेळी पोलिस दलाच्या तुकडीने मानवंदना दिली.

यावेळी अपर आयुक्त सुभाष बोरकर, अजय मोरे, जितेंद्र वाघ, अरविंद लोखंडे, उपायुक्त उज्ज्वला बावके, सहायक आयुक्त विठ्ठल सोनवणे, तहसीलदार पल्लवी जगताप यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. ध्वजवंदनानंतर मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्ताने विभागीय आयुक्त कार्यालय आणि महाराष्ट्र साहित्य परिषद नाशिकरोड शाखा यांच्या वतीने आयोजित शुद्धलेखन व सुंदर हस्ताक्षर स्पर्धा आणि मराठी भाषा ज्ञान स्पर्धेतील विजेत्यांना विभागीय आयुक्त डॉ. गेडाम यांच्या हस्ते पारितोषिक वितरण करण्यात आले.

मराठी भाषा ज्ञान स्पर्धेत आराध्या वडनेरे (प्रथम क्रमांक), आर्य गलांडे (द्वितीय), श्रद्धा गगनबिडे (तृतीय) आणि पूर्व तेलंगी, आर्या बोराडे, आविष्का टावरे, श्रुतिका सोनार, तन्मय आगळे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात आले. तर, शुद्धलेखन व सुंदर हस्ताक्षर स्पर्धेत श्रद्धा पगार (प्रथम), ईश्वरी ताजनपुरे (द्वितीय), आर्य गलांडे (तृतीय) आणि पूर्वा ढेरिंगे, दिव्या खैरनार, कल्याणी गोसावी, रेणुका कासार आणि पीयूष माळवे यांना उत्तेजनार्थ पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. यावेळी डॉ. गेडाम यांच्या हस्ते मराठी भाषा संवर्धन पंधरवड्यानिमित्ताने विभागीय आयुक्त कार्यालय आणि महाराष्ट्र साहित्य परिषद नाशिकरोड शाखा यांच्या वतीने आयोजित ग्रंथप्रदर्शन आणि मराठी खाद्यपदार्थ मेळाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानिमित्त उभारण्यात आलेल्या सेल्फी पॉइंटलाही मान्यवरांनी भेट देत छायाचित्र काढून घेतले.

Nashik Edition
Jan 28, 2026 Page No. 05
Powered by: erelego.com






नाशिक : हिमाचल प्रदेशात फतेहपूर धरणातून पाणी सोडल्याने पाण्याखाली आलेल्या गावातील रुग्ण, गर्भवती माता, ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग अशा ४९८ लोकांचे प्राण वाचवले, त्याबद्दल जलसंपदा तथा कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते बारा लाखांचा धनादेश स्वीकारताना कमांडर आनंद विनायक अलाशे. शेजारी राष्ट्रपती पदक स्वीकारताना नाशिक पोलीस आयुक्तालयातील उपनिरीक्षक सुरेश साहेबराव सोनवणे सपत्नीक, सहाय्यक पोलीस निरीक्षक नरेंद्र रखुराम राऊत, उपनिरीक्षक विजय प्रभाकर देवरे (नाशिक ग्रामीण), गुन्हेगारी नियंत्रणात आणण्याच्या विशेष कामगिरीबद्दल पोलीस निरीक्षक डॉ. अंचल मुदगल, जुमेदरसिंग राजपूत, जितेंद्र सपकाळे, नक्षल भागात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल विशेष सेवा पदक घेताना नाशिक ग्रामीणचे मोहन पाटील, लासलगाव व अमोल सूर्यवंशी, सटाणा.




नाशिक : विभागात उत्कृष्ट शेतीशाळा व पीक प्रात्यक्षिक स्पर्धा एआयअंतर्गत बक्षीस स्वीकारताना एस. आर. गोसावी, संतू वाडे, प्रकल्प संचालक जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा घरकुल गृहप्रवेशाची प्रतीकात्मक चावी व प्रशस्तीपत्र स्वीकारताना गणेश डावळे ग्रामपंचायत लासलगाव, भाऊसाहेब वाघकडे ग्रामपंचायत पिंपरी सय्यद, महाराष्ट्र गोसेवा आयोग सन्मान स्वीकारताना गोकुळधाम सेवा प्रतिष्ठान, नांदगाव (ता. इगतपुरी) व नाशिक फेस्टिव्हलअंतर्गत जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणामार्फत एक कोटी, ५६ लाख ६५ हजार ६६४ रुपयांचा धनादेश सैनिक कल्याण निधीसाठी जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांना सुपूर्द करताना मान्यवर.

(छायाचित्रे : शैलेंद्र साळी)

पुढारी


# साधुग्रामसाठी रोखीने मोबदला

- भूसंपादनासाठी १२ ते १५ हजार रुपये प्रती चौ.मी. दर निश्चित

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या भूसंपादन प्रक्रियेला वेग आला असून, साधुग्रामसाठी रोख मोबदल्याचा प्रस्ताव महापालिका प्रशासनाने राज्य शासनाच्या मंजुरीसाठी सादर केला आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रस्तावावर निर्णय घेतला जाईल. दरम्यान साधुग्रामसाठी नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गासन्मुख १५ हजार रुपये प्रती चौरस मीटर, तर महामार्गापासून लांब असलेल्या भूसंपादनाकरीता बारा ते साडेबारा हजार रुपये प्रती चौ.मी. दर निश्चित करण्यात आला आहे.

येत्या २०२७ मध्ये नाशिकमध्ये सिंहस्थ कुंभमेळा होत आहे. सिंहस्थात येणाऱ्या साधू-महंत तसेच भाविकांच्या सोयी-सुविधांसाठी तब्बल ३० हजार कोटींची कामे महापालिकेसह विविध शासकीय यंत्रणांमार्फत सुरू आहेत. सिंहस्थांत येणाऱ्या साधू-महंतांसाठी तपोवनात तब्बल १,१५० एकर क्षेत्रावर साधुग्रामची उभारणी केली जाणार आहे. तपोवनातील ३७७ एकर




जागेवर साधुग्रामचे आरक्षण आहे. त्यापैकी ९४ एकर जागा संपादित करण्यात आली आहे. उर्वरित २८३ एकर जागा संपादन करण्यासाठी प्रक्रिया सुरू आहे. १,१५० एकर पैकी ७०० एकर जागा तात्पुरत्या स्वरूपात अधिग्रहित करण्याचे नियोजन आहे. २८३ एकर जागा संपादीत करण्यासाठी महापालिकेने २८० शेतकऱ्यांना नोटीस पाठवून सुनावणी घेतली. त्यापुर्वी ५० टक्के टीडीआर व ५० टक्के रोख स्वरूपात मोबदला देण्याची तयारी दर्शविली होती; परंतु शेतकऱ्यांनी प्रस्तावाला विरोध करत रोखीने मोबदल्याची मागणी केली. त्यामुळे महापालिकेने आता रोखीने मोबदला अदा करण्याचा प्रस्ताव तयार केला आहे. भूसंपादनाचा मोबदला बाजारमूल्य तक्त्यानुसार अदा केला जाणार आहे. मालकांनी मात्र, प्रती चौरस २६ हजार रुपये दराची मागणी केली आहे. महापालिकेने मात्र, त्यातून मध्यम मार्ग काढत १२ ते १५ हजार रुपये प्रती चौ.मी. दर देण्याची भूमिका घेतली आहे.

### मंत्रिमंडळ घेणार अंतिम निर्णय

महापालिकेने सादर केलेल्या प्रस्तावावर राज्याच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेतला जाणार आहे. मंत्रिमंडळाच्या बैठकीत महापालिकेच्या दरनिश्चितीवर शिक्कामोर्तब केले जाते की, शेतकऱ्यांच्या मागणीनुसार दर वाढवून दिला जातो याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

**शहरात धुळवड**

शहरात गॅसवाहिनीसाठी अनेक ठिकाणी खोदकाम सुरू आहे. परंतु या खोदकामाची माती रस्त्यावर पसरल्याने रस्तांवर धूळ उडत आहे. त्यामुळे नाशिककरांना श्वसनाच्या विकारांचा सामना करावा लागत आहे.

पुढारी


# परिक्रमा मार्ग भूसंपादनास विरोध

## गोवर्धनवासीयांचा मोजणी रोखण्याचा ग्रामसभेत इशारा

**नाशिक : पुढारी वृत्तसेवा**

सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर उभारल्या जाणाऱ्या नाशिक परिक्रमा मार्गासाठी होणाऱ्या भूसंपादनास गोवर्धन ग्रामपंचायतीच्या पेसा ग्रामसभेत बाधित शेतकरी व ग्रामस्थांनी विरोध नोंदविला आहे. प्रशासनातर्फे नियोजित मोजणी बेकायदेशीर असल्याची तक्रार करत कोणत्याही परिस्थितीत मोजणी प्रक्रिया करू दिली जाणार नाही, असा इशारादेखील ग्रामस्थांनी दिला आहे.

यापूर्वी १६ जानेवारीच्या ग्रामसभेत भूसंपादन प्रस्ताव आधीच एकमताने फेटाळण्यात आला होता. त्यानंतर पुन्हा मंगळवारी (दि.२७) सरपंच गोविंद डंबाळे यांच्या अध्यक्षतेखाली ग्रामसभा पार पडली. यावेळी उपसरपंच बाळासाहेब लांबे, प्रल्हाद जाधव, नाना गाडे, ग्रामसेवक दिनेश पाटील तसेच महाराष्ट्र राज्य पायाभूत सुविधा विकास महामंडळ मर्यादितचे अभियंता दास, तलाठी व मंडळ अधिकारी उपस्थित होते.




### असा आहे ग्रामस्थांचा दावा

भूसंपादन कायदा २०१३ अंतर्गत अधिसूचना, सोशल इम्पेक्ट असेसमेंट झाल्याशिवाय व ग्रामसभेच्या संमतीशिवाय कोणत्याही परिस्थितीत जमिनीची मोजणी, सर्वेक्षण किंवा मातीचे नमुने घेता येत नाहीत. असे असताना शासनाकडून दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी मोजणीचे नियोजन करण्यात आले असून, ही कारवाई पूर्णतः बेकायदेशीर असल्याचा दावा ग्रामस्थांनी केला आहे.

प्रस्तावित नाशिक परिक्रमा मार्गाच्या भूसंपादनाबाबत प्रशासनाकडून माहिती देण्यात आली. विरोधानंतरही प्रशासनाकडून भूसंपादनाची कारवाई सुरू असल्याने ग्रामस्थांनी तीव्र नाराजी व्यक्त केली. भूसंपादनासाठी मोजणी कोणत्याही परिस्थितीत होऊ दिली जाणार नाही, असा ठाम इशारा ग्रामसभेत देण्यात आला. पूर्वी नाशिक शहरातून जाणारा परिक्रमा मार्ग बदलून केवळ खर्च वाचविण्याच्या हेतूने गोवर्धन व परिसरातील गावांमधून नेण्यात येत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला. यामुळे सुपीक व बागायती जमिनी, फळबागा व घरे बाधित होत असून, आम्ही कोणत्याही परिस्थितीत आमच्या बागायती जमिनी रस्त्यासाठी देणार नाही. ग्रामस्थ भूमिहिन होत आहेत, असे ग्रामस्थांनी ठामपणे जाहीर केले. ग्रामसभेत पर्यायी मार्गाने नव्याने सर्वे करून रस्ता नेण्याची मागणी करण्यात आली. ग्रामसभेतील उपस्थित ग्रामस्थांनी हात उंचावून सर्वानुमते ठराव मंजूर करून प्रस्तावित नाशिक परिक्रमा मार्गाचा भूसंपादन प्रस्ताव फेटाळला असून, सदर ठराव संबंधित प्राधिकरणाकडे पाठवून कोणतेही ना-हरकत प्रमाणपत्र देऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे. त्यानुसार उपसरपंच बाळासाहेब लांबे यांनी कोणत्याही स्वरूपात ग्रामसभेचा ना हरकत दाखला दिला जाणार नाही हे जाहीर केले. सदर ग्रामसभेस मुरलीधर पाटील, संदीप पाटील, पोपट जोंधळे, बाळासाहेब जोंधळे, रतन जोंधळे, प्रदीप वासन, शिवांश बटाविया, सुरेश जाधव, रंगनाथ बिसे, चंद्रकांत लांबे, ज्ञानदेव बिसे, अशोक बिसे, सुरेश बिसे, रवींद्र नाकील, विवेक पाटील, अक्षय लड्डा, नानासाहेब सोनवणे, मयूर लांबे, अरुण लांबे, नितीन पाटील आदी उपस्थित होते.

Nashik Edition
Jan 29, 2026 Page No. 09
Powered by: erelego.com

पुढारी



नाशिकरोड : शिंदे येथील विकासकामांच्या लोकार्पणप्रसंगी मंत्री महाजन यांचा सत्कार करताना पदाधिकारी.

# शिंदे येथे डॉ. बाबासाहेबांचे स्मारक उभारणार : महाजन

**नाशिकरोड : पुढारी वृत्तसेवा**

शिंदे गावात सरपंच व त्यांच्या सहकाऱ्यांनी केलेली विकासकामे आदर्शवत आहेत. शिंदे गावात भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे जिल्ह्याला हेवा वाटेल, असे स्मारक उभारण्यासाठी महिनाभरात कोट्यवधींचा निधी उपलब्ध करून देणार असल्याचे प्रतिपादन जलसंपदामंत्री गिरीश महाजन यांनी केले. शिंदे गावातील विकासकामांच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते.

सरपंच बाजीराव जाधव यांनी विकासकामांचा आढावा घेत शिंदे गावात क्रीडा संकुल आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभारण्यासाठी निधीची मागणी केली. मंत्री महाजन म्हणाले की, आज गावात अनेक विकासकामे झाली, ती सर्वांना अभिमान वाटावी अशी आहेत. येत्या काही दिवसांत जी कामे होतील, त्याला भरघोस निधी देणार आहोत. बाबासाहेबांचे भव्य स्मारक येथे उभारू. जिल्हा परिषद, पंचायत समितीवर भाजपचा झेंडा फडकवून आपल्या गटातून भाजपला विजयी करा.

यावेळी भाजपचे लक्ष्मण सावजी, सुनील बागूल, सुधाकर बडगुजर, सुनील आडके, उदय सांगळे, सचिन ठाकरे, सचिन आहेर, संजय सानप, नितीन जाधव, वंदना जाधव, अश्विनी साळवे, बाळासाहेब जाधव, उज्ज्वला जाधव, धनाजी मते, शरद कासार, सोमनाथ बोराडे, दिनकर नवसे, संजय धात्रक, रमेश कटाळे, राहुल धात्रक आदी पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Nashik Edition
Jan 29, 2026 Page No. 09
Powered by: erelego.com

# जिल्हा अहिल्यानगर

लोकमत



नंदुरबार शहरातील जिल्हा क्रीडा संकुलात ७७ प्रजासत्ताक दिनी पोलिस दलाच्या महिला पोलिस अधिकाऱ्यांच्या तुकडीकडून मानवंदना स्वीकारताना गृहराज्यमंत्री योगेश कदम. मंचावर जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, सनदी अधिकारी शिवेंद्र सिंह, पोलिस अधिक्षक श्रवण दत्त एस. छाया: सुनील कुलकर्णी

मस्ट READ

# प्रजासत्ताक दिनी शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान

## राज्यमंत्री योगेश कदम यांच्याहस्ते ध्वजारोहण

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** शहरातील पोलिस कवायत मैदानावर ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाचा मुख्य ध्वजवंदन सोहळा पार पडला. यावेळी गृह राज्यमंत्री योगेश ज्योती रामदास कदम यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. कार्यक्रमात उत्कृष्ट शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान करण्यात आला.

**४५** अधिकारी व कर्मचारी यांचा योगेश कदम यांनी सन्मान केला.

कार्यक्रमास खासदार ॲड. गोवाल पाडवी, आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार राजेश पाडवी, आमशा पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी, पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, सहायक जिल्हाधिकारी अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, उपजिल्हाधिकारी प्रमोद भामरे, श्याम वाडकर, ज्ञानेश्वर पाटील, कल्पना ठुबे, अपर जिल्हा पोलिस अधीक्षक आशित कांबळे, जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे, अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क स्नेहा सराफ, कार्यकारी अभियंता, अंकुश पालवे, विभागीय वन अधिकारी डॉ. प्रकाश गुजर व विविध यंत्रणांचे विभागप्रमुख, कर्मचारी उपस्थित होते. पोलिस मुख्यालय येथे राज्यमंत्री कदम यांच्या हस्ते व्यायाम शाळा, बैठक कक्ष बांधकाम व जिल्हा नियोजन समिती अंतर्गत अपारंपरिक सौरऊर्जा प्रकल्प उभारणीचे भूमिपूजन करण्यात आले.



❝ जिल्ह्यात अनेक योजना यशस्वी राबविल्या जात आहेत. सिकलसेल, माता व बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याचे काम झाले आहे. जिल्ह्यात तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असेल.

**योगेश कदम,** राज्यमंत्री, गृह, महसूल, पंचायतराज, महाराष्ट्र राज्य.

## जिल्ह्यातील महसूल व इतर विभागांचा केला गेला सन्मान

प्रसंगी सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन वेळेत पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांचा राज्यमंत्री कदम यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. महसूल विषयक उल्लेखनीय कामकाज केल्याने अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, नायब तहसीलदार बन्सीलाल वाडिले, महसूल सहायक माया मराठे, प्रीतम नागदेवते, दीपक निळे, संगीता राठोड, ग्राम महसूल अधिकारी झेड. के. गायकवाड, महसूल अधिकारी अमित गावित, तलाठी राजेश पवार, अरुण कोकणी, मंडळ अधिकारी मिथुन राठोड, ग्राम महसूल अधिकारी राजश्री पाडवी, जे. डी. पाटील, जयेंद्र अहिरे, कपिल परदेशी व ग्राम महसूल अधिकारी सुभाष पाडवी, अर्जुन पावरा, द्वितीय स्वाती गावित, प्रवीण पगारे, सुरेश गावित, शीतल सोनवणे, के. के. चौधरी, जे. जी. चौधरी व एन. बी. कायत यांचा सन्मान करण्यात आला.

जिल्हा पोलिस दलातील अधिकारी, अंमलदार इतर संबंधित अधिकारी तसेच विशेष कामगिरी करणारे जिल्हा सरकारी वकील विनोद गोसावी, पोलिस निरीक्षक हेमंत पाटील, नीलेश देसले, हेमंतकुमार प्रभाकर पाटील, प्रभारी कार्यालय अधीक्षक संदीप सोनवणे, सहायक पोलिस निरीक्षक जयेश खलाणे, धर्मराज पटले, पोलिस उपनिरीक्षक मुकेश पवार, महिला पोलिस उपनिरीक्षक प्रिया वसावे, पोलिस हवालदार रतन रामोळे, नितीनकुमार साबळे, पोलिस शिपाई शशिकांत राजपूत, जब्बार शेख, विलास पांढारकर, भिका गवळे, हेमंत बारी व महिला पोलिस नाईक कांती वसावे यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सर्व उपस्थितांनी बाल विवाह प्रतिबंध शपथ घेतली. कार्यक्रमात एस. ए. मिशन प्राथमिक शाळा, डॉ. काणे गर्ल्स हायस्कुल यांच्यासह विविध शाळांच्या विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम व पथसंचलन सादर केले.

लोकमत

# बाजारात वाढला मिरचीचा ठसका; व्यापाऱ्यांना वातावरणाचा धसका!

## नंदुरबार बाजारात पुन्हा वाढले दर; आणखी महिनाभर सुरू राहणार खरेदी हंगाम

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** मिरची आगार असलेल्या नंदुरबारात घसरलेली मिरची आवक पूर्ववत होत आहे. एकीकडे ही मिरची आवक वाढत असताना दुचाकी व्यापारी व शेतकऱ्यांनी बदलत्या वातावरणाचा धसका घेतला आहे. व्यापारी वर्गाला आधीच आवक घसरणीचा फटका बसून पावडर तयार करण्याच्या प्रक्रियेत अडचणी येत होत्या. त्यात गत आठ दिवसात आवक वाढून पुढे एक महिना मिरची बाजार तेजीत येण्याची शक्यता असतानाच ढगाळ वातावरणामुळे पथारींवरचा माल गोदामात रवाना करण्याची धडपड सुरु झाली आहे.

ऑक्टोबरपासून होणारा नंदुरबार जिल्ह्यातील मिरची हंगाम वेट मार्च-एप्रिलपर्यंत सुरु राहत असल्याने मिरची खरेदी करणारे, पथारीवर सुकविणे आणि त्यापासून पावडर तयार करणे या उद्योगांना चालना मिळून रोजगाराची निर्मिती होते. यंदाही जिल्ह्यात साडेसहा हजारपेक्षा अधिक हेक्टर क्षेत्रात लाली, व्हीएनआर व तेजा या वाणांची लागवड झाल्याने शेतकरी आणि व्यापारी यांच्याकडून बाजारात तेजीचे आडाखे बांधले गेले होते. परंतु, ऑगस्ट ते ऑक्टोबर या काळात अतिवृष्टी आणि खराब हवामान यामुळे मिरची पिकाला फटका बसून शेतकऱ्यांचे उत्पादन निम्म्यावर आले. यामुळे बाजारात २० जानेवारी अखेरपर्यंत केवळ १ लाख ४० हजार क्विंटल मिरची आवक झाली आहे. यामुळे बाजार थंडावला असे चित्र असतानाच २१ जानेवारीपासून बाजार तेजीत आला होता. दर दिवशी अडीच हजार क्विंटल आवक सुरु असतानाच ढगाळ वातावरण निर्माण झाल्याने चिंता वाढल्या आहेत.



नंदुरबार कृषी उत्पन्न बाजार समितीत सध्या सुरु असलेली मिरची आवक.

### मिरची पावडर तयार करणाऱ्या उद्योजकांची धावपळ

नंदुरबारमधील लाली, व्हीएनआर आणि तेजा या मिरची वाणांपासून पावडर तयार करुन त्याची निर्यात करण्यात येते. नंदुरबारात पावडर तयार करणारे ४० कारखाने आहेत. या कारखानादारांकडे डिसेंबरअखेरपर्यंत पावडर तयार करण्यासाठी लागणारा कच्चा माल उपलब्ध नसल्याने समस्या वाढत होत्या. परंतू जानेवारी महिन्यातील मध्य दिलासादायक ठरुन खरेदी सुरु होती. परंतू यात आता ढगाळ वातावरणामुळे ग्रामीण भागातील मिरचीवर कीडरोग येण्याची शक्यता निर्माण झाल्याने चिंता वाढल्या आहेत.

### दोन लाख क्विंटलवर हंगाम आटोपण्याची शक्यता

नंदुरबार शहरातून दरवर्षी १० हजार टन मिरची पावडर निर्यात केली जाते. यासाठी अडीच लाख क्विंटल मिरचीची खरेदी आवश्यक आहे. व्यापाऱ्यांनी अद्याप १ लाख ४० हजार क्विंटल मिरची खरेदी केली आहे. आगामी काळात ६० हजार क्विंटल मिरची खरेदी होवू शकते. यामुळे सरासरी सात हजार टन मिरची पावडर नंदुरबारात तयार होणार आहे.

**६ हजार**

रुपये प्रतिक्विंटल सरासरी ओल्या लाल मिरचीला भाव मिळत आहे. हे दर पारंपरिक जरेला, फाफडा या वाणांना मिळतात. उर्वरित हायब्रीड वाण २ हजार ६०० पर्यंत खरेदी होत आहेत.

**नंदुरबारच्या पारंपरिक वाणांना आजही भाव**

### नंदुरबार बाजारात १ लाख ४० हजार क्विंटल आवक

१ नंदुरबार बाजारात आजअखेरीस ओल्या लाल मिरचीला २ हजार ६०० ते ६ हजार रुपये प्रतिक्विंटल दर दिला जात आहे. सुक्या लाल मिरचीला व्यापारी सर्वाधिक ९ हजार प्रतिक्विंटल दर देण्यात येत आहेत. हे दर समाधानकारक असल्याने आवकमध्ये वाढ सुरु झाली होती. २० ते २४जानेवारी दरम्यान बाजारात दरदिवशी अडीच हजार क्विंटल मिरची आवक झाली आहे.

२ नंदुरबार बाजार समितीत यंदा आवक झालेली मिरची स्थानिक व्यापारी खरेदी करुन पथारींवर (मैदाने) टाकत आहेत. याठिकाणी मिरची वाळवून कारखान्यात पाठविली जात आहे. दरदिवशी ही प्रक्रिया सुरु आहे. डिसेंबर महिन्यात आवक कमी झाल्याने अनेकांनी पथारी बंद केल्या होत्या. परंतू जानेवारीपासून पुन्हा आवक सुरु झाल्याने पथारींवर मिरची दिसून येत आहे.

३ नंदुरबार बाजारात गतवर्षी १ लाख ९५ हजार क्विंटल मिरची आवक झाली होती. यंदाही पाच हजार क्विंटल वाढीव आवक होण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. फेब्रुवारीअखेरीपर्यंत बाजारात मिरची येण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तविली आहे. अंतिम टप्प्यातील मिरचीचे दरही वाढीची शक्यता आहे.

४ ढगाळ वातावरणामुळे झाडावरच्या मिरचीला सूर्यप्रकाश न मिळाल्यास कीड रोगांची भिती असते. पथारींवर वाळवलेल्या मिरचीला ढगाळ वातावरण व तुरळक पावसाचा सामना करावा लागल्यास काळपट डाग पडून माल खराब होतो.




**नंदुरबार** : सशस्त्र सेना ध्वज दिन निधी संकलनाचे उद्दिष्ट वेळेत पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांचा स्मृतिचिन्ह देऊन गौरव करताना गृहराज्यमंत्री योगेश कदम. दुसऱ्या छायाचित्रात जिल्हा सरकारी वकील विनोद गोसावी यांचा गौरव करताना योगेश कदम.

# उत्कृष्ट कामगिरीबद्दल जिल्हाधिकाऱ्यांचा सत्कार

## पोलिस कवायत मैदानावर कार्यक्रम; विनोद गोसावी यांचाही गौरव

**सकाळ वृत्तसेवा**

नंदुरबार, ता. २७ : जिल्ह्यातील विविध विभागात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा प्रजासत्ताक दिनी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. येथील पोलिस कवायत मैदानावर झालेल्या कार्यक्रमात सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलनचे इंष्टांक वेळे पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांचा राज्यमंत्री श्री. कदम यांच्या हस्ते स्मृतिचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.

### यांचा झाला सन्मान

**जिल्हा सरकारी वकील विनोद गोसावी, पोलिस निरिक्षक हेमंत पाटील, निलेश देसले, हेमंतकुमार पाटील, प्रभारी कार्यालय अधीक्षक संदीप सोनवणे, सहायक पोलिस निरिक्षक जयेश खलाणे, धर्मराज पटले, पोलिस उपनिरिक्षक मुकेश पवार, महिला पोलिस उपनिरिक्षक प्रिया वसावे, पोलिस हवालदार रतन रामोळे, नितीनकुमार साबळे, पोलिस शिपाई शशिकांत राजपूत, जब्बार शेख, विलास पांढारकर, भिका गवळे, हेमंत बारी व महिला पोलिस नाईक कांती वसावे आदींचा प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला.**

महसूलविषयक उल्लेखनिय कामकाज केल्याबद्दल अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, नायब तहसीलदार बन्सीलाल वाडीले, महसूल सहायक माया मराठे, प्रितम नागदेवते, दीपक निळे, संगीता राठोड, ग्राममहसूल अधिकारी झेड. के. गायकवाड, महसूल अधिकारी अमित गावित, तलाठी राजेश पवार, अरुण कोकणी, मंडल अधिकारी मिथून राठोड, ग्राममहसूल अधिकारी राजश्री पाडवी, जे. डी. पाटील, जयेंद्र अहिरे, कपिल परदेशी, ग्राममहसूल अधिकारी सुभाष पाडवी यांचा गौरव करण्यात आला.

'खरीप हंगाम २०२५' अंतर्गत 'उत्कृष्ट शेतीशाळा' आयोजित स्पर्धेतील विजेते जिल्हास्तरीय प्रथम अर्जुन पावरा, द्वितीय श्रीमती स्वाती गावित, तृतीत प्रवीण पगारे, चतुर्थ सुरेश गावित व पाचवा श्रीमती शितल सोनवणे, के. के. चौधरी, जे. जी. चौधरी व एम. बी. कायत, जिल्हा पोलिस दलातील अधिकारी, अंमलदार इतर संबंधित अधिकारी व विशेष कामगिरी करणाऱ्या अधिकारी व अंमलदारांचा सन्मान करण्यात आला.

उपस्थितांनी बालविवाह प्रतिबंधाची शपथ घेतली. कार्यक्रमात एस. ए. मिशन प्राथमिक शाळा, डॉ. काणे गर्ल्स हायस्कूल, गुजराती प्राथमिक शाळा नवापूर व अँग्लो उर्दू हायस्कूल नंदुरबार या विद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थीनींनी देशभक्तीपर गीत, नृत्य व परेड मार्च सादर केले. या वेळी खासदार ॲड. गोवाल पाडवी, विधान परिषदेचे आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार राजेश पाडवी, आमशा पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, जिल्हा पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुश पालवे, अपर जिल्हा पोलिस अधीक्षक आशित कांबळे आदींसह मान्यवर उपस्थित होते.

Dhule, Nandurbar-Today
28/01/2026 Page No. 1

सकाळ

# पोस्ट कार्यालयात कर्मचाऱ्यांची वानवा

## ग्राहकांमध्ये नाराजीचर सूर; जागेचाही प्रश्न

■ सकाळ वृत्तसेवा

तळोदा, ता. २७ : येथील पोस्ट कार्यालयात काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची संख्या कमी असून, जागा देखील मर्यादित असल्याने याठिकाणी आपल्या कामानिमित्त येणाऱ्या ग्राहकांना तासन्तास ताटकळत उभे रहावे लागत आहे. त्यामुळे ग्राहकांमधून नाराजीचा सूर उमटत असून, परिस्थितीमध्ये सुधारणा करावी, अशी अपेक्षा ग्राहकांमधून व्यक्त करण्यात येत आहे.

शहरातील पोस्ट कार्यालय लहानशा जागेवर असून, दिवसेंदिवस ग्राहकांची संख्या वाढत चालली आहे. त्यामुळे आता पोस्ट कार्यालयाची जागा कमी पडत आहे. कमी जागेत कॅश काउंटरची जागा, कर्मचाऱ्यांचे काउंटर, कर्मचाऱ्यांसाठी बसण्याची जागा, टेबलसाठी जागा यातच सर्व जागा व्यापली जात आहे. याठिकाणी कामानिमित्त येणारे ज्येष्ठ नागरिक, दिव्यांग महिला व ग्राहकांना ना उभे राहण्यासाठी जागा असते, ना बसण्यासाठी. त्यातच कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्याने ग्राहकांना जलद सुविधा मिळत नाही. तळोदा शहर व तालुक्यातील प्रतिनिधी दरमहा भरणा करण्यासाठी मोठ्या प्रमाणावर असल्याने त्यात बराच वेळ जातो. त्यामुळे इतर ग्राहकांना ताटकळत कार्यालयामध्ये उभे रहावे लागते.



**तळोदा :** पोस्ट ऑफिसमध्ये झालेली ग्राहकांची गर्दी.

### लाडक्या बहिणींची मोठी गर्दी

लाडक्या बहिणींचे खाते पोस्टमध्ये असल्याने लाडक्या रोख रक्कम काढण्यासाठी मोठ्या प्रमाणावर गर्दी होते. त्यात लहानशा जागेवर यात्रेचे स्वरुप प्राप्त झालेले असते. त्यामुळे ग्राहकांच्या कामांना नेहमीच विलंब होतो. त्यामुळे ज्येष्ठ नागरिक, महिला व ग्राहकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, ही अडचण दूर करण्यासाठी रोख रकमेचा भरणा करणे व काढण्यासाठी वेगवेगळे दोन कर्मचारी व दोन टेबलची व्यवस्था करण्यात यावी, अशी मागणी ग्राहकांकडून केली आहे.

Dhule, Nandurbar-Today
28/01/2026 Page No. 1

सकाळ

# एकत्र काम केल्यास नंदुरबारची प्रगती

## राज्यमंत्री योगेश कदम यांचे प्रतिपादन; मुख्य ध्वजवंदन उत्साहात

■ सकाळ वृत्तसेवा

**नंदुरबार, ता. २७ : शासन आणि प्रशासन हे दोन्ही घटक एकत्र येऊन काम केल्यास नंदुरबारसारख्या आदिवासीबहुल जिल्ह्याची प्रगती निश्चित होईल, असा विश्वास राज्याचे गृहराज्यमंत्री (शहरे), महसूल ग्रामविकास व पंचायत राज, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण अन्न व औषध प्रशासन विभागाचे राज्यमंत्री योगेश कदम यांनी व्यक्त केला.**

येथील पोलिस कवायत मैदानावर ७७ व्या भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या मुख्य ध्वजवंदन समारंभात जिल्हावासीयांना संबोधित करताना ते बोलत होते. या वेळी खासदार ॲड. गोवाल पाडवी, आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार राजेश पाडवी, आमशा पाडवी, जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, जिल्हा पोलिस अधीक्षक श्रवण दत्त एस., जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी नमन गोयल, अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, सहाय्यक जिल्हाधिकारी अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी श्रीमती स्वाती संधर्वे, उपजिल्हाधिकारी प्रमोद भामरे, स्पृहा वाडकर, ज्ञानेश्वर पाटील, कल्पना ठुबे, अपर जिल्हा पोलिस अधीक्षक आशित कांबळे, जिल्हा नियोजन अधिकारी शशांक काळे, राज्य उत्पादन शुल्कचे अधीक्षक स्नेहा सराफ, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अंकुश पालवे, विभागीय वन अधिकारी डॉ. प्रकाश गुजर व विविध यंत्रणांचे विभागप्रमुख, कर्मचारी उपस्थित होते.

राज्यमंत्री श्री. कदम यांनी जिल्ह्याच्या विकासासाठी शासनाने केलेले प्रयत्न यशस्वीरित्या पार पाडल्याबद्दल जिल्ह्यातील अधिकाऱ्यांचे कौतुक केले. जिल्ह्यात फ्लुकलसारख्या अनेक योजना दुर्गम भागामध्ये यशस्वीरित्या राबवल्या जात आहेत. महिला बचतगटांनी तयार केलेल्या वस्तू विक्री करण्यासाठी 'उमेद मॉल' ही योजना १२ जिल्ह्यांत सुरू झाली असून, लवकरच नंदुरबार जिल्ह्यामध्येही १०० टक्के निधीसह ती लागू करण्यात येईल, यासाठी राज्याचे मुख्यमंत्री व ग्रामविकास मंत्र्यांशी चर्चा करणार असल्याचे सांगितले. जिल्ह्यात सिकलसेल असलेल्या रुग्णांसाठी अनेक योजना असून, त्याचे निर्मूलन करण्यासाठी आरोग्य विभागाने जवळपास आठ लाख नागरिकांची तपासणीचे नियोजन केले आहे. आतापर्यंत साडेतीन लाख नागरिकांची तपासणी पूर्ण केली असून, एक हजारापेक्षा जास्त दिव्यांगांना प्रमाणपत्र देण्यात आले आहेत.

राज्यमंत्री कदम म्हणाले, जिल्हाधिकारी कार्यालयाच्या 'हेल्थ ॲक्शन सेंटर'द्वारे उच्च जोखीम असलेल्या जवळपास साडेतीन हजार गर्भवती मातांना आणि साडेसात बालकांना ट्रॅकिंग करून बालमृत्यूचे प्रमाण कमी करण्याचे काम केले गेले, याचे विशेष कौतुक आहे.



**नंदुरबार :** पोलिस कवायत मैदानाजवळ अद्ययावत ओपन जिमचे भूमिपूजन करताना गृहराज्यमंत्री योगेश कदम. शेजारी उपस्थित मान्यवर.

### स्थानिक रोजगारासाठी शासन प्रयत्नशील

नंदुरबार जिल्हा हा महाराष्ट्र-गुजरात सीमेवर असल्यामुळे रोजगाराच्या संधी राज्याबाहेर उपलब्ध होतात. यावर उपाय म्हणून जिल्ह्यात कालतील मारत उद्योग उभे करून तरुणांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी शासन प्रयत्नशील असेल. भारतीय संविधानाच्या बळावर भारत देश जगात सर्वात मजबुतीने उभा असल्याचे सांगून, सर्वांनी एकोप्याने राहण्याचे आवाहन राज्यमंत्री श्री. कदम यांनी केले.

### विविध विकासकामांचे भूमिपूजन

■ गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी नंदुरबार जिल्हा पोलिस मुख्यालयाला सदिच्छा भेट दिली. या वेळी त्यांच्या हस्ते पोलिस दलातील विविध विकासकामांचे भूमिपूजन व लोकार्पण उत्साहात पार पडले. पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्यासाठी पोलिस कवायत मैदानाजवळ अद्ययावत 'ओपन जिम' उभारण्यात येणार असून, त्याचे भूमिपूजन गृहराज्यमंत्री कदम यांच्या हस्ते झाले. यासोबतच पोलिस मुख्यालयात नव्याने उभारण्यात आलेल्या सोलर प्रकल्पाचे लोकार्पण करण्यात आले. तसेच, अन्य मूलभूत सुविधांच्या कामांचाही प्रारंभ करण्यात आला. 'पोलिस दलाचे सक्षमीकरण करणे आणि त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे हे शासनाचे कर्तव्य आहे. या नव्या सुविधांमुळे कर्तव्य बजावणाऱ्या जवानांना शारीरिक तंदुरुस्ती राखण्यास निश्चितच मदत होईल, असे त्यांनी नमूद केले.

Dhule, Nandurbar-Today
28/01/2026 Page No. 1

**दै.दिव्यमराठी** **दि.२९ जानेवारी,२०२६**

दिव्य मराठी **धुळे सिटी** 28-01-2026

**सन्मान** • पोलिस दलातील अधिकाऱ्यांसह अंमलदारांनाही प्रमाणपत्रांचे करण्यात आले वितरण

# प्रजासत्ताकदिनी विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्यांचा राज्यमंत्री योगेश कदमांच्या हस्ते केला गौरव

**प्रतिनिधी** | नंदुरबार

जिल्ह्यात विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना आरोग्य राज्यमंत्री योगेश कदम यांच्या हस्ते गौरविण्यात आले.

यात सशस्त्र सेना ध्वजदिन निधी संकलन २०२४ चे इष्टांक वेळेत पूर्ण केल्याबद्दल जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांचा राज्यमंत्री कदम यांच्या हस्ते स्मृति चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. तसेच महसुल विषयक उल्लेखनिय कामकाज केल्याकामी अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, नायब तहसिलदार बनशिलाल वाडीले, महसूल सहाय्यक माया मराठे, प्रितम नागदेवते, दिपक निळे, संगिता राठोड, ग्राम महसूल अधिकारी झेड.के. गायकवाड, महसूल अधिकारी अमित गावीत, तलाठी राजेश पवार, अरुण कोकणी, मंडळ अधिकारी मिथुन राठोड, ग्राम महसूल अधिकारी राजश्री पाडवी, जे.डी. पाटील, जगेंद्र अहिरे, कपील परदेशी व ग्राम महसूल अधिकारी सुभाष पाडवी तर खरीप हंगाम २०२५ अंतर्गत 'उत्कृष्ट शेतीशाळा' आयोजित स्पर्धा विजेते जिल्हास्तरीय प्रथम अर्जुन पावरा, द्वितीय स्वाती गावीत, तृतीय प्रवीण पगारे, चतुर्थ सुरेश गावीत यांच्यासह शीतल सोनवणे, के.के. चौधरी, जे.जी. चौधरी व एम.बी. कायत यांचाही गौरव करण्यात आला.



अधिकारी-कर्मचाऱ्यांचा गौरव करताना राज्यमंत्री योगेश कदम.

### पोलिस अधिकारी, अंमलदारांना प्रमाणपत्र

जिल्हा सरकारी वकील विनोद गोसावी, पो.नि. हेमंत पाटील, नीलेश देसले, हेमंतकुमार पाटील, प्रभारी कार्यालय अधीक्षक संदीप सोनवणे, स.पो.नि जगेश खलाणे, धर्मराज पटले, पोलिस उपनिरिक्षक मुकेश पवार, महिला पो.उ. प्रिया वसावे, पोलीस हवालदार रतन रामोळे, नितीनकुमार साबळे, पोलीस शिपाई अभय राजपूत, जब्बार शेख, विलास पांढारकर, भिका गवळे, हेमंत बारी व महिला पोलीस नाईक कांती वसावे यांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरवण्यात आले.

दिव्य मराठी
धुळे सिटी 28-01-2026

# पोलिस स्टेशनचे विभाजन करा, शिवसेनेचे निवेदन

**प्रतिनिधी** | शहादा

येथील पोलिस स्टेशन विभाजित करण्यासह पुरेसा अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करुन देण्याची मागणी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे शिवसेना शिंदे गटातर्फे करण्यात आली असून यासंदर्भात निवेदनही त्यांना देण्यात आले. शहादा शहरातील पोलिस स्टेशनला लोकसंख्येनुसार तात्काळ पुरेसा कर्मचारी व अधिकारी वर्ग उपलब्ध करुन देण्यासह पोलीस स्टेशन विभाजित करुन शहादा शहर व शहादा ग्रामीण भागासाठी स्वतंत्र पोलिस ठाणे निर्मिती करण्याची राज्याचे गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना शिवसेना तालुका प्रमुख मनलेश जायसवाल यांच्यातर्फे निवेदन देण्यात आले. याबाबतचा अहवाल मिळाल्यावर तात्काळ कार्यवाही करुन शहादा पोलिस स्टेशन विभाजित करण्यास मान्यता देण्यात येईल असे आश्वासन मंत्री योगेस कदम यांनी दिले. यावेळी आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार आमश्या पाडवी, शिवसेना जिल्हा प्रमुख राम रघुवंशी, जिल्हा प्रमुख गणेश पराडके आदी उपस्थित होते.


राज्यमंत्री योगेश कदम यांना निवेदन देताना शिवसेनेचे पदाधिकारी.

निवेदनावर शहादा शिवसेना तालुका प्रमुख मनलेश जायसवाल, नगरसेवक जितेंद्र जमदाडे, युवासेना जिल्हा उपप्रमुख राजरत्न बिरारे यांच्या सह्या आहेत.

दिव्य मराठी
धुळे सिटी 28-01-2026

# कायम सेवेत घेण्याच्या मागणीसाठी 'रोहयो' कर्मचाऱ्यांचे बेमुदत कामबंद

**प्रतिनिधी** | नंदुरबार

महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्यात यावे, या प्रमुख मागणीसह विविध मागण्या करण्यात करत, मनरेगा कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्मरणपत्र देत २३ जानेवारीपासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात शुक्रवारी काळ्या फीत लावून शासनाचा निषेध करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, तहसील कार्यालय, पंचायत समिती अशा विविध कार्यालयामध्ये मनरेगाचे कंत्राटी अधिकारी, कर्मचारी विविध पदांवर कार्यरत आहेत. इतर समकक्ष योजनांतील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्याबाबत अथवा आवश्यक संरक्षण प्रदान करण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेतले. मात्र, मनरेगा योजनेच्या


काळ्या फिती लावून बेमुदत काम बंद आंदोलन करताना रोहयो कर्मचारी

## विविध मागण्या करण्यात आल्या

रोहयोच्या सर्व कंत्राटी अधिकारी, कर्मचाऱ्यांना इतर योजनेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे शासन सेवेत नियमित समायोजन करावे, एस २ इन्फोटेक कंपनीमार्फत भरती रद्द करुन त्याऐवजी सर्व कर्मचाऱ्यांना राज्य निधी असोसिएशन मार्फत नियुक्ती देवुन समान काम, समान वेतन धोरण लागु करण्यात यावे, इतर विभागाप्रमाणेच मनरेगा विभागाची स्वतंत्र यंत्रणा तयार करुन पदनिहाय आकृतीबंध तयार करण्यात यावा.

कर्मचाऱ्यांबाबत अद्याप ठोस निर्णय झाला नाही. शासनाकडून याची दखल घेण्यात न आल्याने स्मरणपत्र देऊन शुक्रवारपासून आंदोलन झाले. दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे. बीडीओ यांच्यामार्फत मागण्यांचे निवेदन संघटनेचे शिष्टमंडळाद्वारे शासनाला देण्यात आले. संबंधित कर्मचाऱ्यांनी काळ्याफित्ति लावून शासनाचा निषेध केला. यावेळी तहसील कार्यालय व पं.स. समोर घोषणाही देत निषेध करण्यात आला. यावेळी डीपीओ गजानन मराठे, दर्पण शहा, विजय बागुल, श्रेया पवार, प्रतिक पगारे, राहुल बोरसे, संदीप वाडीले, मिलिंद पाडवी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

दिव्य मराठी
धुळे सिटी 28-01-2026

**चिंता •** धडगाव, अक्कलकुव्यात हलका पाऊस; रब्बीसह आंबा बागांचे नुकसानीची भीती

# शहाद्यात १५ मिनिटे पाऊस ; संपूर्ण जिल्ह्यावर 31 जानेवारीपर्यंत अवकाळीचे संकट कायम

प्रतिनिधी | नंदुरबार

जिल्ह्यात मागील आठवड्यापासून हवामानात लक्षणीय बदल जाणवत असून ३१ जानेवारीपर्यंत ढगाळ वातावरण कायम राहण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. सोमवारी रात्री ९ वाजेच्या सुमारास शहादा तालुक्यातील मोहिदा व काही भागात सुमारे १५ मिनिटे पाऊस झाला. यामुळे या भागातील रब्बी पिकांसह आंबा बागांचे किरकोळ स्वरूपात नुकसान झाल्याची माहिती आहे.

लागवी नंतर पहिल्यांदाच आंब्याला मोहर आला असून या पावसाने पाने व मोहर गळून पडला आहे. तसेच धडगाव व अक्कलकुवा तालुक्यातील पर्वतीय भागात हलका पाऊस झाला आहे. जिल्ह्यात वातावरण बदलल्याने किमान तापमान घसरत १२ अंश सेल्सिअसपर्यंत आले आहे. विशेष म्हणजे दिवसा देखील वातावरणात गारवा जाणवत आहे. हवामान विभागाने दिलेल्या अंदाजानुसार शनिवारपर्यंत जिल्ह्यावर अवकाळीचे ढग कायम राहणार आहेत. सध्या रब्बी हंगामातील गहू अनेक शेतांमध्ये काढणीवर आला आहे. हरभरा देखील पक्व होत असून येणाऱ्या काळात पाऊस झाल्यास या पिकांचे मोठे नुकसान होण्याची भीती शेतकऱ्यांना आहे. महिनाभरापासून अधून-मधून ढगाळ वातावरण कायम असल्याने गहू, हरभरा, ज्वारी, मका, तूर या पिकांवर रोगांचा प्रादुर्भाव होत आहे.



आंब्याच्या झाडांचे झालेले नुकसान.

**दिव्य मराठी एक्सपर्ट** नीलेश गोरे, हवामान अभ्यासक.

### १ फेब्रुवारी पर्यंत वातावरण ढगाळ राहील

*पश्चिमेकडून येणारी प्रणाली सक्रिय झाल्याने जिल्ह्यात वातावरणात बदल होत आहे. जिल्ह्यात पुढील काही दिवस हवामान अस्थिर राहण्याची शक्यता आहे. एक दोन दिवस तापमानात घट होईल तर लगेच दुसऱ्या दिवशी त्यात वाढ ही होईल. किमान तापमान १३ ते १५ डिग्री सेल्सिअस राहील. १ फेब्रुवारी पर्यंत वातावरण ढगाळ राहील.*

**- नीलेश गोरे,** हवामान अभ्यासक.

**पुढे काय?**

### गहू व भाजीपाला पिकांवर होऊ शकतो प्रतिकूल परिणाम

हवामान तज्ज्ञांच्या माहितीनुसार, उत्तर भारतातून येणाऱ्या थंड व कोरड्या हवेचा प्रवाह तसेच अरबी समुद्रावर निर्माण झालेल्या कमी दाबाच्या क्षेत्राचा अप्रत्यक्ष प्रभाव नंदुरबार जिल्ह्यावर पडत आहे. या दोन प्रणालींच्या संयोगामुळे वातावरणात आर्द्रता वाढून ढगाळ स्थिती निर्माण झाली आहे. सकाळी धुके, दिवसा ढगाळपणा आणि संध्याकाळी गार वारे अशी स्थिती आहे. उशिराने पेरणी झालेल्या भागात हलका पाऊस झाला तर पिकांना लाभ होण्याची शक्यता आहे. गहू, हरभरा, ज्वारी यांसारख्या रब्बी पिकांसाठी हा पाऊस काही अंशी फायदेशीर आहे. जमिनीत ओलावा टिकून राहण्यास मदत होईल. मात्र काढणीच्या टप्प्यात असलेल्या गहू व भाजीपाला पिकांवर मात्र प्रतिकूल परिणाम होऊ शकतो.

# जिल्हा धुळे

लोकमत

मस्ट READ

# धांदरणे परिसरात अवकाळी पावसामुळे पिकांचे नुकसान

लोकमत न्यूज नेटवर्क

**धांदरणे :** शिंदखेडा तालुक्यातील डाबली, धांदरणे, होळ, गोराणे आणि विटाई परिसरात २७ रोजी आलेल्या वादळी वाऱ्यामुळे व अवकाळी पावसामुळे रब्बी हंगामातील गहू, हरबरा, ज्वारी आणि मका या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून, शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडले आहेत.

राज्यातील हवामानात सातत्याने बदल होत असून, कधी गारठा तर कधी पावसाचे प्रमाण वाढले आहे. त्या पार्श्वभूमीवर अवकाळी आलेल्या पावसामुळे आणि वादळी वाऱ्यामुळे शेतकऱ्यांची पिके जमीनदोस्त झाली आहेत. या नुकसानीमुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसला असून, बँक आणि सावकारांची कर्जे फेडण्याबाबत शंका निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांनी घेतलेल्या कर्जाच्या आणि उत्पादनातील खर्चाच्या पार्श्वभूमीवर, हिजे पिकांची नुकसान होत असताना कर्ज फेडता येईल का, असा प्रश्न शेतकऱ्यांना सतावत आहे. शेतकरी वर्गाने प्रशासनाने तातडीने पंचनामे करून, नुकसानभरपाई मिळवून दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी केली आहे.

धांदरणे - डाबली परिसरात झालेल्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करण्याची मागणी होत आहे.



दत्ताने परिसरातील शेतात झालेल्या गव्हाच्या पिकाचे नुकसान

## दत्ताने परिसरात गहू व ज्वारीचे नुकसान

दत्ताने व अजंदे येथील काही शेतकऱ्यांचे गहू व ज्वारी अशा उभ्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. सहाय्यक कृषी अधिकारी कुमुदिनी पाटील व तलाठी कपिल आले यांनी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन तात्काळ पंचनामे केले आहे.

लोकमत

# केवायसी चुकलेल्या बहिणींना दिलासा; अंगणवाडीताई करणार प्रत्यक्ष पडताळणी

## जिल्ह्यात तब्बल ५१ हजार ४८४ महिलांच्या अर्जांमध्ये अनेक तांत्रिक आढळल्या त्रुटी; आता त्यांची पडताळणी होणार

लोकमत न्यूज नेटवर्क

**धुळे** : 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांसाठी एक मोठी अपडेट समोर आली आहे. जिल्ह्यातील तब्बल ५० हजार ४८४ महिलांच्या अर्जांमध्ये तांत्रिक चुका आणि केवायसी प्रक्रियेत त्रुटी आढळल्या आहेत. या महिलांची पात्रता निश्चित करण्यासाठी आता अंगणवाडी सेविका त्यांच्या घरी जाऊन प्रत्यक्ष पडताळणी करणार आहेत. योजनेसाठी ऑनलाइन अर्ज भरताना अनेक महिलांनी तांत्रिक माहिती भरताना चुका केल्या आहेत.

केवायसी करताना काही महिलांनी चुकीचे पर्याय निवडल्याने त्यांचे अर्ज संशयास्पद किंवा त्रुटीयुक्त दिसत आहेत. ही बाब शासनाच्या निदर्शनास आल्यानंतर, पात्र महिलांना योजनेपासून वंचित राहू नये आणि अपात्र व्यक्तींना लाभ मिळू नये, म्हणून हा निर्णय घेतला.

### केवायसी चुकलेल्या बहिणींना दिलासा

ज्या महिलांनी केवायसी करताना नजरचुकीने चुकीचे पर्याय निवडले होते, त्यांचे अर्ज 'पेंडिंग' किंवा 'रिजेक्ट' श्रेणीत गेले होते. आता अंगणवाडी सेविका स्वतः माहिती दुरुस्त करून घेणार आहे.




### अंगणवाडी सेविका प्रत्यक्ष पडताळणी करणार

**१** आता महिलांना महा-ई-सेवा केंद्र किंवा सेतू कार्यालयात चकरा मारण्याची गरज नाही. अंगणवाडी सेविका त्यांच्या कार्यक्षेत्रातील लाभार्थी महिलांच्या घरी जाऊन अर्जातील माहिती आणि प्रत्यक्ष स्थितीची खातरजमा करतील. पडताळणी दरम्यान प्रामुख्याने अर्जातील उत्पन्न गट आणि प्रत्यक्ष उत्पन्नाचा दाखला, वैवाहिक स्थिती (विवाहित, विधवा, परित्यक्ता आदी) आधार कार्डशी लिंक असलेला मोबाइल क्रमांक, रहिवासी पुरावा आणि बँकेचे खाते सक्रिय आहे का? याची तपासणी केली जाणार आहे.

### नोव्हेंबर-डिसेंबरचे हप्ते अडकले

**२** ज्या महिलांच्या अर्जात केवायसीच्या त्रुटी आहेत, अशा अनेक लाभार्थींचे नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्याचे हप्ते अद्याप जमा झालेले नाहीत. या पडताळणीनंतर पात्र ठरणाऱ्या महिलांचे हे प्रलंबित हप्ते एकत्रितपणे खात्यात जमा होण्याची शक्यता आहे. आता जिल्ह्यातील सर्वच गावांमध्ये अंगणवाडी सेविका प्रत्यक्ष घरोघरी जाऊन पडताळणी करणार असल्याने यातून ज्यांना पैसे मिळाले नाही त्यांना या पडताळणीनंतर हप्ते मिळण्यास सुरुवात होणार आहे.

### जिल्ह्यातील महिलांनी केले निर्णयाचे स्वागत

**३** शासनाच्या निर्णयामुळे कोणावरही अन्याय होणार नाही आणि महा ई- सेवा केंद्र किंवा सेतू कार्यालयाच्या चकरा माराव्या लागणार नाही. त्यामुळे महिलांनी शासन निर्णयाचे स्वागत केले आहे.

### जिल्ह्यात ५० हजार महिलांना फटका

जिल्ह्यात ५१ हजार ४८४ महिलांच्या अर्जांमध्ये तांत्रिक त्रुटी आढळल्या आहेत. यात चार टप्प्यांत वर्गीकरण करण्यात आले आहे. ६५ पेक्षा अधिक वय असल्याचे ५ हजार ५२४, २१ वयापेक्षा कमी असलेले २ हजार ४२२, तर चुकीचा पर्याय निवडणारे तब्बल ४१ हजार ८२७ इतकी आहे. शिवाय, लिंग चुकीचे निवड केल्याने ७११ महिलांचा समावेश आहे. इतक्या मोठ्या संख्येने महिलांचे हप्ते रखडल्याने ग्रामीण भागात चिंतेचे वातावरण होते. आता ही पडताळणी मोहीम या सर्व महिलांसाठी आशेचा किरण ठरली आहे. या निर्णयाचा जिल्ह्यातील महिलांनी स्वागत केले आहे.

### या प्रश्नांमुळे झाला होता गोंधळ

केवायसी करताना विचारण्यात आलेल्या प्रश्नांच्या उत्तरात गोंधळ झाला होता. उदा. 'तुम्ही सरकारी नोकरीत आहात का?' किंवा 'उत्पन्न २.५ लाखांपेक्षा जास्त आहे का?' या प्रश्नांना 'हो' किंवा 'नाही' म्हणताना अनेक महिलांनी चुकीचे बटण दाबले होते, ज्यामुळे त्या अपात्र ठरल्या होत्या. आता पडताळणी त्या गोष्टी स्पष्ट होऊन कोणावरही अन्याय होणार नाही.



### पात्र महिलांना जि. प. मतदानापूर्वी मिळणार हप्ता?

जिल्हा परिषदेच्या निवडणुकांचे वारे वाहत असल्याने, मतदानापूर्वी या सर्व पात्र महिलांच्या खात्यात रखडलेले पैसे जमा करण्याचा सरकारचा मानस आहे. पडताळणी प्रक्रिया युद्धपातळीवर पूर्ण झाल्यास फेब्रुवारी महिन्यात हे पैसे खात्यात पडू शकतात.

> जिल्ह्यातील ज्या ५०,४८४ अर्जांमध्ये त्रुटी आहेत, त्यांची पडताळणी अंगणवाडी सेविकांमार्फत सुरू केली आहे. पात्र महिलांनी सेविकांना सहकार्य करावे. कोणाचेही हप्ते विनाकारण थांबवले जाणार नाहीत, तांत्रिक चुका दुरुस्त करणे हाच या मोहिमेचा मुख्य उद्देश आहे.
>
> - राजेंद्र भामरे, महिला व बालकल्याण अधिकारी, धुळे

सकाळ

# तीनशेवर ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक ?

## धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील निवडणुका लांबणीवरचा परिणाम

■ सकाळ वृत्तसेवा

**धुळे, ता. २८: राज्यातील एकूण १४ हजार २४० ग्रामपंचायतींचा कार्यकाळ फेब्रुवारीपासून संपत आहे. मात्र, निवडणुकीसाठी आवश्यक पूर्वतयारी पूर्ण न झाल्यामुळे या सर्व ठिकाणी निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ शकतात. त्या पार्श्वभूमीवर ग्रामविकास विभागाचे अपर सचिव म. आसोले यांनी २३ जानेवारीला आदेश काढले. त्यानुसार, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांतील सुमारे तीनशे ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया सुरू होणार आहे.**

### सरपंचांकडून मागण्या

विद्यमान सरपंचांकडून प्रशासक म्हणून त्यांच्याच नियुक्तीची मागणी करण्यात येत असली तरी, या वेळी प्रशासक पदावर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी कार्यभार सांभाळणार आहेत. या निर्णयामुळे सरपंच संघटना काही प्रमाणात असंतुष्ट आहे.




### पूर्वतयारी नाही

कार्यकाळ संपणाऱ्या ग्रामपंचायतींत प्रभागरचना, आरक्षण आणि मतदार यादी अद्याप तयार नाही. या प्रक्रियेला किमान तीन ते चार महिन्यांचा कालावधी आवश्यक असतो. त्यामुळे निवडणुका किमान सहा महिन्यांनी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### प्रशासकांची शक्यता

अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार धुळे जिल्ह्यात २१८, नंदुरबार ८७, जळगाव ७८३, नाशिक ६२१ व अहिल्यानगर जिल्ह्यात ७६७ ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती होऊ शकते. पूर्वतयारी न झाल्यामुळे ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रशासकांची नियुक्ती ही तातडीची गरज बनली आहे. यामुळे प्रशासनाला नागरिकांच्या सेवेसाठी मार्गदर्शन सुनिश्चित करण्याची जबाबदारी पुढे येत आहे.

### इतिहासाची आठवण

■ प्रभागरचना २०२० मध्ये जुलैपासून सुरू झाली होती. डिसेंबरमध्ये प्रारूप यादी तयार झाली आणि १५ डिसेंबरपासून निवडणूक प्रक्रिया सुरू झाली होती. १५ जानेवारी २०२१ ला मतदान झाले. यंदा मुदत संपत असतानाही प्राथमिक तयारीसाठी आदेश जारी नाहीत. यापूर्वी मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये २६ सप्टेंबर १९९४ ते ७ मे १९९५ दरम्यान ग्रामविस्तार अधिकाऱ्यांऐवजी विद्यमान सरपंच यांनाच प्रशासक म्हणून नियुक्त केले गेले होते.

Dhule, Dhule-Today
29/01/2026 Page No. 2

**दै.दिव्यमराठी** **दि.२९ जानेवारी,२०२६**

दिव्य मराठी, धुळे. गुरुवार, २९ जानेवारी २०२६

**अस्मानी फटका •** भाटपुरा, थाळनेर परिसरात गारपीट; सावेरमध्ये घरांचीझाली पडझड

# शिरपुरात २३५३ हेक्टरवरील पिके आडवी; १८३० शेतकऱ्यांचे नुकसान

**प्रतिनिधी** | शिरपूर

शिरपूर तालुक्यातील भाटपुरा, थाळनेर आणि होळनांथे परिसरात मंगळवारी झालेल्या भीषण गारपीट आणि वादळी वाऱ्यामुळे शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. निसर्गाच्या या कोपामुळे हाताशी आलेली पिके भूईसपाट झाली असून, सावेर गावातील अनेक घरांची छपरे उडाल्याने अनेक कुटुंबे उघड्यावर आली आहेत.

वादळामुळे अनेक गावांमधील वीज खांब कोसळल्याने सावेर व परिसरात अंधाराचे साम्राज्य पसरले आहे. महावितरणकडून वीज पुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू आहे. तालुक्यात मंगळवारी झालेले वादळ इतके प्रचंड होते की शेतातील मोठी झाडे उन्मळून पडली असून रखवालदारांच्या झोपड्यांचे पत्रे उडून गेले आहेत. प्रामुख्याने केळी, पपई, मका आणि गहू या पिकांचे सर्वाधिक नुकसान झाले आहे. नुकसानीचा प्राथमिक आकडा सुमारे २,३५३ हेक्टर पर्यंत पोहोचला असून यात १,८३० हून अधिक शेतकऱ्यांना फटका बसला आहे.



वादळी पावसामुळे सावेर गावात घराचे झालेले नुकसान.

### आमदार अमरीश पटेल व काशिराम पावरा थेट बांधावर

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन आमदार अमरीशभाई पटेल आणि आमदार काशिराम पावरा यांनी स्वतः शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. शेतकऱ्यांना धीर देत त्यांनी तातडीने मदतीचे आश्वासन दिले. तसेच शिवसेना (शिंदे गट) नेते हेमंत पाटील आणि राजेंद्र गिरासे यांनीही बाधित क्षेत्राचा दौरा केला.

### पडझडीचे पंचनामे करुन अहवाल शासनास देणार

प्रांताधिकारी शरद मंडलिक, तहसीलदार महेंद्र माळी आणि तालुका कृषी अधिकारी संजय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली तलाठी व कृषी सहायकांनी युद्धपातळीवर पंचनामे सुरू केले आहेत. सावेर गावातील सरदार धुडकू सैंदाने, शानाभाऊ भील, कमलबाई निकम, राम अमृत गुजर यांच्यासह अनेकांच्या घरांचे नुकसान झाले असून त्याचा अहवाल शासनाकडे पाठवण्यात येणार आहे.

### नुकसान झालेली पिके आणि क्षेत्र

केळी ७५० हेक्टर, पपई ३१२ हेक्टर, टमाटे ५५ हेक्टर, टरबूज २५ हेक्टर, मका ६३० हेक्टर, रब्बी ज्वारी ११२ हेक्टर, हरभरा ३२० हेक्टर, गहू १३२ हेक्टर, उन्हाळी बाजरी १७ हेक्टर असे अंदाजित २ हजार ३५३ हेक्टर क्षेत्रावरील नुकसान झाले आहे. यात १ हजार ८३० शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. यात नुकसान क्षेत्र व शेतकरी संख्या अंतिम पंचनामे नंतर वाढू शकते.

### शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन केले जातयेत पंचनामे

*नुकसानीचे पंचनामे सुरू केलेले आहेत. संपूर्ण नुकसानग्रस्त क्षेत्राचे पंचनामे होतील. आजची आकडेवारी पूर्ण नाही. पूर्ण पंचनामे झाल्यानंतरच अंतिम आकडेवारी जाहीर करण्यात येईल. नुकसानग्रस्त सर्वच शेतकऱ्यांचे पंचनामे पूर्ण होतील. यासाठी प्रशासकीय यंत्रणा बांधावर जाऊन पंचनामा करीत आहे.*

**–संजय पवार,** तालुका कृषी अधिकारी

# मनरेगा कंत्राटी कर्मचाऱ्यांना 'समान काम-समान वेतन' देण्याची मागणी

## साक्री येथे प्रलंबित मागण्यांसाठी गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन

**प्रतिनिधी | साक्री**

महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी शासनाविरोधात आवाज बुलंद केला आहे. राज्यभरात आमदार व खासदारांना निवेदन सादर करत कर्मचाऱ्यांनी आपल्या मागण्यांकडे लक्ष वेधले आहे. मनरेगा योजना ग्रामीण भागाचा कणा मानली जाते. मात्र हीच योजना प्रभावीपणे राबवणारे कंत्राटी अधिकारी व कर्मचारी गेल्या अनेक वर्षांपासून सेवा-सुरक्षा, नियमित वेतन व मूलभूत हक्कांपासून वंचित असल्याचा आरोप कर्मचाऱ्यांनी केला आहे. शासनाकडून वारंवार दुर्लक्ष होत असल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. कर्मचाऱ्यांच्या प्रमुख मागण्यांमध्ये मनरेगा अंतर्गत कार्यरत सर्व कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित किंवा समायोजित करणे, एस- २ इन्फोटेक कंपनीमार्फत सुरू असलेली अनधिकृत व अवैध भरती प्रक्रिया तात्काळ बंद करणे, तसेच सदर कंपनीचा करार रद्द करून राज्य निधी असोसिएशनमार्फत नियुक्ती देत 'समान काम, समान वेतन' हे धोरण लागू करण्याचा समावेश आहे. तसेच इतर विभागांप्रमाणे मनरेगा विभागासाठी स्वतंत्र यंत्रणा निर्माण करून पदनिहाय आकृतीबंध तयार करण्याची मागणी आहे. यामुळे विभागातील गैरप्रकारांना आळा बसेल, असा विश्वास व्यक्त केला.



गटविकास अधिकाऱ्यांना निवेदन देताना कंत्राटी कर्मचारी.

### अन्यथा तीव्र आंदोलनाचा दिला इशारा

या आंदोलनाचा भाग म्हणून गटविकास अधिकारी शशिकांत सोनवणे यांना निवेदन देण्यात आले. शासनाने तात्काळ सकारात्मक निर्णय न घेतल्यास राज्यव्यापी तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा स्पष्ट इशारा कर्मचाऱ्यांनी दिला आहे.

# टीईटीमुळे शिक्षकांच्या पदोन्नती रोखल्या; निर्णय रद्दबाबत मागणी

## भाजप शिक्षक आघाडीचे मागण्यांबाबत शालेय शिक्षण मंत्र्यांना निवेदन

**प्रतिनिधी** | धुळे

राज्यातील हजारो शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रियेत टीईटीची अट घालण्याच्या शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयामुळे मोठा पेच निर्माण झाला आहे. हा निर्णय आरटीई कायद्याच्या विरोधात असल्याचा आरोप करत भाजप शिक्षक आघाडीने राज्याचे शालेय शिक्षण राज्यमंत्री पंकज भोयर यांना निवेदन देऊन संताप व्यक्त केला आहे.

शालेय शिक्षण विभागाच्या अवर सचिवांनी १९ जानेवारी २०२५ रोजी एक पत्र निर्गमित केले. या पत्राद्वारे पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख आणि विस्तार अधिकारी अशा विविध पदांवरील पदोन्नतीसाठी 'टीईटी' अनिवार्य आहे. या एका प्रशासकीय पत्रामुळे संपूर्ण राज्यातील सुरू असलेली पदोन्नती प्रक्रिया 'जैसे थे' स्थितीत आली असून शिक्षकांमध्ये तीव्र नाराजी आहे. भाजप शिक्षक आघाडीचे नाशिक विभागाध्यक्ष महेश मुळे यांनी या निर्णयावर कायदेशीर बोट ठेवले आहे. त्यांच्या मते केंद्र सरकारचा आरटीई अधिनियम २००९ आणि राज्य सरकारचा २०१० चा नियम, या दोन्हीमध्ये पदोन्नतीसाठी टीईटीची अट कुठेही नमूद केलेली नाही. १ सप्टेंबर २०२५ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयाबाबत राज्य सरकारने अद्याप स्पष्ट धोरण ठरवलेले नाही. अशा स्थितीत केवळ पत्राच्या आधारे सेवाशर्ती बदलणे बेकायदेशीर आहे.

### शिक्षकांचे मनोबल खच्चीकरण

पदोन्नती प्रक्रिया थांबल्यामुळे हजारो पात्र शिक्षकांमध्ये नैराश्याचे वातावरण आहे. प्रशासनाच्या या मनमानी कारभारामुळे शिक्षणाच्या गुणवत्तेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जर हा निर्णय मागे घेऊन पदोन्नती पूर्ववत सुरू न केल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा संघटनेने दिला आहे.

# टीईटीचा अडसर घालून शिक्षकांच्या पदोन्नती रोखल्या ; शिक्षण विभागाचा निर्णय कायद्याला हरताळ..?

धुळे – राज्यातील हजारो शिक्षकांच्या पदोन्नती प्रक्रिया टीईटी (शिक्षक पात्रता परीक्षा) या वादग्रस्त अटीमुळे थांबविण्यात आल्याने शालेय शिक्षण विभागाच्या कार्यपद्धतीवर तीव्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. हा निर्णय थेट बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार अधिनियम (आरटीई) २००९ च्या विरोधात असल्याचा गंभीर आरोप भाजप शिक्षक आघाडीने केला असून, या मनमानी निर्णयाविरोधात संघटनेच्या वतीने राज्याचे राज्यमंत्री (शालेय शिक्षण) पंकज भोयर यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. शालेय शिक्षण विभागाच्या अवर सचिवांनी १९ जानेवारी २०२५ रोजी काढलेल्या एका पत्राच्या आधारे पदवीधर शिक्षक, उच्च प्राथमिक शिक्षक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी तसेच प्राथमिक व उच्च प्राथमिक शाळांच्या मुख्याध्यापक पदांवरील पदोन्नतीसाठी टीईटी अनिवार्य करण्यात आली आहे. या एका प्रशासकीय पत्रामुळे सुरू असलेल्या पदोन्नती प्रक्रिया थेट गोठविण्यात आल्याने राज्यभरातील शिक्षकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.

भाजप शिक्षक आघाडीचे नाशिक विभागाध्यक्ष महेश मुळे यांनी या निर्णयावर कडाडून टीका केली. केंद्र सरकारचा आरटीई अधिनियम २००९ आणि महाराष्ट्र शासनाचा आरटीई अंमलबजावणी अधिनियम २०१० या दोन्ही कायद्यांमध्ये पदोन्नतीसाठी टीईटीची कोणतीही तरतूद नाही. असे असताना केवळ एका अवर सचिवाच्या पत्रावरून शिक्षकांच्या सेवाशर्ती बदलणे हा कायद्याचा आणि संविधानिक मूल्यांचा थेट अपमान आहे, असा आरोप त्यांनी केला. विशेष म्हणजे, सर्वोच्च न्यायालयाने १ सप्टेंबर २०२५ रोजी दिलेल्या निर्णयाच्या अंमलबजावणीबाबत राज्य सरकारने अद्याप कोणतेही स्पष्ट धोरण जाहिर केलेले नसताना, अधिकाराच्या मर्यादा ओलांडून हे पत्र निर्गमित करण्यात आल्याचा आरोपही करण्यात आला आहे. संसदेकडून मंजूर कायद्याच्या विरोधात जाऊन प्रशासकीय आदेश काढणे ही गंभीर बाब असून, यामुळे शासनाची जबाबदारी आणि कायदेशीर वैधता संशयाच्या भोवऱ्यात सापडली आहे.

या निर्णयामुळे राज्यातील हजारो पात्र शिक्षकांच्या पदोन्नती रखडल्या असून, शिक्षकांमध्ये असंतोष, संभ्रम आणि तीव्र नैराश्याचे वातावरण निर्माण झाले आहे. शिक्षण विभागाच्या अशा मनमानी कारभारामुळे शिक्षकांचे मनोबल खच्ची होत असून, याचा थेट परिणाम शिक्षणाच्या गुणवत्तेवर होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे.

शासनाने हा निर्णय तात्काळ मागे घेऊन पदोन्नती प्रक्रिया पूर्ववत सुरू करावी, अन्यथा राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा भाजप शिक्षक आघाडीने दिला आहे.

देशोन्नती

# रेल्वे मार्ग बाधीत शेतकऱ्यांचे प्रांताधिकाऱ्यांना निवेदन

देशोन्नती वृत्तसंकलन

**धुळे :** मनमाड-इंदौर रेल्वे मार्गावर बाळापू ते पुरमेपाडा परिसरातील रेल्वेमार्ग बाधीत शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने प्रांताधिकारी रोहण कुवर यांना विविध मागण्याचे निवेदन देण्यात आले.

शेतकऱ्यांच्या सर्व मागणी पूर्ण होत नाही शेतकऱ्यांना विश्वासात घेतले जात नाही तोपर्यंत शासनाच्या कुठल्या च कर्मचाऱ्याला प्रतिनिधीला तसेच भूसंपादन प्रक्रियेला शेतकरी सहकार्य करणार नाही तसेच कुठलाही प्रकारे संयुक्त मोजणी करण्यासाठी शासनाच्या कुठल्याच कर्मचाऱ्यास शेतात येऊ देणार नाही.



शेतकऱ्यांना विश्वासात न घेता संयुक्त मोजणी करण्याचा प्रयत्न केला व कायदा कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास याला सर्वस्वी जिल्हा प्रशासन व भूसंपादन विभाग जबाबदारी राहील. यावेळी मनमाड-इंदोर( बाळापुर ते पुरमेपाडा) रेल्वेमार्गबाधित शेतकरी संघर्ष समितीचे जयेश चौधरी, डॉक्टर प्रशांत साळुंखे, डॉक्टर योगेश गवळी, सुधाकर पाटील, भुषण पाटील, विशाल तिवारी, अनिलबारस्कर, महेश बडगुजर, विक्रम साळवे, युनूस खाटीक, भावेश दहीहंडे, सुधीर बडगुजर, विठोबा शिंगाडे, अमृत सोनवणे, बाबुलाल चौधरी, अनिल पाटील, विनायक पाटील, जिभाऊ शेंनगे, अशोक वायसे, बाबूलाल चौधरी, कृष्णा शिंदे, बापू नारायण राठोड, प्रभाकर जाधव, आनंद छाजेड, महेश कुमार छाजेड, दिलीप साळवे, जयवंत पाटील, तुषार देवरे, मच्छिंद्र पाटील, भीमराव जाधव, नवल छाजेड व व अन्य शेतकरी उपस्थित होते.

**शेतकऱ्यांचा भूसंपादनासाठी विरोध का?**

शेतकऱ्यांना मिळणारा प्रस्तावित मोबदला हा सध्याच्या बाजारभावाच्या तुलनेत अत्यंत अपुरा आहे. शासनाचा कुठलाच कायदा शेतकऱ्याच्या शेतजमिनीचे योग्य मुल्यांकन करू शकत नाही. , जमीन अधिग्रहणामुळे शेतकऱ्यांची शेती, उत्पन्नाचे साधन व कुटुंबाचा उदरनिर्वाह धोक्यात येणार आहे, बागायती/सिंचन सुविधा असलेल्या सुपीक जमिनीचा नाश होणार आहे.

जिल्हा जळगाव

लोकमत

# ४५५ गावांत हाहाकार; २७ हजार शेतकऱ्यांच्या डोळ्यांत पाणी

## काळजावर 'गार' पडली, ३५ मिनिटांचा तांडव आणि पीक झाल आडवं

लोकमत न्यूज नेटवर्क

**जळगाव :** जिल्ह्यात २७ जानेवारी रोजी झालेल्या भीषण अवकाळी पाऊस आणि वादळी गारपिटीने रब्बी हंगामाला मोठा तडाखा दिला आहे. निसर्गाच्या या प्रकोपाने जिल्ह्यातील १० तालुक्यांमधील २१ हजार ८०९ हेक्टर क्षेत्रावरील पिकांचे अतोनात नुकसान झाले असून, सुमारे २७ हजार ६३१ शेतकरी संकटात सापडले आहेत. पिके ऐन जोमात असताना अचानक आलेल्या अवघ्या ३५ मिनिटांच्या वादळाने शेतकऱ्यांच्या दोन महिन्यांच्या मेहनतीवर पाणी फेरले आहे.

या नैसर्गिक आपत्तीमध्ये रब्बीतील प्रमुख पिकांचे नुकसान झाले आहे. यामध्ये सर्वाधिक ८ हजार हेक्टर क्षेत्रावरील मका पिकाचे नुकसान झाले आहे.

त्यासोबतच हरभरा, गहू, केळी, कांदा, बाजरी आणि ज्वारी ही पिकेही आडवी झाली आहेत. ४५५ गावांमधील शेतकरी सध्या मदतीच्या प्रतीक्षेत आहेत. जिल्ह्यात झालेल्या नुकसानीचा विचार करता, एरंडोल तालुक्यात सर्वाधिक ५ हजार ३९८ हेक्टर क्षेत्रावरील पिकांची नासाडी झाली आहे.

वादळाचा वेग इतका प्रचंड होता की, उभी पिके जमिनीला टेकली असून गारपिटीमुळे फळबागांनाही मोठी इजा झाली आहे. नुकसानीची तीव्रता पाहून कृषी विभागाकडून जिल्हाभरात बाधित क्षेत्राचे पंचनामे करण्याचे काम प्रशासनाकडून सुरू करण्यात आले आहे.

### तालुकानिहाय झालेले नुकसान

| तालुका | बाधित गावं | बाधित शेतकरी | झालेले नुकसान (हेक्टरमध्ये) |
|---|---|---|---|
| जळगाव | २१ | ९८९ | ८३७ |
| भुसावळ | ४२ | १,३९० | ७३५ |
| यावल | २९ | ७४६ | ५९१ |
| रावेर | ५७ | १ ,७३७ | १,६७७ |
| मुक्ताईनगर | ५४ | ६,२४३ | ४,६५८ |
| चोपडा | ५७ | ३,३५९ | ३,७२८ |
| एरंडोल | ६५ | ६,०२६ | ५,३९८ |
| धरणगाव | ५४ | २,१०० | १,२०७ |
| पारोळा | ६७ | ४,९५९ | २,९४५ |
| चाळीसगाव | ०९ | ८२ | ३१ |

### पिकांचे झालेले नुकसान (हेक्टरमध्ये)




Hello Bhusaval
Page No. 1 Jan 29, 2026
Powered by: erelego.com

लोकमत

# न्यायासाठी तीन दिवस गाव बंद

## ग्रामस्थांची एकजूट, आज विशेष ग्रामसभा

लोकमत न्यूज नेटवर्क

**भुसावळ :** भुसावळ तालुक्यातील एका गावात मंगळवारी घडलेल्या अत्यंत दुर्दैवी आणि मन हेलावून टाकणाऱ्या घटनेमुळे जणू काळोख पसरला आहे. दोन अल्पवयीन मुलींच्या अकाली मृत्यूने संपूर्ण गाव हादरून गेले आहे. दरम्यान, गावाची दुःखाची जाणीव प्रशासनापर्यंत पोहोचवण्यासाठी संपूर्ण गाव तीन दिवस कडकडीत बंद ठेवण्याचा निर्णय घेतला आहे.

गावातील प्रत्येक घरात शोककळा पसरली आहे. या निष्पाप जिवांच्या आठवणींना उजाळा देत आणि या अमानवी घटनेचा तीव्र निषेध नोंदवण्यासाठी ग्रामस्थांनी एक भावनिक निर्णय घेतला आहे. यात गुरुवारी विशेष ग्रामसभा घेण्याचा निर्णय घेण्यात आला.

## ग्रामस्थांची दक्षता समिती

भविष्यात अशा दुर्दैवी घटना पुन्हा घडू नयेत, यासाठी ग्रामस्थांनी पुढाकार घेत 'दक्षता समिती' स्थापन करण्याचा निर्णय घेतला आहे. ही समिती गावातील सुरक्षिततेवर लक्ष ठेवणार असून, संशयास्पद हालचालींवर वेळीच पाऊल उचलण्यासाठी सज्ज राहणार आहे. मुलींच्या सुरक्षेसाठी सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला. यासाठी बुधवारी ग्रामपंचायत कार्यालयात सरपंच, पोलिस पाटील, ग्रामपंचायत सदस्य, सामाजिक कार्यकर्ते व ग्रामस्थांची महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत दि.२९ रोजी विशेष ग्रामसभेचे आयोजन करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच, मृत मुलींना श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी संपूर्ण गाव तीन दिवस बंद ठेवण्याचा ठराव मंजूर करण्यात आला.

दि. २७ जानेवारी रोजी सकाळी या दोन्ही मुलींची हत्या झाली होती.

## अंगणवाडी, शाळा आणि ग्रामपंचायत कार्यालयही तीन दिवस बंद

या निर्णयानुसार गावातील सर्व शाळा, अंगणवाड्या, ग्रामपंचायत कार्यालय तसेच इतर शासकीय कार्यालये तीन दिवस बंद राहणार आहेत. कोणताही उत्सव, कार्यक्रम किंवा आनंदोत्सव न साजरा करता गाव या काळात शोक पाळणार आहे. 'ही केवळ बंदची घोषणा नाही, तर दोन मुलींवरील अन्यायाविरोधात उठलेला गावाचा आक्रोश आहे,' अशी भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली.

## आरोपींची रवानगी सुधारगृहात

भुसावळ तालुक्यातील अल्पवयीन मुलींच्या हत्या प्रकरणात पोलिसांनी दोन अल्पवयीन आरोपींना ताब्यात घेतले. या दोघा अल्पवयीन संशयितांना जळगाव येथील विधीसंघर्ष बाल न्यायालयात हजर करण्यात आले. त्यानंतर त्यांची रवानगी सुधारगृहात करण्यात आली आहे. याप्रकरणी पुढील तपास पोलीस उपाधीक्षक केदार बारबोले करीत आहेत.

लोकमत

# रावेर तालुक्यात ५७ गावांत १७३७ शेतकऱ्यांचे नुकसान

## वादळी वाऱ्यांसह गारपीट आणि अवकाळीचे थैमान,१२८ घरांची झाली पडझड

किरण चौधरी
लोकमत न्यूज नेटवर्क

**रावेर :** तालुक्याच्या उत्तरेकडील सातपुडा पर्वतरांगालगतच्या अतिदुर्गम भागासह पायथ्यावरील व पूर्व भागातील ५७ गावांमध्ये मंगळवारी (दि. २७) सायंकाळी वादळी वाऱ्यासह झालेल्या अवकाळी पाऊस व गारपीटीने थैमान घातले. ऐन कापणीवर असलेल्या केळीबागा, मका, गहु आणि हरभऱ्याचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. या नैसर्गिक आपत्तीत १,७३७ शेतकऱ्यांच्या १,६७७ हेक्टर क्षेत्रातील पिके जमीनदोस्त झाली असून ८० कोटी ४६ लाख रुपयांच्या नुकसानीचा प्राथमिक अंदाज प्रशासनाने व्यक्त केला आहे. त्यासोबतच तालुक्यात १२८ घरांची पडझड झाली आहे.

मंगळवारी दिवसभर ढगाळ वातावरण होते. सायंकाळी सुमारे सहाच्या सुमारास सातपुड्याकडून वेगवान वादळी वारे सुटले. धुळीचे लोळ उठवत वारे तालुक्याच्या दक्षिण भागाकडे झेपावले. यामुळे शेतीशिवारातील केळीबागा आडव्या पडल्या.

गारपिटीच्या तडाख्यात केळीच्या पानांच्या चिंधड्या उडाल्या, खोडांवर व घडांवर खोल जखमा झाल्या. अवघ्या दोन-तीन महिन्यांत अपेक्षित असलेले उत्पन्न निसर्गाने हिरावून घेतले.



रावेर तालुक्यातील जुनोने शिवारातील कापणीवरील केळीबागा जमीनदोस्त झाल्याचे भीषण नुकसान झाले आहे.

### मका आणि गव्हाचे नुकसान

रब्बी हंगामातील मक्याचे व गव्हाचे पीक पूर्णतः जमीनदोस्त झाले. हरभरा पिकाचा फुलोरा झडून घाटे तुटल्याने मोठे नुकसान झाले. बुधवारी पहाटे शेतात झालेल्या भीषण हानीचे दृश्य पाहून शेतकऱ्यांच्या डोळ्यांत अश्रू होते. तालुका कृषी अधिकारी भाऊसाहेब वाळके यांनी जिन्सी, पिंप्री, मोरव्हाल, पाल, निमड्या, गारखेडा, लालमाती, कुसुंबा, आभोडा बु. व खुर्द, मोहगण, केऱ्हाळे बु. व खुर्द, अहिरवाडी तसेच पाडळे, निरूळ, खानापूर, मुंजलवाडी, खिरोदा प्र. रावेर, रसलपूर, रावेर आदी गावांतील नुकसानग्रस्त भागाची पाहणी केली.

### ५०८ हेक्टरवरील केळी जमीनदोस्त

प्राथमिक पाहणीनुसार ५०८.५० हेक्टरवरील केळी पिकांचे ५८ कोटी ७२ लाख २ हजार रुपये, ५३८.३५ हेक्टरवरील मक्याचे ८ कोटी ७ लाख ५२ हजार ५०० रुपये, ४३९ हेक्टरवरील गव्हाचे ४ कोटी ३८ लाख ४० हजार रुपये आणि १९२ हेक्टरवरील हरभऱ्याचे २ कोटी ८७ लाख ९२ हजार ५०० रुपयांचे नुकसान झाले आहे.

दरम्यान, जिन्सी व निमड्या येथील ७७ तसेच अन्य १० गावांतील १५१ घरांची छपरे उडून व भिंती कोसळून ६.५० लाख रुपयांचे नुकसान झाले. एकूण नुकसानीचा आकडा ८० कोटी ४६ लाखांवर पोहोचल्याची माहिती तहसीलदार संजय तायडे व तालुका कृषी अधिकारी भाऊसाहेब वाळके यांनी दिली.

तरुण भारत
29 Jan 2026 - Page 8
epaper.tarunbharatlive.com

# रावेर तालुक्यात पावसासह वादळाचा तडाखा; १६७७ हेक्टरवरील पिकांचे नुकसान

**रावेर, २८ जानेवारी**

तालुक्यात काल मंगळवार सायंकाळी झालेल्या वादळी पावसामुळे व गारपिटीमुळे १७३७ शेतकऱ्यांच्या १६७७ हेक्टर क्षेत्रातील केळी गहू मका व हरभरा पिकांचे नुकसान तर ११ गावातील घरांची पडझड होऊन १२८ घरांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अहवाल तयार करण्यात आलेला आहे . आमदार अमोल जावळे यांचे नुकसानग्रस्त भागात तत्काळ पंचनाम्याचे आदेश दिले आहेत.

याबाबतचे वृत्त असे की काल सायंकाळी पाच ते साडेसहाच्या सुमारास रावेर तालुक्यात सर्वत्र वादळी पावसाचा तडाखा व गारपीट झाली . यामुळे तालुक्यातील ५७ गावांना याचा तडाखा बसला . यामुळे केळी, गहू, हरभरा व मका पिकांचे मोठे नुकसान झाले.



यात जिन्सी, पिंप्री, मंगरूळ, अभोडा खुर्द, अभोडा बु., लालमाती, केन्हाळे बु.,केन्हाळे खूर्द या गाव शिवारातील पिकांचे मोठे नुकसान झाले

पिके शेतकरी संख्या बाधित क्षेत्र व एकूण शेतकरी व बाधित क्षेत्र असे .एकुण गावे ५७, गहू ४४२ शेतकरी, नुकसान क्षेत्र ४३८.४,मका ५५३ शेतकरी,५३८.३५ हे . क्षेत्र, केळी ५४२ शेतकरी ५०८.४ नुकसान क्षेत्र, हरभरा २०० शेतकरी,१९१.९५ हेक्टर क्षेत्र एकुण नुकसान ५७ गावशिवारातील १७३७ शेतकऱ्यांच्या १६७७ हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज महसूल व कृषी विभागाने तयार करून तो वरिष्ठांना पाठवण्यात आला आहे . शासनाने त्वरित वस्तुनिष्ठ पंचनामे सादर करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळवून द्यावी अशी मागणी केली आहे.

### आमदार जावळे यांनी दिले पंचनाम्याचे आदेश

या घटनेची गंभीर दखल घेत आमदार अमोल जावळे यांनी प्रशासनाला तात्काळ नुकसानग्रस्त भागात पंचनामे करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. शेतकऱ्यांच्या नुकसानीची त्वरित पाहणी करून शासनाकडून योग्य ती मदत मिळावी, यासाठी त्यांनी संबंधित यंत्रणांना सतर्क केले आहे.

तरुण भारत
29 Jan 2026 - Page 2
epaper.tarunbharatlive.com

# आपण दोघे भाऊ, वाळूतून तेल गाळू!

## उत्राण अहिर, उत्राण गुजर येथील दोन तलाठ्यांचा 'प्रताप; ट्रॅक्टरवर कारवाई टाळण्यासाठी तीस हजारांच्या लाचेसह एक लाख ७३ हजारांची रक्कम जप्त

**तभा वृत्तसेवा**

**जळगाव, २८ जानेवारी**

एरंडोल तालुक्यातील उत्राण अहिर येथे गिरणा नदी पात्रात अवैध वाळुचे ट्रॅक्टर पकडले असता त्यावर कारवाई करू नये यासाठी सुरूवातीला २५ हजार रूपयांची लाचेची मागणी केली, परंतु, ट्रॅक्टर सोडल्यानंतर प्रत्यक्ष ३० रूपयांची मागणी करीत लाच घेतल्याप्रकरणी उत्राण अहिर येथे नियुक्त असलेल्या नरेश भास्कर शिरूड आणि शिवाजी एकनाथ घोलप या दोन तलाठ्यांना लाच लुचपत विभागाच्या अधिकाऱ्यांनी अटक केली. तसेच ग्रामपंचायत कार्यालयावरील खोलीत १ लाख ७३ हजार ३०० रुपये रोख, गिफ्ट रॅपरबंद २ हजार ९५० रुपये किंमतीची ७५० मि.ली व्हिस्की बॉटल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

एरंडोल तालुक्यात २७ जानेवारी रोजी उत्राण अहिर येथील तलाठी नरेश भास्कर शिरूड (वय ४१, रा. प्लॉट नं. १३, सर्व्हे नं. १७९, दत्तमंदिरासमोर, वाघनगर जळगाव) याने सकाळी उत्राण अहिर गिरणा नदी पात्रात तक्रारदाराचे अवैध वाळू वाहतूक करणारे ट्रॅक्टर पकडले होते. वाळुच्या ट्रॅक्टरवर कारवाई न करता सोडावे यासाठी तलाठी नरेश शिरूड, याने तक्रारदाराकडे २५ हजार रूपयांची मागणी करीत कारवाई न करता ट्रॅक्टर सोडले.



यासंदर्भात तक्रारदाराने लाचलुचपत विभागाकडे तक्रार दाखल केली होती. याची पडताळणी करीत लाचलुचपत विभागाच्या पथकाने सापळा लावला. यात तक्रारदाराकडे ठरल्याप्रमाणे २५ हजार रुपये घेणार नाही. इतरांकडून जास्त घेतो, तू गरीब म्हणून तुझ्याकडून ३० हजार रुपये घेतो, असे सांगत ३० हजार रुपयांची लाच मागणी केली.

### एक लाख ७३ हजारांची रक्कम जप्त

लाच पडताळणी कारवाईनंतर उत्राण अहिर ग्रामपंचायत कार्यालयाच्या एका खोलीत एरंडोल तालुक्यातीलच उत्राण गुजर येथील दुसरा तलाठी शिवाजी घोलप (रा.रू.नं. ०९, पार्थ इलाईट, हरीओम नगर, आटीलरी सेंटर रोड, नाशिक रोड, नाशिक, मुळ रा. पहुर पेठ, ता. जामनेर) याच्या समवेत उपस्थितीत ३० हजार रुपये लाचेची रक्कम स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आले.

दरम्यान खोलीत झडती दरम्यान उत्राण अहिर येथील तलाठी नरेश शिरूड याच्या ताब्यातील १ लाख ७३ हजार ३०० रुपये रोख, गिफ्ट रॅपर पॅक २ हजार ९५० रुपये किंमतीची ७५० मि.ली. व्हिस्की बॉटल व मोबाईल फोन आदी मुद्देमाल वस्तू जप्त करण्यात आल्या.

ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभाग नाशिक परिक्षेत्राचे पोलीस अधीक्षक भारत तांगडे, अपर पोलीस अधीक्षक माधव रेड्डी, सुनील बोरगे,यांच्या मार्गदर्शनानुसार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगावचे पोलीस उप अधीक्षक योगेश ठाकूर, पोलीस निरीक्षक स्मिता नवघरे, तपास अधिकारी हेमंत नागरे, पो. अंमलदार प्रदीप पोळ, अमोल सूर्यवंशी, सचिन वाटे यांनी केली.

नवराष्ट्र Jalgaon | 29 January 2026 | Page 3

# बांगलादेशी संशयावरून पोलिसांची मोठी कारवाई

## महालक्ष्मी इंटरप्राइजेसवर छापा; १०० कामगार ताब्यात

▶ नशिराबाद, (वा.) येथील पोलिस स्टेशन अंतर्गत कडगाव शिवारात असलेल्या महालक्ष्मी इंटरप्राइजेस या कंपनीत बांगलादेशी नागरिक काम करत असल्याच्या संशयावरून पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. गुप्त माहितीच्या आधारे नशिराबादच्या सहाय्यक पोलिस निरीक्षक योगिता नारखेडे यांच्या नेतृत्वाखाली मंगळवार, २७ जानेवारी रोजी पहाटे पाच वाजता या कंपनीवर छापा टाकण्यात आला.

या कारवाईदरम्यान कंपनीत कार्यरत असलेल्या सुमारे १०० कामगारांना ताब्यात घेण्यात आले आहे. ताब्यात घेतलेल्या सर्व कामगारांची ओळखपत्रे, कागदपत्रे तसेच आधार कार्डची बायोमेट्रिक तपासणी रात्री उशिरापर्यंत सुरू होती. नशिराबाद परिसरात झालेली ही आतापर्यंतची मोठी व महत्त्वाची चौकशी कारवाई मानली जात आहे. या प्रकरणाच्या गांभीर्याची दखल घेत जिल्ह्याचे पोलिस अधीक्षक महेश्वर रेड्डी, स्थानिक गुन्हे अन्वेषण विभागाचे पोलीस निरीक्षक तसेच अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नशिराबाद पोलीस स्टेशनला भेट देऊन चौकशीची माहिती घेतली.

### कामगारांची तपासणी

दरम्यान, नशिराबाद पोलीस स्टेशनचे अधिकारी व कर्मचारी रात्री उशिरापर्यंत ताब्यात घेतलेल्या कामगारांची सखोल कागदपत्र तपासणी करत होते. पोलिस सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, संपूर्ण व्हेरिफिकेशन पूर्ण झाल्यानंतरच अंतिम निष्कर्ष काढता येणार आहे, असे स्पष्ट करण्यात आले आहे. सध्या या प्रकरणाकडे संपूर्ण परिसराचे लक्ष लागले असून पुढील चौकशीनंतरच अधिक माहिती समोर येणार आहे.

साईमत

# ...अखेर गटारीच्या समस्येतून घेतला सुटकेचा श्वास

## गटार स्वच्छतेची विशेष मोहीम; अतिक्रमण हटवल्याने सांडपाणी निचरा सुरळीत

पारोळा । प्रतिनिधी ।

**पारोळा शहरातील मुख्य रथ गल्ली उर्फ लवण गल्ली येथील गटारींमधून गेल्या अनेक वर्षांपासून वाहणाऱ्या दूषित सांडपाण्यामुळे नागरिक हैराण झाले होते. गटारी तुंबल्याने सांडपाणी थेट रस्त्यावर वाहत असल्याने रहिवाशांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले होते. अखेर पालिका प्रशासनाने या गंभीर समस्येची दखल घेत गटारींची सखोल स्वच्छता करून तसेच त्यावर झालेले अतिक्रमण काढून टाकल्याने ही समस्या मोठ्या प्रमाणात आटोक्यात आली असून, नागरिकांनी दिलासा व्यक्त करत अखेर निसुटकेचा श्वास घेतला आहे.**

रथ गल्ली अथवा लवण गल्ली ही शहरातील मुख्य व वर्दळीची गल्ली म्हणून ओळखली जाते. मात्र येथील गटारींमध्ये वर्षानुवर्षे मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने त्या वारंवार तुंबत होत्या. परिणामी गटारीतील दूषित सांडपाणी रस्त्यावर साचत अथवा वाहत असे. यामुळे नागरिकांना गल्ली वापरणे जिकिरीचे झाले होते. दुर्गंधी, डासांचा प्रादुर्भाव आणि सांडपाण्यामुळे आरोग्याचे गंभीर प्रश्न निर्माण होत असल्याने रहिवासी त्रस्त झाले होते.

या गल्लीत जैन मंदिर तसेच शहराचे आराध्य दैवत श्री बालाजी मंदिर असल्याने येथे येणाऱ्या भाविकांनाही या समस्येला वारंवार सामोरे जावे लागत होते. विशेषतः पावसाळ्यात परिस्थिती अधिकच गंभीर होत असून नागरिकांसह शालेय विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक व महिलांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत असल्याची चर्चा होती.



या समस्येबाबत रहिवाशांनी वेळोवेळी पालिका प्रशासनाकडे निवेदने व तक्रारी दिल्या होत्या. मात्र केवळ तात्पुरत्या स्वरूपात गाळ काढून गटारी मोकळ्या केल्या जात असल्याने समस्या कायमस्वरूपी सुटत नव्हती. त्यामुळे नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण निर्माण झाले होते. गेल्या चार वर्षांच्या प्रशासकीय काळात परिस्थिती 'जैसे थे'च राहिल्याची भावना नागरिकांमध्ये होती.

मात्र आता नगरपरिषदेवर लोकनियुक्त नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर शहरात बदल घडताना दिसत आहे. पालिका प्रशासनाने गटार स्वच्छतेची विशेष मोहीम हाती घेत रथ गल्लीतील तुंबलेल्या गटारींचा तळापर्यंत साचलेला संपूर्ण गाळ काढण्यात आला. तसेच गटारींवर अतिक्रमण करून बांधलेले ओटे, पायऱ्या व ढापे काढून टाकण्यात आल्याने सांडपाण्याचा निचरा सुरळीत झाला आहे.

या कारवाईनंतर परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून, अनेकांनी समाधान व्यक्त केले आहे. मात्र भविष्यात पुन्हा अशी परिस्थिती उद्भवू नये यासाठी नियमित गटार स्वच्छता व देखभाल करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे. तसेच गटारींमध्ये कचरा, पिशव्या टाकू नयेत आणि कोणतेही अतिक्रमण करू नये, असे आवाहनही पालिका प्रशासनातर्फे करण्यात आले आहे.

दरम्यान, ही अनेक वर्षांपासूनची गंभीर समस्या नवनिर्वाचित नगराध्यक्ष चंद्रकांत पाटील, पालिका आरोग्य सभापती तथा नवनिर्वाचित नगरसेवक डॉ. मंगेश तांबे, नितीन सोनार व इतर नगरसेवकांच्या प्रयत्नातून मार्गी लागत असल्याचे चित्र आहे. शहरात नियमित साफसफाई व स्वच्छतेवर भर देण्यात येईल, नागरिकांचे सर्वांगीण हित जोपासले जाईल आणि यासाठी नागरिकांनीही प्रशासनास सहकार्य करावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले.

शिल्पकार विकासाचा...
देशदूत
जळगाव आवृत्ती
epaper.deshdoot.com
29 Jan 2026 - Page 5A

# फुलगाव ग्रामपंचायत प्रकरणात जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश रद्द

## अपर विभागीय आयुक्तांचा दिलासा; दोन ग्रामपंचायत सदस्य पुन्हा पात्र

**वरणगाव, ता.भुसावळ । वार्ताहर**

तालुक्यातील फुलगाव ग्रामपंचायतीतील सदस्य मनोज विश्वनाथ कोलते व कृष्णा सुकलाल वाघ यांच्याविरोधात जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिलेला अनर्हतेचा आदेश अपर विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांनी रद्द केला आहे. त्यामुळे संबंधित दोन्ही ग्रामपंचायत सदस्य पुढील आदेश होईपर्यंत पात्र ठरले आहेत.

या संदर्भात जिल्हाधिकारी, जळगाव यांच्याकडे ग्रामपंचायत विवाद अर्ज क्रमांक १५०/२०२५ दाखल करण्यात आला होता. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५९ चे कलम १४ (ह) अंतर्गत गटविकास अधिकारी, पंचायत समिती भुसावळ, ग्रामपंचायत अधिकारी फुलगाव व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगाव यांच्या वतीने हा दावा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात जिल्हाधिकारी यांनी दि. ३ सप्टेंबर २०२५ रोजी संबंधित दोन्ही सदस्यांना अनर्ह ठरविण्याचा आदेश दिला होता. या आदेशाविरोधात श्री.कोलते व श्री.वाघ यांनी अपर विभागीय आयुक्त, नाशिक विभाग यांच्याकडे ग्रामपंचायत अपील क्रमांक १४३/२०२५ दाखल केले होते. अपीलाची सुनावणी व लेखी युक्तिवादानंतर अपर विभागीय आयुक्तांनी दि.१४ जानेवारी २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निर्णय देत जिल्हाधिकारी, जळगाव यांनी दिलेला आदेश रद्द केला आहे. अपर विभागीय आयुक्तांच्या या आदेशामुळे फुलगाव ग्रामपंचायतीतील राजकीय व प्रशासकीय वर्तुळात चर्चा सुरू झाली असून, संबंधित दोन्ही सदस्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. या निर्णयाची नोंद संबंधित प्रशासनाने घ्यावी, अशी मागणी अर्जदारांनी केली आहे. या निर्णयामुळे ग्रामपंचायत फुलगाव येथील सत्तासंतुलनावर काय परिणाम होतो, याकडे स्थानिक नागरिकांचे लक्ष लागले आहे.

नवराष्ट्र Jalgaon | 29 January 2026 | Page 3

## दुरुस्त करा \ नशिराबाद-भादली रेल्वेस्थानक रस्त्याची दुरवस्था

# प्रवाशी 'मृत्यूच्या' सावटाखाली

▶ **नशिराबाद, (वा.)** नशिराबाद ते भादली रेल्वे स्थानकाला जोडणाऱ्या मुख्य रस्त्याची सध्या अत्यंत दुरवस्था झाली असून, या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे मृत्यूला निमंत्रण देण्यासारखे झाले आहे. तात्काळ या रस्त्याची दुरुस्तीची मागणी प्रवाशांसह शेतकऱ्यांनी केली आहे.

गेल्या अनेक महिन्यांपासून या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून, प्रवाशांसह शेतकऱ्यांना आपला जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. या समस्येकडे प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन रस्त्याची दुरुस्ती करावी, अशी आर्त हाक स्थानिक नागरिक आणि शेतकऱ्यांनी दिली आहे.

हा रस्ता शेतीकामासाठी महत्त्वाचा असल्याने दररोज शेकडो शेतकरी बैलगाड्या आणि मोटारसायकलने या मार्गावरून ये-जा करतात. रस्त्यावरील जीवघेण्या खड्ड्यांमुळे बैलगाड्यांचे आस तुटणे, चाके निखळणे अशा घटना नित्याच्या झाल्या आहेत. तसेच, दुचाकीस्वारांना पाठीचे आणि मणक्याचे आजार जडू लागले आहेत.



### प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष....

रस्त्याच्या दुरुस्तीसाठी स्थानिक ग्रामस्थांनी वारंवार निवेदने दिली, परंतु प्रशासनाकडून केवळ आश्वासने मिळत असल्याचा आरोप होत आहे. पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचत असल्याने खोलीचा अंदाज येत नाही, ज्यामुळे रात्रीच्या वेळी प्रवास करणे अशक्य झाले आहे.

### ३ किमीचा प्रवास, तासाभराचा त्रास...

- नशिराबादपासून भादली रेल्वे स्थानकाचे अंतर अवघे ३ किलोमीटर आहे.
- मात्र, या रस्त्यावर पडलेल्या खड्ड्यांमुळे हे अंतर पार करण्यासाठी वाहनधारकांना अर्ध्या ते एक तासाचा वेळ लागत आहे.
- रेल्वे पकडण्यासाठी जाणाऱ्या प्रवाशांची यामुळे मोठी ओढाताण होत असून, अनेकदा खड्ड्यांमुळे गाडी घसरून अपघात होण्याच्या घटना घडत आहेत.

"आम्हाला रोज शेतात जावे लागते तसेच रात्री पाणी सोडण्यासाठी जावे लागते, पण या रस्त्यामुळे आमची वाहने खराब होत आहेत. बैलगाडी खड्ड्यात अडकली की बैलांनाही इजा होते. प्रशासनाने आता तरी जागे व्हावे आणि हा रस्ता दुरुस्त करावा.

— एक स्थानिक शेतकरी

# जिल्हा नंदुरबार

लोकमत
जळगाव, गुरुवार, दि. २९ जानेवारी २०२६

# केवळ ज्येष्ठतेमुळे नाही मिळणार बढती; आता टीईटी परीक्षा सक्तीची

## जिल्ह्यात शिक्षकांची तयारी; शालेय शिक्षण विभागाचा मोठा निर्णय; पदोन्नतीत गुणवत्ता व पात्रतेला प्राधान्य

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** शिक्षक संवर्गातून पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, तसेच विस्तार अधिकारी (शिक्षण) या पदांवर पदोन्नती मिळविण्यासाठी आता शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) उत्तीर्ण असणे अनिवार्य करण्यात आले आहे.

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने यासंदर्भात शासन निर्णय (जीआर) जारी केल्याने केवळ ज्येष्ठतेच्या आधारे दिल्या जाणाऱ्या बढत्यांना थेट लगाम बसणार आहे. परिणामी वर्षानुवर्षे सेवा दिलेल्या, प्रमोशनच्या प्रतीक्षेत असलेल्या शिक्षकांमध्ये नाराजी पसरली आहे.

सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालानुसार, टीईटी परीक्षा केवळ नवीन भरतीसाठीच नव्हे, तर पदोन्नतीसाठी आणि सेवेत टिकून राहण्यासाठीही सक्तीची करण्यात आली आहे. पहिली ते आठवीपर्यंत अध्यापन करणारे सर्व शिक्षक, तसेच प्राथमिक व माध्यमिक शिक्षकांना पदोन्नती हवी असल्यास टीईटी अपरिहार्य ठरविण्यात आली आहे. यामुळे पदोन्नतीची स्वप्ने रंगविणाऱ्या शिक्षकांच्या स्वप्नांवर न्यायालयीन शिक्का बसला आहे. यामुळे पदोन्नतीसाठी प्रयत्नशील असलेल्या शिक्षकांना ही परीक्षा उत्तीर्ण करण्याची कसोटी पार करावी लागणार आहे.

### या पदांवर मिळते पदोन्नती

टीईटीची परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर पदवीधर शिक्षक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी (शिक्षण) आदी पदावर पदोन्नती मिळते.

### आता 'टीईटी'शिवाय पदोन्नती नाहीच

नवीन शासन निर्णयानुसार टीईटी उत्तीर्ण नसलेल्या शिक्षकांना पदोन्नती देता येणार नाही. त्यामुळे पदोन्नतीसाठी पात्रता व परीक्षा अनिवार्य झाली आहे.

### ज्येष्ठतेऐवजी गुणवत्ता व पात्रतेला प्राधान्य

आतापर्यंत ज्येष्ठतेच्या आधारे बढती मिळत होती; मात्र आता गुणवत्ता, अध्यापन कौशल्य आणि टीईटी पात्रतेला प्राधान्य दिले जाणार आहे.

**२ ते ३**

टक्क्यांवरच निकाल अडकत असल्याचे दिसून येत आहे. शिक्षकांवर अतिरिक्त कामाचा ताण असल्याने दमछाक होत आहे.



### शालेय शिक्षण व क्रीडा विभागाचा जीआर जारी

शालेय शिक्षण व क्रीडा विभागाने हा निर्णय अंमलात आणत स्पष्ट केले आहे की, गुणवत्ताधारित पदोन्नती हीच पुढील धोरणात्मक दिशा असेल.

### ज्येष्ठ शिक्षकांसमोर उत्तीर्ण होण्याचे मोठे आव्हान

दीर्घ सेवाकाळ असलेल्या अनेक शिक्षकांनी आजवर टीईटी दिलेली नाही. अशा शिक्षकांसाठी आता ही परीक्षा उत्तीर्ण होणे मोठे आव्हान ठरणार आहे. त्यामुळे आता जिल्ह्यातील या ज्येष्ठ शिक्षकांना टीईटी परीक्षा उत्तीर्ण होण्यासाठी मोठी कसरत करावी लागणार आहे. आतापासूनच काही शिक्षक तयारीला लागल्याचे दिसून येत आहे. परीक्षेची माहिती घेण्यासाठी अनेकांनी स्पर्धा परीक्षा केंद्रांनाही संपर्क केल्याची सांगण्यात येत आहे. यामुळे शिक्षकही अभ्यासाला लागणार आहे.

### टीईटी उत्तीर्ण होण्यासाठी दोन वर्षांची मुदत

टीईटी न उत्तीर्ण शिक्षकांना पदोन्नतीसाठी दोन वर्षांची मुदत देण्यात आली आहे. या कालावधीत परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे.

### जिल्ह्यातील बऱ्याच शिक्षकांवर गंडांतर

या निर्णयाचा जिल्ह्यातील बऱ्याच शिक्षकांवर परिणाम होणार असून, अनेकांची पदोन्नती थांबण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शिक्षक चिंतेत सापडले आहे.

### पाच वर्षे उरलेल्यांना दिलासा

सेवानिवृत्तीला पाच वर्षांपेक्षा कमी कालावधी उरलेल्या शिक्षकांना या निर्णयातून काही प्रमाणात दिलासा देण्यात आला आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेकडो शिक्षकांनी सुटकेचा निःश्वास सोडला आहे.

### तीन टक्केच लागला टीईटीचा निकाल

१. वर्ष २०२५ मध्ये घेतलेल्या टीईटी परीक्षेचा निकाल १६ जानेवारी २०२६ रोजी जाहीर झाला.

२. केवळ तीनच टक्के निकाल लागला. मागील काही वर्षांपासून टीईटीच्या निकालाची टक्केवारी वाढतच नसल्याचे चित्र आहे.

३. केवळ दोन ते तीन टक्क्यांवरच निकाल अडकत असल्याचे दिसून येत आहे. शिक्षकांवर अतिरिक्त कामाचा मोठा ताण राहत असल्याने टीईटीची तयारी, शैक्षणिक अभ्यासक्रम पूर्ण करताना मोठी दमछाक होत असल्याचे दिसून येत आहे.

४. जिल्ह्यातील शासकीय आश्रमशाळा अनुदानित शाळा, माध्यमिक शाळा, या ठिकाणी कार्यरत शिक्षक सध्या टीईटी बाबत सातत्याने माहिती घेत पुढील तयारीला लागले.

लोकमत

मस्ट READ

# 'दादांचे पालकत्व लाभावे, हे नंदुरबारकरांचे स्वप्न राहिले अधुरे!

## अजित पवार यांच्या आठवणींना उजाळा...

रमाकांत पाटील
लोकमत न्यूज नेटवर्क



**नंदुरबार :** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अकाली जाण्याने नंदुरबार जिल्ह्यातही शोककळा पसरली असून, त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विविध पैलूंच्या आठवणींनी दुःखाचे सावट पसरले आहे. विशेषत: नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्रिपद अजितदादा यांनी स्वीकारावे, अशी गळ जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी गेल्या काही दिवसांपासून त्यांना घातली होती. त्यावर त्यांनीही सकारात्मक प्रतिसाद दिला होता. मात्र, त्यांना जिल्ह्याचे पालकमंत्री म्हणून पाहण्याचे जिल्हावासियांचे स्वप्न अधुरेच राहिले आहे.

महाराष्ट्राच्या राजकारणात गेली तीन दशके अजित पवार यांचा दबदबा राहिला आहे. या काळात अनेकवेळा ते नंदुरबार जिल्ह्यात आले. कधी विकास प्रकल्पांचे भूमिपूजन, कधी अधिकाऱ्यांची बैठक, कधी निवडणूक प्रचार तर कधी पक्षाच्या कार्यकर्त्यांचा मेळावा अशा विविध कार्यक्रमांसाठी ते या भागात आले.

मात्र, प्रत्येकवेळी ते आपल्या व्यक्तिमत्त्वाची वेगळी छाप सोडून कार्यकर्ते व नागरिकांनाही मोहित करून जात असे. दैनंदिन व्यवहाराचा कामाबरोबरच येथील धान्य, शेती, माती, पर्यावरण, लोकसंस्कृती याबाबत बारकाईने लोकांमध्ये मिसळून जाणून घेत.

### पदाधिकारी व कार्यकर्त्यांची घातली होती गळ...

नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्रिपद हे महायुतीच्या सत्तेत राष्ट्रवादी (अजित पवार)कडे आहे. माजी पालकमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या मंत्रिपदाच्या राजीनाम्यानंतर हे पद रिक्त आहे. त्यामुळे जिल्ह्याचे पालकमंत्रिपद स्वत: अजितदादा यांनी आपल्याकडे घ्यावे, अशी कार्यकर्त्यांची मागणी होती. राष्ट्रवादी (अजित पवार)चे जिल्हाध्यक्ष डॉ. अभिजित मोरे यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी त्यासाठी त्यांना गळही घातला होता. त्यामुळे किमान वर्षभर अजितदादा यांच्याकडे नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्रिपद राहील, असे संकेत होते.

### जिल्हा विकासासंदर्भात बैठक घेणार होते...

निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे घडामोडी थांबल्या होत्या. आचारसंहिता संपताच अजितदादा नंदुरबार जिल्ह्याचे पालकमंत्रिपद स्वीकारतील, अशी कार्यकर्त्यांना अपेक्षा लागून होती. त्यामुळे विकासाचे विविध स्वप्नही कार्यकर्त्यांनी रंगविले होते. आचारसंहिता संपताच जिल्ह्याच्या विकासासंदर्भात बैठक घेण्याचे त्यांनी मान्य केले होते. मात्र, दादांच्या अकाली जाण्याने नंदुरबारकरांचे हे स्वप्न अधुरेच राहिले...

### तांदूळ आवडल्याने जाणून घेतली होती माहिती...

नंदुरबार येथील शासकीय विश्रामगृहावर जेवण करीत असताना त्यांना भाताची चव आवडली. त्यांनी तत्काळ खानसामाला बोलावून तांदूळ संदर्भातील माहिती व बनविण्याची पद्धतही जाणून घेतली.

हा तांदूळ कुठे पिकतो, त्याचे वाण कसे, यासंदर्भातील सर्व माहिती त्यांनी कार्यकर्त्यांकडूनही जाणून घेतली होती. एवढेच नव्हे तर तो तांदूळ स्वत: मागवून त्यांनी सोबतही नेला होता.

### स्ट्रॉबेरीची चव चाखत केली होती स्तूती...

जिल्ह्याच्या विकासाच्या एका बैठकीत सातपुड्यातील स्ट्रॉबेरीची चव चाखून पाहिली. नव्हे तर बैठकीतच या स्ट्रॉबेरीचे कौतुक करून आमच्या महाबळेश्वर पेक्षा सातपुड्यातील स्ट्रॉबेरीची चव अधिक चांगली असल्याचे सांगून तेथेच प्रशासनाला स्ट्रॉबेरी उत्पादनाला प्रोत्साहन देण्याची सूचना केली होती.

एका पक्षाच्या पदाधिकाऱ्याच्या घरी गेल्यावर सर्व कार्यकर्त्यांसमोर त्या पदाधिकाऱ्याला 'बंगला मोठा बांधला; पण झाडे नाही लावले हा बंगला काही कामाचा नाही. आमच्याकडे आधी घराचे बांधकाम सुरू करण्यापूर्वी झाडे लावतो नंतर बांधकाम सुरू करतो.' असा उपदेश करीत पर्यावरणाच्या जागृती संदर्भात संदेश दिला.



लोकमत

# जिल्ह्यातील पहिले मेनॉपॉज क्लिनिक सुरू

## धानोरा ग्रामीण रुग्णालयात प्रारंभ, महिलांना उपचार

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार :** राज्य शासनाच्या संकल्पनेतून नंदुरबार जिल्ह्यातील धानोरा ग्रामीण रुग्णालयात महिलांसाठी जिल्ह्यातील पहिले मेनॉपॉज (रजोवृत्ती) क्लिनिकचा शुभारंभ करण्यात आला आहे. याठिकाणी ४५ वर्षांवरील महिलांवर उपचार आणि समुपदेशन करण्यात येणार आहे.

राज्याच्या आरोग्य राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या संकल्पनेतून देशातील पहिले 'मेनोपॉज क्लिनिक' महाराष्ट्र राज्यात सुरू करण्यात आले आहे. याअंतर्गत नंदुरबार जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विनय सोनवणे, अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नरेश पाडवी यांच्या मार्गदर्शनात नंदुरबार जिल्ह्यातील पहिले क्लिनिक धानोरा ग्रामीण रुग्णालयात सुरू करण्यात आले आहे. वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रीती पटले यांच्या नेतृत्वात याठिकाणी महिलांना मार्गदर्शन करण्यात येत आहे.



धानोरा येथील ग्रामीण रुग्णालयात मेनोपॉज क्लिनिकच्या शुभारंभप्रसंगी परिसरातील महिला. सोबत डॉ. प्रीती पटले, शुभांगी बाविस्कर, डॉ. अल्पेशा वळवी.

### दर बुधवारी महिलांवर उपचार व समुपदेशन

या क्लिनिकच्या माध्यमातून रजोनिवृत्ती काळातील महिलांना भेडसावणाऱ्या विविध शारीरिक व मानसिक समस्यांवर समुपदेशन, तपासणी, उपचार व मार्गदर्शन दर बुधवारी करण्यात येणार आहे. महिलांच्या आरोग्य संवर्धनासाठी हा एक महत्त्वपूर्ण उपक्रम ठरणार आहे. या क्लिनिकमध्ये बुधवारी (दि. २८) रोजी अधिपरिचारिका शुभांगी बाविस्कर यांच्या संकल्पनेतून ४५ वर्षांवरील महिलांना कॅल्शियम व विटामिन डीचा गोळ्या देण्यात आल्या. यशस्वीतेसाठी डॉ. अल्पेशा वळवी, दीपक वाघ, मधुसूदन वाघमारे, शरद वळवी, सुभाष मावची, गणेश पवार यांनी परिश्रम घेतले. या क्लिनिकचा नंदुरबार तालुक्यातील महिलांनी लाभ घेण्याचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. प्रीती पटले यांनी कळविले आहे.

लोकमत

# अवकाळीच्या शिडकाव्यानंतर आता जिल्ह्यात थंडीची लाट

लोकमत न्यूज नेटवर्क

**नंदुरबार** : अवकाळी पावसाच्या शिडकाव्यानंतर आता जिल्ह्यात थंडीची लाट आली आहे. बुधवारी पहाटे किमान तापमान ११ अंश नोंदले गेले आहे. यंदाच्या हिवाळ्यातील ही दुसऱ्यांदा आलेली थंडीची लाट आहे. तोरणमाळ आणि डाब हे सातपुड्यातील उंचावरील ठिकाणांवर किमान तापमान आणखी कमी असल्याचे सांगण्यात आले.

**११** अंशापर्यंत किमान तापमान बुधवारी नोंदले गेले.

जिल्ह्यात गेल्या काही दिवसांपासून थंडीचे प्रमाण कमी झाले होते. वातावरणातील आद्रता वाढल्याने दुपारी काही प्रमाणात उकाडा व रात्री थंडी असे वातावरण राहत होते; मात्र २६ जानेवारी रोजी वातावरणातील बदलानंतर मंगळवारी जिल्ह्यातील काही भागात तुरळक पावसाच्या सरी कोसळल्या होत्या. शहादा, धडगाव भागात मध्यम ते हलक्या स्वरूपात पावसाच्या सरी कोसळल्या; परंतु जिल्ह्यालगत असलेल्या शिरपूर तालुक्यात पावसाचा जोर अधिक होता. त्यामुळे आता वातावरणात गारवा निर्माण होऊन थंडीची लाट देखील आली आहे.

बुधवारी पहाटे किमान तापमान हे ११ अंशापर्यंत घसरले होते. शिवाय बुधवारी दिवसभर गारठा देखील कायम होता, त्यामुळे दिवसाचे कमाल तापमान हे २९ अंशापर्यंत राहिले.

थंडीची लाट आणखी काही दिवस राहणार असली तरी पावसाचीही शक्यता काही दिवस असल्याचे कृषी हवामान केंद्रातर्फे सांगण्यात आले.

सातपुड्यात सध्या गावरान आंब्याला चांगला मोहर आला आहे. अवकाळी पावसामुळे या मोहराचे देखील नुकसान होऊ शकते. असे बोलले जात आहे.

लोकमत

# दुपारनंतर कार्यालये व शाळांमध्ये शुकशुकाट

## शासकीय दुखवटा, तिरंगा उतरविला अर्ध्यावर

लोकमत न्यूज नेटवर्क



**नंदुरबार :** सकाळी गजबजलेल्या शाळा, शासकीय कार्यालयांमध्ये मात्र दुपारी १२ वाजेनंतर शुकशुकाट दिसून आला. उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अपघाती निधन झाल्याने राज्य शासनाने शासकीय सुटी जाहीर केल्याने दुपारी १२ वाजेनंतर शाळा सोडून देण्यात आल्या होत्या.

दरम्यान, तीन दिवसांचा शासकीय दुखवटा जाहीर केल्याने शासकीय कार्यालयावरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात आला आहे.

बुधवारी सकाळच्या आणि दुपारच्या सत्रातील शाळा नियमितपणे भरल्या. शाळा परिसरात किलबिलाट देखील सुरू झाला. परंतु दुपारी १२ वाजता राज्य शासनाने दुखवटा म्हणून शासकीय सुटी जाहीर केली. सर्व शाळा मुख्याध्यापकांना व्हॉट्सॲपवर काहींना फोन करून शाळा लागलीच सोडून देण्यास सांगण्यात आले. त्यामुळे दुपारी एक ते दीड वाजेनंतर सर्व शाळा सोडून देण्यात आल्या. त्यामुळे शाळा परिसरात शुकशुकाट दिसून आला.

**१२**
वाजता दुपारी शासकीय आदेश प्राप्त झाला होता.

अशीच स्थिती शासकीय कार्यालयांमध्ये देखील दिसून आली. सकाळी साडेनऊ वाजता नेहमीप्रमाणे कार्यालये सुरू झाली. त्यानंतर काही वेळातच उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाची वार्ता येऊन धडकली. शासकीय पातळीवर दुखवटा जाहीर करण्यात आला आणि शासकीय सुटी देखील जाहीर करण्यात आली. सर्व कार्यालय प्रमुखांना याबाबत कळविण्यात आल्यानंतर कार्यालये बंद झाली. गेल्या अनेक वर्षांनंतर कार्यालये सुरू होऊन दोन ते तीन तासात बंद होण्याची ही पहिलीच वेळ ठरली.

दुखवटा असल्याने सर्वच शासकीय कार्यालयांवरील राष्ट्रध्वज अर्ध्यावर उतरविण्यात आला. तीन दिवस आता कुठलाही शासकीय कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम होणार नाहीत.



नंदुरबारनजीक भोणे शिवारातील वीट भट्टींची पाहणी करून तेथील भट्टी चालकांशी चर्चा करतांना सहायक जिल्हाधिकारी अंजली शर्मा.

सकाळ

# तीनशेवर ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक?

## धुळे, नंदुरबार जिल्ह्यातील निवडणुका लांबणीवरचा परिणाम

■ सकाळ वृत्तसेवा

**धुळे, ता. २८: राज्यातील एकूण १४ हजार २४० ग्रामपंचायतींचा कार्यकाळ फेब्रुवारीपासून संपत आहे. मात्र, निवडणुकीसाठी आवश्यक पूर्वतयारी पूर्ण न झाल्यामुळे या सर्व ठिकाणी निवडणुका पुढे ढकलल्या जाऊ शकतात. त्या पार्श्वभूमीवर ग्रामविकास विभागाचे अपर सचिव म. आसोले यांनी २३ जानेवारीला आदेश काढले. त्यानुसार, धुळे व नंदुरबार जिल्ह्यांतील सुमारे तीनशे ग्रामपंचायतींमध्ये प्रशासक नियुक्तीची प्रक्रिया सुरू होणार आहे.**

### सरपंचांकडून मागण्या

विद्यमान सरपंचांकडून प्रशासक म्हणून त्याच्याच नियुक्तीची मागणी करण्यात येत असली तरी, या वेळी प्रशासक पदावर पंचायत समितीचे विस्तार अधिकारी कार्यभार सांभाळणार आहेत. या निर्णयामुळे सरपंच संघटना काही प्रमाणात असंतुष्ट आहे.




### पूर्वतयारी नाही

कार्यकाळ संपणाऱ्या ग्रामपंचायतींत प्रभागरचना, आरक्षण आणि मतदार यादी अद्याप तयार नाही. या प्रक्रियेला किमान तीन ते चार महिन्यांचा कालावधी आवश्यक असतो. त्यामुळे निवडणुका किमान सहा महिन्यांनी लांबणीवर पडण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

### प्रशासकांची शक्यता

अधिकाऱ्यांच्या आदेशानुसार धुळे जिल्ह्यात २१८, नंदुरबार ८७, जळगाव ७८३, नाशिक ६२१ व अहिल्यानगर जिल्ह्यात ७६७ ग्रामपंचायतींवर प्रशासकांची नियुक्ती होऊ शकते. पूर्वतयारी न झाल्यामुळे ग्रामपंचायतींच्या निवडणुकांसाठी प्रशासकांची नियुक्ती ही तातडीची गरज बनली आहे. यामुळे प्रशासनाला नागरिकांच्या सेवेसाठी मार्गदर्शन सुनिश्चित करण्याची जबाबदारी पुढे येत आहे.

### इतिहासाची आठवण

**■ प्रभागरचना २०२० मध्ये जुलैपासून सुरू झाली होती. डिसेंबरमध्ये प्रारूप यादी तयार झाली आणि १५ डिसेंबरपासून निवडणूक प्रक्रिया सुरू झाली होती. १५ जानेवारी २०२१ ला मतदान झाले. यंदा मुदत संपत असतानाही प्राथमिक तयारीसाठी आदेश जारी नाहीत. यापूर्वी मुदत संपलेल्या ग्रामपंचायतींमध्ये २६ सप्टेंबर १९९४ ते ७ मे १९९५ दरम्यान ग्रामविस्तार अधिकाऱ्यांऐवजी विद्यमान सरपंच यांनाच प्रशासक म्हणून नियुक्त केले गेले होते.**

Dhule, Dhule-Today
29/01/2026 Page No. 2

सकाळ

# शहादा पोलिस ठाण्यासाठी पुरेसे मनुष्यबळ द्या

## शिवसेनेची गृहराज्यमंत्र्यांकडे निवेदनाद्वारे मागणी

■ सकाळ वृत्तसेवा

**शहादा, ता. २८ : येथील पोलिस ठाण्याचे विभाजन करण्यासह पुरेसे अधिकारी व कर्मचारी उपलब्ध करून देण्याची मागणी गृहराज्यमंत्री योगेश कदम यांच्याकडे शिवसेनेचे तालुकाप्रमुख मनलेश जयस्वाल यांनी निवेदनाद्वारे केली.**

निवेदनात म्हटले आहे की, शहादा शहरातील पोलिस स्टेशनला लोकसंख्येनुसार तत्काळ पुरेसा कर्मचारी व अधिकारी वर्ग उपलब्ध करून देण्यासह पोलिस स्टेशन विभाजित करून शहादा शहर व शहादा ग्रामीण भागासाठी स्वतंत्र पोलिस ठाण्याची निर्मिती करावी. शहादा तालुक्यात दोन राज्यांच्या सीमा असल्याने या भागातून आंतरराज्य गुन्हेगार अवैधरित्या दारूची तस्करी, शस्त्र, रेशनचे धान्य, गौण खनिज, वनसंपत्तीची तस्करी करीत असतात. तसेच, घरफोडी, चारचाकी, दुचाकी वाहनांची चोरी केली जाते. संबंधित पोलिस ठाण्यात वेळोवेळी मोठ्या प्रमाणावर गुन्ह्यांची नोंद केली जाते. मात्र, कर्मचाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे तपास कार्यात अडथळा निर्माण होत असल्याचे स्पष्ट दिसून येते. जिल्हा निर्मितीनंतर कर्मचाऱ्यांची संख्या कमी आहे.

शहर व ग्रामीण भागाचा विस्तार झपाट्याने वाढत आहे. त्या तुलनेत पोलिसांचे संख्याबळ कमी आहे. लवकर शहादा पोलिस ठाण्याचे विभाजन करून शहर व ग्रामीण भागाकरीता स्वतंत्र वेगळे पोलिस ठाणे निर्माण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. याबाबतचा अहवाल मिळाल्यावर तत्काळ कार्यवाही करून शहादा पोलिस ठाण्याचे विभाजन करण्यास मान्यता देण्यात येईल, असे आश्वासन मंत्री योगेश कदम यांनी दिले.

या वेळी आमदार चंद्रकांत रघुवंशी, आमदार आमश्या पाडवी, शिवसेना जिल्हाप्रमुख राम रघुवंशी, जिल्हाप्रमुख गणेश पराडके आदी उपस्थित होते. निवेदनावर शिवसेनेचे शहादा तालुकाप्रमुख मनलेश जयस्वाल, नगरसेवक जितेंद्र जमदाडे, युवासेना जिल्हा उपप्रमुख राजरत्न बिरारे, जयसिंग ठाकरे, लक्ष्मण पवार, प्रा. विजय गायकवाड, कौस्तुभ मोरे, अंकुश लोहार यांच्या सह्या आहेत.



**नंदुरबार :** गृहराज्यमंत्री योगेश कदम यांना निवेदन देताना शिवसेनेचे तालुकाप्रमुख मनलेश जयस्वाल व पदाधिकारी.



सकाळ

# 'मनरेगा'तील कर्मचाऱ्यांना सेवेत कायम करा

## अधिकारी-कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून आंदोलन

■ सकाळ वृत्तसेवा

नंदुरबार, ता. २८ : महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत (मनरेगा) कार्यरत असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्यात यावे, या प्रमुख मागणीसह विविध मागण्या करीत मनरेगा कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी स्मरणपत्र देत २३ जानेवारीपासून बेमुदत कामबंद आंदोलन पुकारले आहे. आंदोलनाच्या पहिल्या टप्प्यात काळ्या फिती लावून शासनाचा निषेध करण्यात आला.

जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद, तहसील कार्यालय, पंचायत समिती अशा विविध कार्यालयांमध्ये मनरेगाचे कंत्राटी अधिकारी, कर्मचारी विविध पदांवर कार्यरत आहेत. इतर समकक्ष योजनांतील कर्मचाऱ्यांना शासन सेवेत नियमित करण्याबाबत अथवा आवश्यक संरक्षण प्रदान करण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घेतले. मात्र, कर्मचाऱ्यांबाबत अद्याप ठोस निर्णय झाला नाही. शासनाकडून याची दखल घेण्यात न आल्याने स्मरणपत्र देऊन शुक्रवारपासून आंदोलन झाले. दखल न घेतल्यास आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही दिला आहे. गटविकास अधिकाऱ्यांमार्फत मागण्यांचे निवेदन संघटनेच्या शिष्टमंडळाद्वारे शासनाला देण्यात आले.

या वेळी तहसील कार्यालय व पंचायत समितीसमोर घोषणा देत निषेध करण्यात आला. डीपीओ गजानन मराठे, दर्पण शहा, विजय बागूल, श्रेया पवार, प्रतिक पगारे, राहुल बोरसे, संदीप वाडीले, मिलिंद पाडवी यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

### या आहेत मागण्या

■ **'रोहयो'च्या सर्व कंत्राटी अधिकारी, कर्मचाऱ्यांना इतर योजनेतील कर्मचाऱ्यांप्रमाणे शासन सेवेत नियमित समायोजन करावे, एस २ इन्फोटेक कंपनीमार्फत भरती रद्द करुन त्याऐवजी सर्व कर्मचाऱ्यांना राज्य निधी असोसिएशनमार्फत नियुक्ती देवून समान काम, समान वेतन धोरण लागू करण्यात यावे, इतर विभागाप्रमाणेच मनरेगा विभागाची स्वतंत्र यंत्रणा तयार करून पदनिहाय आकृतिबंध तयार करण्यात यावा, यांसह विविध मागण्या करण्यात आल्या आहेत.**

दिव्य मराठी धुळे सिटी 29-01-2026

# राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त कर्मचाऱ्यांनी घेतली शपथ




राष्ट्रीय मतदार दिनी प्रतिज्ञा घेताना विविध मान्यवर.

**प्रतिनिधी** | नंदुरबार

२५ जानेवारी रोजी १६ वा राष्ट्रीय मतदार दिन जिल्ह्यात उत्साहात साजरा करण्यात आला. या दिनाचे औचित्य साधून विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले शासकीय व निमशासकीय कार्यालयांमध्ये लोकशाहीवर निष्ठा ठेवून मतदान प्रक्रियेत सहभागी होण्याची प्रतिज्ञा करण्यात आली. अशी माहिती उप जिल्हा निवडणूक अधिकारी कल्पना ठुबे यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी डॉ. मित्ताली सेठी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी शपथ घेतली. जिल्हास्तरीय कार्यक्रम मिशन हायस्कूलमध्ये परिसंवाद, विविध चर्चासत्रे आणि स्पर्धांसह आयोजित करण्यात आला. तसेच शासकीय आदिवासी मुलींचे वसतीगृह येथे मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा संदेश यावेळी प्रसारित करण्यात आला. मतदानाची शपथ घेण्यात आली. विद्यार्थिनींना जागृत मतदार, मतदाराचे कर्तव्ये व जबाबदाऱ्या तसेच स्पर्धा परीक्षांबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाला अपर जिल्हाधिकारी धनंजय गोगटे, सहाय्यक जिल्हाधिकारी अंजली शर्मा, निवासी उपजिल्हाधिकारी आशा संघवी, उपजिल्हाधिकारी प्रमोद भामरे, शाम वाडकर, उप जिल्हा निवडणूक अधिकारी कल्पना ठुबे आदी उपस्थित होते.

दिव्य मराठी धुळे सिटी 29-01-2026



प्रकाशा येथे होणारी वाहतुकीची कोंडी. यावेळी मोठमोठ्या

# प्रकाशात वाहतूक कोंडीची समस्या वाढली, वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष

प्रतिनिधी | प्रकाशा

शहादा तालुक्यातील प्रकाशा येथे वाहतुकीच्या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. बऱ्हाणपूर-अंकलेश्वर राज्य महामार्ग असल्यामुळे दिवस-रात्र वाहतूक सुरू असते. प्रकाशा चौफुलीवर वारंवार वाहतूक पोलिसांची नेमणूक करण्याच्या मागणीकडे प्रशासन दुर्लक्ष करत आहे.

अवजड ट्रक, ट्रेलर, कंटेनर या वाहनांच्या चालकांमध्ये शिस्तीचा अभाव आणि वाहतुकीचे नियम डावलून अहोरात्र सुरू असलेली अवजड वाहतूक हे त्या मागचे प्रमुख कारण आहे. गंभीर रुग्णांना नेणाऱ्या रुग्णवाहिका देखील या वाहतुकीच्या कोंडीत अडकून पडल्या असल्याचे चित्र समोर येत आहे. काही दिवसांपासून तर रोज वाहतूक ठप्प होत आहे. सध्या सुरू असलेल्या ऊस वाहतुकीमुळे दिवसभरात पाच ते दहा वेळा वाहनांची या ठिकाणी मोठी रांग लागत आहे. सकाळी शाळेत जाणाऱ्या लहान मुलांना जीव मुठीत घेऊन रस्त्यावर चालावे लागते. या समस्येमुळे नागरिकांना आणि प्रवाशांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागत आहे.

दिव्य मराठी धुळे सिटी 29-01-2026

# शासन उदासीनतेचा केला मनरेगा कर्मचाऱ्यांनी निषेध

प्रतिनिधी | खापर

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना (मनरेगा) अंतर्गत कार्यरत कंत्राटी अधिकारी व कर्मचारी यांच्या प्रलंबित मागण्यांकडे शासनाने दुर्लक्ष केल्याने राज्यभर आंदोलनाला सुरुवात झाली आहे. त्या पार्श्वभूमीवर अक्कलकुवा तालुक्यातील मनरेगा कर्मचाऱ्यांनी तहसीलदारांना मागण्यांचे निवेदन देत शासनाच्या उदासीनतेचाही निषेध नोंदवला. तर विविध मागण्यांसंदर्भात अक्कलकुवा-अक्राणी विधानसभा मतदारसंघाचे आमदार आमश्या पाडवी यांना देखील निवेदन देण्यात आले.

नियमितीकरण, सेवा-सुरक्षा व समान वेतन या मूलभूत मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असून, १२ जानेवारी रोजी दिलेल्या निवेदनानंतरही शासनाने या मागण्यांबाबत ठोस निर्णय न घेतल्याने कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. त्यामुळे २३ जानेवारी २०२६ पासून राज्यभर काळ्या फिती लावून काम करत ठिय्या आंदोलनही करण्यात येत आहे. तरीही मागण्या मान्य न झाल्यास पुढील टप्प्यात उपोषण व कामबंद आंदोलन करण्याचा इशाराही कर्मचाऱ्यांनी दिला.

दिव्य मराठी धुळे सिटी 29-01-2026

# कोठली येथून दीड लाख रुपयांच्या 30 मेंढ्या लंपास

प्रतिनिधी | नंदुरबार

पहाटेच्या सुमारास आलेल्या चोरट्यांनी मेंढ्यांच्या कळपातून सुमारे १ लाख ४२ हजार रुपये किमतीच्या ३० मेंढ्या चोरून नेल्याची घटना कोठली येथे घडली. या प्रकरणी नंदुरबार उपनगर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

नंदुरबार तालुक्यातील शनि मांडळ हंद्रीहट्टी येथील पंकज पांडुरंग चांडे या मेंढपाळाने कोठली गावाजवळील टाकली पाडा शिवारात शेतात मेंढ्यांचा पडाव टाकलेला आहे. बुधवारी पहाटे साडेपाच वाजेच्या सुमारास चारचाकी वाहन घेवून आलेल्या अज्ञात व्यक्तींनी मेंढ्यांच्या कळपातून १ लाख ४२ हजारांच्या ३० मेंढ्या चोरुन नेल्या आहेत. यात ७२ हजारांच्या १२ गाभण मेंढ्या, ३० हजारांच्या १० मेंढ्यांचे कोकरू, ४० हजारांचे आठ पिल्लांचा समावेश आहे.. याबाबत पंकज चांडे यांनी नंदुरबार तालुका पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून तपास पोलिस उपनिरीक्षक जगन वळवी करत आहेत.